
# माणूस

शनिवार । ९ ऑगस्ट १९७५ । एक रुपया



फार
लांबचा
प्रवास
करण्यासाठीसुद्धा
पहिले
पाऊल
हे
उचलावेच
लागते....

श्रीग्रामायन
अभिप्रायातून

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : पंधरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ९ ऑगस्ट | अंक: दहावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# Even the longest journey bigins with the first step

## श्रीग्रामायन । विद्याधर पुंडलिक

श्री. ग. माजगावकरांच्या पुस्तकाचे नाव असे आहे, की ते उघडण्यापूर्वीच एक क्षण वाचकाने जरा थवकावे–'श्री ग्रामायन!' माजगावकरांना जे जे व्यक्त करायचे आहे त्याचा 'मर्मबंध' म्हणजे हे नाव. पहिल्या 'श्री' मध्ये श्रद्धा आहे. धार्मिक संस्कृतीच्या हरेक गोष्टीला विरोध म्हणजेच निधर्म असे समजणारा एखादा हट्टी निधर्मीवादी हा 'श्री' बघून आपल्या भिवया जरा उंच करेल! दुसऱ्या कुणाला त्यातून माजगावकरांमधल्या रोमँटिक स्वप्नाळू वृत्तीचे प्रतिबिंब दिसेल. मला स्वतःला या वृत्तीबरोबरच एक नम्र आणि डोळस श्रद्धाही दिसते. भारतीय जीवनाचा 'मूळारंभ' खेडेगावात आहे असाही अर्थ त्या शब्दातून डोकावतो. 'ग्रामायन' या दुसऱ्या शब्दात कसले तरी फार मोठे रामायण आपल्या सात लाख ग्रामातून घडावयाचे आहे अशा निर्धाराची सूचनाही आहे.

हे रामायण भारताच्या सामाजिक अन् आर्थिक नियोजनाचे म्हणजे एक प्रकारच्या पुर्नरचनेचे आहे. 'खेडेगाव हा आपला भारतीय समाजाचा किंबहुना सर्वच पौर्वात्य देशांचा तोलबिंदू आहे' हे त्या रचनेचे सूत्र असले पाहिजे असे माजगावकरांना म्हणावयाचे आहे. स्वैर, चिंतनात्मक लेख, मुलाखती किंवा मित्रांशी पत्ररूप संवाद–अशा निरनिराळ्या अन् ललित शैलीची प्रसन्न डूब दिलेल्या माध्यमांतून लेखकाने हे सूत्र गोवत नेले आहे. अशा विविध माध्यमांमुळे काही वेळा माजगावकरांचे लिखाण भरकटत गेले असले तरी त्यांना जी एक बैठक मांडायची आहे तिचा पक्केपणा कुठेही गेलेला नाही.

हा धागा मनात ठेवून आपण पुस्तक वाचत गेलो की माजगावकरांच्या या एकूण प्रतिपादनामागे चार गोष्टी आहेत हे आपल्याला जाणवते. ग्रामीण जीवनातल्या बदलामागची काही धोरणे आणि संस्था यावरची टीका ही पहिली. काही निश्चित, नैतिक प्रेरणांचा आग्रह ही दुसरी. भारतीय सांस्कृतिक परिवर्तनाचे काही सांस्कृतिक आदर्श ही तिसरी आणि शेवटची 'भारतीय' परिवर्तनासाठी काही विशिष्ट मार्गांची आणि उपायांची आवश्यकता ही चौथी.

या चार घटकांचा या परीक्षणात क्रमाक्रमाने विचार करावयाचा आहे.

: १ :

आजच्या ग्रामीण भारतात बदल घडवू पाहणाऱ्या काही संस्था, प्रयोग आणि विविध सुधारणा या सर्वांवर माजगावकरांनी जागोजागी टीका केली आहे. समूह-विकास-योजनात आणि एकूणच आपल्या आर्थिक नियोजनाच्या कार्यक्रमात खेडेगावचे लोक सहभागी होत नाहीत. ती उत्सुकताच त्यांच्या अंगी नाही. (एका गावची स्वातंत्र्यकाळातील वाटचाल.) सहकारी पतपेढ्या, ग्राहक–संस्था आणि शेतीच्या विकासयोजनांचे जवळजवळ ७० टक्के फायदे वरिष्ठ व सधन शेतकरीवर्गालाच मिळत आलेले आहेत. आपला बहुसंख्य शेतकरीवर्ग म्हणजे २–५ एकर जमिनीचा गरीब मालक किंवा कूळ–या सत्याच्या पार्श्वभूमीवर आपल्या समाजरचनेतील आर्थिक विषमतेची दरी, स्वातंत्र्योत्तर काळात किती रुंदावत चालली आहे इकडेही ते आपले लक्ष वेधतात. या संदर्भात, १९३६ च्या फैजपूर काँग्रेसला विरोध करणारे लेवा समाजातील नेते आज पंचवीस वर्षानंतरही पुन्हा राजकीय आणि आर्थिक सत्तास्थाने कशी वळकावून बसले आहेत याचेही एक शेलके चित्र ते उभे करतात. (एका गावची स्वातंत्र्यकाळातील वाटचाल) नवे कसदार स्थानिक नेतृत्व विकेंद्रीकरणामुळे पुढे येईल ही अपेक्षा होती ती पूर्ण झालेली नाही. राजस्थान, आंध्र, महाराष्ट्र यांमधील पंचायतसमित्यांतून कार्यवाहीत आलेले विकेंद्रीकरणाचे प्रयोग फसलेले आहेत. सरकारी यंत्रणेतील नोकरशाही आणि ग्रामीण जनता यात जवळकीचे दुवेच नाहीत. (प्रगतीचा रस्ता 'ब्लॉक' करणारा तो 'ब्लॉकऑफिसर' ही थट्टा गावकरी मंडळींपर्यंतही पोचलेली आहे!) 'जनतेच्या पाठवळाशिवाय योजना यशस्वी होत नाही हे एकदा ध्यानात आल्यावर हे पाठवळ मिळविण्याची इतक्या वर्षात आपण काय सोय केली?' असाही सवाल या संदर्भात माजगावकर विचारतात. ('लोकशाही विकेंद्रीकरण–एक विचार' आणि 'पोचमपल्लीकडे')

माजगावकरांची ही टीका सामान्यपणे खरी आहे. त्यांच्या सवालांना सरकारतर्फे चोख जबाबही देता येणार नाहीत. तशी ही

टीका नवीन नाही. या विषयांतील जाणकारालाच नव्हे तर सर्व-साधारण खेडेगावातील आजचे समाजचित्र पाहणाऱ्या सामान्य नागरिकालासुद्धा आपल्या नियोजनाचे अयशस्वी स्वरूप पूर्णपणे ओळखीचे आहे. तथापी या टीकेपेक्षाही उल्लेखनीय आहे ती माजगावकरांची विधायक दृष्टी. 'सरकारने शिक्षणापासून दूर रहावे अन् सगळ्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी गावाने घ्यावी ' यासारखी एखादी अव्यवहारी सूचना सोडली तर विचार करावा असेही पर्याय ते काही काही वेळेला सुचवतात. उदा. खेडेगावातील साक्षरता आणि लोकशिक्षण या कार्यक्रमांत शिक्षणखाते आणि महसूलखाते यांनी एकवटून काम करावयास हवे. ' संपूर्ण रेल्वेलाइन गेलेल्या कोरेगाव तालुक्यातील ल्हासुर्णे गाव वेगळा. जावळीसारख्या दऱ्याखोऱ्यांत किंवा झाडाझुडपांत दडलेला तालुका वेगळा. फलटणसारख्या संस्था-निक वातावरणात वाढलेल्या तालुक्याची प्रकृती वेगळी. माण-सारख्या धनगरांची फिरती वस्ती असलेल्या तालुक्याचे स्वरूप वेगळे–' सामाजिक आणि प्रादेशिक भिन्नतेची अशी उदाहरणे देऊन या भिन्नतेनुसार आपले विकासप्रकल्प आखले जायला नकोत का ? असा महत्त्वाचा प्रश्न ते विचारतात. इतकेच नव्हे तर प्रत्येक गावच्या जमिनीचा प्रश्नसुद्धा वेगवेगळा असतो. हा एका समाजवादी कार्यकर्त्याचा दृष्टिकोन ते या संदर्भात आपल्यासमोर आवर्जून ठेवतात. ' वेडपट ' आणि ' चक्रम ' ही संभावना आयुष्यभर सहन केलेल्या एस. आर. भागवतांच्या, डोंगरावरून वाहणारे पाणी जमिनीत मुरवण्याच्या कल्पक योजनेचा पुरस्कार आणि ' माणूस प्रतिष्ठान 'ने सुरू केलेल्या सुप्याच्या विहिरीच्या प्रयोगाची मनमोकळी चर्चा–या दोहोंतूनही माजगावकरांची तीच प्रांजल विधायकदृष्टी दिसून येते.

: २ :

लोकशाही नियोजनाच्या द्वारे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे आपले प्रयोग कोसळत गेले हे एकदा मान्य केल्यावर, आपल्याला अपरिहार्यपणे काही नैतिक प्रेरणा आणि सांस्कृतिक मूल्ये आणि परंपरा यांचा विचार करणे भागच पडते. कारण भांडवलशाही किंवा 'प्रस्थापित' अर्थ आणि समाजव्यवस्था हीच आपल्या अधःपतित चारित्र्याला जबाबदार आहे, ही नेहमीची लोक-प्रिय मीमांसा एकतर्फीही आहे आणि सोपीही आहे. समजा, सोव्हि-एट रशिया किंवा चीनसदृश समाजवादी रचना हे ध्येय मानले, तरी ती उभारण्याइतके सामर्थ्य आपल्या सामाजिक–सांस्कृतिक परंपरेत, मूल्य-सृष्टीत आणि नैतिक प्रेरणांत आहे काय ? या प्रश्नालाही आपल्याला थेट भिडावेच लागते.

माजगावकरांनी आपल्यापरीने या प्रश्नाचा बरोबर मागोवा घेतला आहे, असे मला वाटते.

ज्या नैतिक प्रेरणांचा माजगावकर वारंवार उद्घोष करतात, त्यांतील पहिली आणि महत्त्वाची, म्हणजे शेती व अन्नधान्य या दोन क्षेत्रांत आपण पूर्णपणे स्वतंत्र आणि कठोरपणे स्वावलंबी असले पाहिजे हा; ' उद्घोष ' असा शब्द इथे वापरला आहे, तो हेतुपूर्वकच कारण श्री ' ग्रामायन 'मधील ' चला ' ' वेल्लोळी–जिल्हा नाशिक ' ' अन्न परावलंबनानंतर कृषि–परावलंबन ' हे लेख आणि त्यांतील अभिव्यक्ती ही प्रधानतः एक प्रकारच्या घोषाच्या स्वरूपाची आहे. ' एक वेळ भूकबळी होऊ पण हे भीकबळी होणे नाही. ' ' करू पुन्हा एकदा परदेशी वस्तूंची होळी – निदान त्या दूधभुकट्यांची नाही तर अमेरिकन गव्हाची तरी ! ' या गर्वगीतांच्या आणि स्फूर्तीमंत्रांच्या सामगायनासाठी मित्रांनो, चला कैलास ते सिंधुसागर ! ' हीं त्याची बोलकी उदाहरणे. ती वाचून, परदेशी सत्ता किंवा दुसऱ्या दृश्य शत्रूचे लक्ष्य आज समोर नसताना, ही सावरकरी अन् कुसुमाग्रजी छटा असलेली लढाऊ भाषा अन् प्रतीके कशाला ? असा प्रश्न एखाद्या वस्तुनिष्ठ ठेवणीच्या वाचकाच्या मनात येईलही; पण माजगावकर हे कार्यकर्ते पत्रकार आहेत. कोणताही पत्रकार हा प्रचारकच असतो. यात्रेची भिरभिरती भिंगरी त्यांनी अन्नस्वतंत्रता संचलनासाठी (आणि एरवीसुद्धा ! ) आपल्या पायांना लावली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळातील युद्धमान संस्कारांमुळे तत्कालीन प्रतिमा अन् रूपके त्यांच्या मनात खोलवर गेली आहेत, आणि एखादा समाजवादी प्रचारक आपल्या प्रचारात आपल्या ब्रीदाची प्रतीके वापरल्यावाचून राहील काय ? अशी उत्तरे त्याला सहज देता येतील. मी स्वतः त्याच काळातील असल्यामुळे आणि त्या प्रतीकांची असोशी मलाही माहीत असल्यामुळे माजगावकरांच्या लेखणीचे रूप मी समजावून घेऊ शकतो.

पण हा प्रश्न गैरलागू आहे. मुख्य मुद्दा आहे तो हा–' रक्त, अश्रू आणि घाम याशिवाय गरिबी हटवण्याचा दुसरा पर्याय नाही, ' या प्रेरणेला एखाद्या देशाच्या अर्थ–विकासात काय स्थान आहे ? या बाबतीत, ' आपले धान्यही न उत्पादणाऱ्या देशास कल्पना–विचार–साहित्य प्रांतात म्हणण्यासारखे काही निर्मिता येईल, असं तुम्हाला खरंच वाटतं ? '–ह्या प्रश्नाला पाठिंबा देण्याइतका जो टीपेचा कर्कश सूर माजगावकर कधीकधी लावतात तो मला मान्य नाही. कोणतीही अर्थ–व्यवस्था–मग ती भांडवलशाही असो, समाजवादी असो किंवा संमिश्र असो–हवी तशी, लवचिकपणे वाकवण्याचे Manoeuvre करण्याचे अर्थशास्त्रीय कौशल्य आणि प्रतिभा ही स्वावलंबनाइतकीच महत्त्वाची आहेत, असेही मला वाटते; पण हे मत सांगूनही माजगावकरांचे स्वावलंबनाचे एकतारीवरील ध्रुपद मला महत्त्वाचे वाटते. ( म्हणूनच ' अठरा लक्ष पावलां 'च्या त्यांच्या अन्नस्वतंत्रता –संचलनात मीही माझी दोन–तीन पावले टाकली होती ! )

महत्त्वाचे, आजच्या काही विशिष्ट संदर्भात. पुस्तकी अर्थशास्त्रातले जागतिक आर्थिक जीवन, व्यापार आणि देवघेवीचे सिद्धांत वाचून दाखवून आर्थिक क्षेत्रातील स्वातंत्र्य ही कल्पना कशी अशास्त्रीय आहे, हे साधार पटवून देणे शक्य आहे. त्याचप्रमाणे आपली लोक-संख्या, विराट गरिबी आणि खचलेली निर्वाहगतळी याबद्दलचे

## स्वावलंबनाचे एकतारीवरील धृपद .... ....

दांडेकर-रथांच्या पुस्तकांतले डोळे फिरविणारेचा आकडे त्यांच्यासमोर आपटून ' अन्नधान्याच्या 'सार्वभौमत्वाबद्दल साक्षात्कार ' 'प्रचीतीचा पुरुषार्थ ' वगैरे वगैरे ( माजगांवकरांचे ) बोलणे कसे काव्यमय आणि अव्यवहारी आहे असाही वाद घालता येईल. (माजगावकरांचे म्हणणे अर्थशास्त्रीयक सोटयांवर अगदीच तसे पोकळ नाही असेहि सिद्ध करता येईल, असा माझा एक अस्पष्ट तर्क आहे. पण हा माझा अभ्यासाचा विषय नाही ) तथापि आर्थिक विकासामागे काही नैतिक प्रेरणा असतात, आणि पाश्चिमात्य राष्ट्रांच्या आर्थिक इतिहासात कामाबद्दलच्या नैतिक प्रेरणांचे ( work ethics ) कार्य उपेक्षणीय नाही हे आपल्याकडील ' पंडित ' अर्थशास्त्रज्ञांना पूर्णपणे उमगलेले नाही. एकूणच आर्थिक विकास हा केवळ आर्थिक घटकांनी निश्चित होत नाही. त्यापाठीमागे त्या त्या संस्कृतीतील जीवनमूल्ये, सामाजिक भूमिका, समाजसंस्था आणि लोकांचे चारित्र्य हे महत्त्वाचे घटक आहेत, याचे भान आता सगळ्यांनाच येऊ लागले आहे. फक्त बचत, गुंतवणूक भांडवलनिर्मिती, मजुरांची उत्पादनक्षमता, यंत्र-तंत्र हेच अर्थशास्त्रीय आडाखे लावून आशियातील समाजांच्या आर्थिक प्रगतीची मीमांसा करू पाहाणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांचे गुन्नार मिर्‌डलसारख्यांनी आपल्या 'एशियन ड्रामा ' मध्ये अक्षरशः वाभाडे काढले आहेत. हेही या संदर्भात सांगितलेले बरे.

वर उल्लेखिलेल्या सामाजिक घटकांचा विचार या पुस्तकाच्या परीक्षणात पुढे होणारच आहे. तूर्त इथे इतकेच सांगावयाचे आहे की माजगावकर स्वावलंबनाच्या ज्या प्रेरणेचा आग्रह धरीत आहेत, तिची पाळेमुळे मूलतः सांस्कृतिक आहेत. भारतातील राजकीय नेते, प्रज्ञावंत, नोकरशाहीतील अधिकारीवर्ग आणि सर्वसाधारण जनता—या तिघांच्याही स्वभाव–प्रवृत्तींचा आणि आर्थिक विकासाचा ध्येयवाद आणि वेग यांचा नक्कीच निकटचा संबंध आहे.

या दृष्टीने सर्वात खटकणारी गोष्ट म्हणजे आपल्या वरच्या वर्गाच्या दोन प्रकारच्या मानसिक प्रवृत्ती. एक म्हणजे पाश्चात्य किंवा साम्यवादी देशांच्या वरवरच्या चिकित्साशून्य अनुकरणाची अन् दुसरी त्यामागच्या आत्मविश्वासाच्या संपूर्ण अभावाची. या दोन्ही प्रवृत्ती एकमेकांतून निर्माण होतात. मला स्वतःला दुसरी प्रवृत्ती भ्रष्टाचार वगैरेपेक्षाही अधिक काळजी करण्याजोगी वाटते. शिक्षणक्षेत्रातील अभ्यासक्रम आणि माध्यमाचे प्रश्न, प्रायोगिक नाटके, समान नागरिकत्वाचा कायदा, कुटुंबनियोजन—सर्वच ठिकाणी आपल्या राष्ट्रीय आत्मविश्वासात आणि निर्णय घेण्याच्या सामर्थ्याला जणू पक्षघात झाला आहे, इतक्या लुळ्या पंगू अस्मितेने आपण वावरत आहोत. हा आत्मविश्वास जागा करून तो आपल्या व्यक्तित्वात भिनवायचा असेल तर आर्थिक क्षेत्रांत एक किमान गुणवत्ता आणणे हाच आपल्या राष्ट्रवादाचा आविष्कार झाला पाहिजे. आर्थिक विकास हे केवळ एक भौतिक मूल्य नसून ते एक उच्चतम सांस्कृतिक मूल्य म्हणून प्रस्थापित झाले पाहिजे. माजगावकराच्या पुस्तकाचा एक महत्त्वाचा विशेष हा की या मूल्याच्या स्वरूपाबद्दल ते आपल्याला वारंवार डिवचून अस्वस्थ आणि अंतर्मुख करत रहाते.

## : ३ :

माजगावकरांच्या विचारांच्या मागे आणखी एक तळमळीची प्रेरणा आहे. ती म्हणजे स्वदेशी नियोजनाची. या ' स्वदेशी नियोजना 'बद्दल मात्र आणखी पुरेशी चिकित्सा व्हायला हवी.

स्वदेशी नियोजनाचाच एक भाग म्हणून वर सांगितल्याप्रमाणे माजगावकर स्वावलंबनाच्या नैतिक प्रेरणेला महत्त्व देतात. उद्योगधंदे, शिक्षण, यंत्रज्ञान या सर्व बाबतीत आपण शक्य असेल तेथे आणि तितकी आपली माणसे, आपली साधने, आपल्या नैसर्गिक परिस्थितीनुसार आपली सामग्री वापरली पाहिजे असा वारंवार आग्रह धरतात. माजगावकरांचा हा आग्रह मंजूर करूनही स्वदेशी संयोजन म्हणजे केवळ स्वावलंबी संयोजन नव्हे. एक तर असे आहे की आर्थिक विकास व प्रगती यांच्या शर्यतीत पाश्चात्य आणि मिश्र अर्थव्यवस्थेची लोकशाही राष्ट्रे, समाजवादी आणि साम्यवादी हुकुमशाही समाज हे आपल्यापुढे किमान काही दशके तरी पुढे आहेत. काळाचे हे अंतर हा एक महत्त्वाचा घटक आहे. कारण या तिन्ही गटांचे प्रयोग, त्यातील यशापयश, त्यामुळे या समाजांना घालाव्या लागणाऱ्या मर्यादा आणि मुरडी—हा सर्व आंतरराष्ट्रीय संदर्भ स्वीकारल्यावाचून आपल्याला आपल्या नियोजनाचा आराखडा काढणे अशक्य आहे. हा संदर्भ केवळ अटळ असल्यामुळे शुद्ध अंतर्गत असे स्वदेशी नियोजन हे एक पोकळीतले बोलणे आहे. थोडक्यात, स्वदेशी संयोजनाची स्पष्ट निश्चित अशी आकृती आज आपल्याजवळ नाही. आताच सांगितलेला आंतरराष्ट्रीय संदर्भ वारंवार तपासून त्यातले बरेवाईट निवडून आणि भविष्यातील काही अनपेक्षित शक्तींचे आघात घेऊन हो नियोजनाची आकृती आकार घेत जाणार आहे.

माजगावकरांना या संदर्भाचे भान आहे; पण ते सततचे नाही. काही वेळा स्वावलंबनाच्या नैतिक प्रेरणेने नियोजन करणे, ' शेवटी मुक्तिसंग्राम म्हणजे तरी काय ? तुझे आहे तुजपाशी हे ओळखणे ' (' ग्रामायन ' पृ. १४३) असे ते म्हणतात आणि स्वावलंबन म्हणजे स्वदेशी नियोजन असे चुकीचे समीकरण मांडतात. तर **काही वेळी कळत न कळत** ग्रामीण आणि शहरी अशा दोन भिन्न **संस्कृतींची** उद्योगपूर्व समाजरचना गृहीत धरतात. उदाहरणार्थ, ग्रंथाच्या प्रास्ताविकातील ही वाक्ये पहा– ' आज शहरे वाढताहेत. ग्रामीण भागाचे अहर्निश शोषण सुरू आहे. अर्थव्यवस्थेचा समतोल यामुळे ढळला आहे. हे थांबले नाही तर ? जे **प्राचीन काळी** कार्थेजचे, अथेन्सचे, झाले किंवा मोहोंजोदोरोचे झाले, ते उद्या आपलेही होईल. सोन्याची द्वारकाही जेथे बुडाली तेथे आपला मुंबई–कलकत्ता संस्कृतीचा उमना बडिवार किती काळ टिकणार ! कितीही वैभवशाली, दैदीप्यमान, पुढारलेल्या वगैरे असल्या तरी **केवळ शहरी संस्कृतींचा** समूळ विनाश हा अटळ असतो. **ग्रामीण आणि नागर ह्या दोन संस्कृतींचा** समन्वय एक विशिष्ट तोल ज्या समाजांनी साधला तेच समाज टिकले; पराभवाच्या राखेतूनही पुनःपुनः वर उठले. बाकीचे इतिहासजमा झाले. '

[ आजवरच्या वेगवेगळ्या संस्कृतींचा विनाश आणि पुनरुत्थान केवळ शहरी विरुद्ध ग्रामीण संस्कृतींचा तोल किंवा बेतोल या प्रक्रियांमुळे सांगता येईल असे मला वाटत नाही. खरे म्हणजे कोणत्याच प्राचीन संस्कृतीला शहरी–ग्रामीण तोल सांभाळता आलेला नाही. जेत्या आणि पराभूत समाजाची शहरे आणि खेडी या दोन्हीही क्षेत्रांत अर्थरचना आणि समाजरचना विषमच होती आणि सर्वच प्राचीन संस्कृतींचा पाया विषमच होता; पण संस्कृतींच्या इतिहासाच्या

मीमांसेचा हा प्रश्न, या ठिकाणी इतका महत्त्वाचा नाही. ]

उद्योगपूर्व आणि आधुनिक उद्योग-प्रधान समाज व संस्कृती यांच्या तुलनात्मक स्वरूपाचा विचार करताना अपरिहार्यपणे आपल्याला यंत्र-तंत्रज्ञानाच्या (Technology) जागतिक संदर्भाचा आणि स्वरूपाचा विचार करावा लागतो. याबाबत आमच्या समाजशास्त्रातील काही प्रमुख विचारवंतांचे म्हणणे असे आहे :

तंत्रज्ञान (Technology) ही एक जागतिक शक्ती आहे आणि या तंत्रज्ञानामुळे जगातील सर्वच समाजांच्या संस्कृतिरचनेच्या प्रक्रियांवरच एक निर्णायक आघात केला आहे. हा आघात इतक्या मूलभूत स्वरूपाचा आहे की मानवी जीवनात त्यामुळे झालेले स्थित्यंतर हे अपूर्व आहे. उद्योगपूर्व समाजांचे पूर्वीचे नमुनेच त्यामुळे गैरलागू ठरत जाणार आहेत. नागरी आणि ग्रामीण अशा दोन वेगळ्या समाजांच्या वा संस्कृतींच्या भाषेत आता बोलता येणार नाही. आर्थिक उत्पादनाचे सतत वाढते प्रमाण व वेग, त्यासाठी यंत्रशक्तीचे व मोठ्या उद्योगधंद्यांचे अधिष्ठान, त्यासाठी बांधावी लागणारी यंत्र-तंत्रसन्मुख अशी **एकमुखी** शिक्षणपद्धती, यातून निर्माण होणारे औद्योगीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानावर आधारलेली व्यवसायपद्धती, अशी ही साखळी आहे. ही साखळी अन् त्यातील दुवे हे निदान अमेरिका, रशिया, भारत, चीन यांसारख्या **मोठ्या आकाराच्या** देशांपुरती तरी अटळ आहे. औद्योगीकरणाचा व तंत्रज्ञानाचा हा एकंदर व्यूहच असा आहे की त्यामध्ये खेडेगावे ही पूर्वीच्या किंवा कोणत्याच अर्थाने खेडेगावे रहाणार नाहीत. म्हणजे ती स्वयंपूर्ण, स्वायत्त ठेवता येणार नाहीत. शेती हीसुद्धा पूर्वीच्या अर्थाने, गुराढोरांच्या श्रमावर व मजूरशक्तीवर आधारलेली रहाणार नाही. शेती हा सुद्धा एक प्रचंड उद्योगधंदा (Industry & Commerce) म्हणून आपल्याला बघावा लागेल. आधुनिकातील आधुनिक अशा यंत्र-तंत्रज्ञानाने कार्यक्षम करून आणि तिचे प्रचंड व्यापारीकरण करून शेतमालासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचे जाळे निर्माण करावे लागेल. या सर्व कारणांमुळे 'शेतीप्रधान समाज'–(भारत आणि आशियाई देशांतील समाजांचे रूप हे असे मानले जाते)–या शब्दांना केवळ एक मर्यादित आणि संक्रमणावस्थेपुरताच अर्थ राहील. विराट लोकसंख्या अन् विराट दारिद्र्याच्या भारतासारख्या देशांना उद्योग आणि तंत्रप्रधान समाजाचा हाच नमुना स्वीकारावा लागेल.

यंत्र-तंत्रज्ञानाबद्दलचा हा जो अटळवाद किंवा निश्चितीवाद (Determinism) आहे तो आपल्या विसाव्या शतकातील यक्षप्रश्नच आहे. आशियातील अजूनही बऱ्याचशा प्रमाणात उद्योगपूर्व-अवस्थेत असलेल्या भारतासारख्या देशांचे आर्थिक आणि सांस्कृतिक भवितव्यही याच प्रश्नाशी निगडित असल्यामुळे या एका प्रश्नाचा पाठपुरावा भारतातील विचारवंतांना एकसारखा करावा लागणार आहे. या प्रश्नाच्या संदर्भात, वर सूचित केल्याप्रमाणे काही वेळा माजगावकरांच्या मनात उद्योगपूर्व समाजाचे चित्र रेंगाळत आहे असे जाणवते, तर काही वेळा हे चित्र रोखठोकपणे नाकारून ते म्हणतात : 'औद्योगिक संस्कृतीपुढे पराभूत ठरलेल्या जुन्या ग्रामव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाचा दुबळा प्रयत्न, हे आजच्या गांधी-विनोबाप्रणीत ग्रामस्वराज्य विचारांचे स्वरूप आहे, हे बदलले पाहिजे. भांडवलशाही व समाजवादी संस्कृतींच्या यशापयशाचा संदर्भ या विचारांना जोडला पाहिजे. यंत्रयुगाला भिऊन पळायचेही नाही, त्याला डोक्यावर घेऊन नाचायचेही नाही. या युगावर स्वार व्हायचे आहे. असा आधुनिक आणि लढाऊ दृष्टिकोन असेल तरच नक्षलवादाला–माओवादाला ग्रामदान–ग्रामस्वराज्यवाद पर्याय ठरू शकेल.' [ ग्रामायन पृष्ठ १३६ ]

यावर माझी तक्रार एवढीच आहे, की हे सर्व स्थूल आहे. ते वाचून काही प्रश्न अनुत्तरित रहातातच. उदा. ग्रामस्वराज्य आणि शहरे, शहरी जीवनपद्धती, शहरी समाजरचना यांचे संबंध काय असतील ? चीनमधील कम्यून्स शहरविरोधी आहेत. इस्राइलमधील 'किबुत्झ' शहरांशी दुवा सांधून, शहरी प्रवाहांशी समरसलेली आहेत. आपली दृष्टी काय रहाणार आहे ? चीनमधील कम्यून्स ही स्थानिक पातळीवर वरवर स्वायत्त असली तरी चीनमधील आर्थिक नियोजन हे केंद्रवर्ती (Centrally directed) आहे. पैसा, यंत्र-तंत्रे, कर्ज इत्यादी साधनसामग्रीवरही (Resources) केंद्रसत्तेचे नियंत्रण आहे. ग्रामस्वराज्यातील आर्थिक नियोजनाची कोणती पातळी आपल्याला अभिप्रेत आहे ? स्थानिक ? प्रादेशिक ? केंद्रवर्ती? केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांचे आणि ग्रामस्वराज्याचे ग्रामघटक यांमधील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान आणि यंत्रणा कोणत्या पद्धतीची असेल ? हे काही प्रश्न मी इथे मांडतो आहे ते अशासाठी की 'ग्रामसुधारणां'च्या विविध विकास-प्रकल्पामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना या गुंतागुंतीच्या बाजूंचा विचार करावा लागणार आहे. ग्रामायनांची नुसती 'बेटे' राहू नयेत, आजूबाजूच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा सागरी लाटांनी ती बेटे बुडून जाऊ नयेत, यासाठी एका व्यापक यंत्र-तंत्रप्रधान व्यवस्थेशी ती आपल्याला जोडून घ्यावी लागणारच. या संदर्भात माझे हे प्रश्न आहेत. मात्र ते शंकेच्या स्वरूपाचे आहेत. कारण माझ्याजवळही त्यांची पूर्ण आणि समाधानकारक उत्तरे आहेत असे नाही. माजगावकरांना या प्रश्नांचा आणखी सर्वांगीण विचार करावा लागेल म्हणून या प्रश्नांचे प्रयोजन.

यापुढचा समाज सर्वार्थाने आणि संपूर्णपणे उद्योग-तंत्र-प्रधान रहाणार आणि त्या समाजातील मध्यवर्ती शक्ती यंत्र-तंत्र रहाणार, या अटळवादाला किंवा निश्चितीवादाला चीनने आपल्या आर्थिक धोरणाने आणि कम्यून्सची उभारणी करून रोखले आहे, असे अलीकडे बऱ्याच आणि निरनिराळ्या देशांतील निरीक्षक विचारवंतांनी म्हटले आहे. चीनची कम्यून्स आहेत किती, त्यांचे प्रमाण किती, त्यांचे सातत्य किती, पाश्चात्यांची यंत्र-तंत्रे झुगारून त्यांनी आणलेली मध्यम पातळीची यंत्र-तंत्रव्यवस्था (Intermediate Technology) कितीशी निर्णायक स्थिर आणि सापेक्षतः कायम रहाणार आहे, या प्रकरणात सोव्हिएट रशियाविरुद्ध असलेल्या तात्त्विक संघर्षाविरुद्ध

**आपली भारतीय परंपरा खरोखरच जागरूक आणि विधायक आहे का ?**

चिनी साम्यवादाचे वैशिष्टच म्हणून प्रचाराचा गदारोळ किती, ही सगळी अजून मोठीच प्रश्नचिन्हे आहेत. त्यांच्या गराड्यात न सापडता एक गोष्ट मान्य केली पाहिजे ती ही, की माओच्या चीनमधील कम्यून्स आणि गांधी-विनोबाप्रणीत आणि त्यांच्यापासून फुटून पण त्यांच्या मूलभूत प्रेरणेने संकल्पिलेल्या ग्रामसुधारणांच्या योजना, यांच्यामध्ये काहीएक साम्य आहे, या विचाराने आणि त्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक ध्येयवादाच्या आशयाने, माजगावकरां-सकट आपण सारे प्रभावित झालो आहोत. या दोन व्यवस्थांमध्ये कोठले तरी एक जवळिकीचे सांस्कृतिक नाते आहे, एक प्रकारचे खास पूर्वेकडचे समान रंग आहेत, अशीही एक भावना आपल्याकडे निर्माण झाली आहे. हे नाते आणि या भावना निर्माण होण्याइतके साम्य या दोन प्रयोगांत आहे–यात संशय नाही. (उदा. शहरी संस्कृतीतील हावऱ्या उपभोगप्रधान संस्कृतीविरुद्ध प्रतिक्रिया, छोट्या कुटीरोद्योगांची आवश्यकता, काही उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण करून त्यांची लहान गावातून करावयाची संघटना, गरीब जनतेच्या गरिबीशी सहभागी होण्याची प्रेरणा, शारीरिक श्रम-मूल्यांची प्रतिष्ठा, संस्थांइतकाच माणूस बदलण्यासाठी मूल्यांच्या आवश्यकते-वर भर इ. इ.) पण त्याचबरोबर त्यात काही महत्त्वाचे विरोधही आहेत इकडेही आपले लक्ष गेले पाहिजे.

१. चीनमधील कम्यून्स ही पूर्णपणे पक्ष–नियंत्रित आहेत. माज-गावकरांना हव्या असलेल्या 'लोकसंघटनां'कडून ती बांधली गेलेली नाहीत. कम्यून्समागे केवळ हुकूमशाही पक्ष–सत्ता आहे हा नेहमीचा मुद्दा इथे सुचवावयाचा नाही. भारतातील ग्रामीण विकासाच्या मार्गात विषम समाज–रचनेचे, सांस्कृतिक परंपरेचे आणि सत्तेच्या राजकारणातील सत्तेच्या खेळाचे जे अडसर आहेत आणि ज्यामुळे आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक आणि राजकीय, अशा अलग–अलग दऱ्या इथे पडतात, तशा पडण्याची शक्यताच एकपक्षीय सत्तेमुळे नाहीशा होतात. हा फरक महत्त्वाचा आहे असे इथे म्हणावयाचे आहे.

२. स्वयंशासन आणि गावाच्या जमिनीवरची समाईक मालकी याबाबत ग्रामस्वराज्य आणि गतकाळातील आणि आजच्या चिनी कम्यु-निस्ट कम्यून्स यांत एक निर्विवाद साम्य आहे असे माजगावकरांनी सावेश म्हटले आहे. (पॅरिस आणि पुणे ७९–८७; कम्यून्स आणि ग्रामराज्ये पृ. ८८–८९, ९१) मला हे म्हणणे चूक वाटते. एका विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या आणि एकाच पक्षाकडून प्रस्थापित होणाऱ्या सर्वंकष अशा राजकीय, सामाजिक–सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनपद्धतीचे एक साधन म्हणून कम्युनिस्ट कम्यून्सचा वापर होतो. गांधी–विनोबांच्या ग्रामस्वराज्यातील स्वयंशासनामागे व्यक्तिस्वातंत्र्य हे नैतिकमूल्य आहे. कम्यून्समध्ये हे मूल्य नाही. स्वयंशासनाची प्रेरणा इस्राइलच्या किबुत्झमध्ये आहे. तसेच अमेरिकेतील Counter–Culture चळवळींमधील तात्पुरत्या स्थापन झालेल्या हिप्पी–कम्यून्स मध्येही ती होती.

३. चिनी अर्थव्यवस्थेत माणसाच्या मूलभूत गरजांची–अन्न, वस्त्र, निवारा–सर्व वर्गांत सर्वसाधारणपणे एक किमान आवश्यक अशी समान पातळी राखली गेली आहे असे एक मत प्रचलित आहे. गॅलब्रिथसारख्या प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञानीही त्याची ग्वाही दिली आहे; पण आज ना उद्या याचा असा अर्थ होईल की माओचा साम्यवाद हे समृद्धीचे तत्त्वज्ञानच नाही. अगदी गरजेपुरत्या उप-भोगालाच–म्हणजे गरिबीच्या थोड्याफार वरच्या रहाणीलाच त्या तत्त्वज्ञानात मान्यता आहे. असे काही वळण माओ–विचारांना लागले तरच किमान साध्या गरजांच्या आणि साध्या राहणीच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले ग्राम-स्वराज्य आणि चिनी कम्यून्स यांत साम्य आहे असे आपल्याला म्हणता येईल.

४. साधी रहाणी वगैरेसारख्या भारतीय नैतिक प्रेरणेपेक्षाही बहुजन समाजाच्या गरिबीत बाकीच्या वर्गांनीही श्रममूल्यांची महती मान्य करून **प्रत्यक्ष सहवासाने** समरसून गेले पाहिजे, ही प्रेरणा चिनी अर्थजीवनात जास्त आहे. सोव्हिएट अर्थपद्धती आणि जीवनपद्धती चैनी उपभोगावर आधारलेल्या पाश्चिमात्य भांडवलशाही पद्धतीजवळ जात आहे, चिनी साम्यवाद ही मात्र शुद्ध समाजवादी प्रेरणा आहे–असा युक्तिवाद यामागे आहे.

५. ग्रामीण भागातील खालच्या शेतकऱ्यांच्या गरीब थरांपर्यंत, Extension Services द्वारे शेतीतील अत्याधुनिक उत्पादनाचे शोध आणि तंत्र पोहोचविणे, हे चिनी कम्यून्सनी साधले आहे. आधुनिक यंत्रप्रधान आणि व्यापारी औद्योगिकतेशी चिनी कम्यून्सनी फारकत घेतलेली नाही.

: ४ :

भारतातील सर्वांगीण परिवर्तनाबद्दलच्या मार्गांची थोडीफार चर्चा आता केली पाहिजे.

भारतातले सामाजिक बदल हे आर्थिक विकासाशी निगडित आहेत; पण या आर्थिक विकासाचा वेग तर मंद आहे आणि आर्थिक वाढीसाठी आवश्यक असणारा उत्पादनाचा रेटाही जबरदस्त नाही. भरीस भर म्हणून आपली राष्ट्रीय उत्पन्नाची विभाजनपद्धतीही विषम आणि सदोष असल्यामुळे आहे या विकासाची फळेही शहरात वरच्या वर्गाकडे आणि खेड्यांत सधन शेतकऱ्यांकडे रवाना होत आहेत. आपल्या जात–पात–गट यांवर आधारलेल्या विषम समाज-रचनेच्या चक्राचे दाते राजकारणातील सत्ता–रचनेच्या दात्यांत असे काही विचित्रपणे अडकले आहेत की त्यांतून राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या बदलांची एक प्रकारची गुदमरवून सोडणारी कोंडी निर्माण झाली आहे.

ही कोंडी फोडण्याचा एकच मार्ग म्हणजे भारतीय जीवनातील राजकीय, आर्थिक आणि सामाजिक–सांस्कृतिक शक्ती एकवटणे हा होय. या शक्ती कोणत्या ? या प्रश्नाला उत्तर देताना माजगावकरांना एकीकडे भूदानामधील समन्वयी सर्वात्मकता आणि त्यामागची 'दान' कल्पनेची सांस्कृतिक प्रतीकात्मकता आकर्षित करते. 'समाजातील, अखेरच्या, तळच्या माणसाला स्पर्श करावा, तो वर उचलावा ही त्यामागील नैतिक प्रेरणा मला भिडते व अविरोधाच्या, सर्वात्म-कतेच्या भूमिकेवरून करण्यात आलेली या आंदोलनाची मांडणी माझ्या भारतीय मनाला जवळची वाटते.' (पृ. ४५–पोचमपल्लीकडे) 'भूदान हे एक समग्र आचारविचारदर्शन आहे.' (पृ ५९) तर त्याच वेळी दुसरीकडे ते विरोधाची आणि संघर्षाची 'धारदार पाती'ही चालविण्याची भाषा करतात. (पृ. १३८) तसेच भूदान–आंदोलनाला 'लढाऊ वळण' द्यायचे म्हणजे काय करायचे ? 'क्रांतिकारक लोक-

शक्तीला नवा संघटित आकार' कसा द्यायचा–याचाही स्पष्ट उलगडा त्यांच्या लेखांतून नीटपणे होत नाही. (पृ. १३१–१३३–यती, ग्रामस्वराज्यकोश) पण मनाची म्हणा किंवा विचारांची म्हणा अशी ओढाताण त्यांच्या पुस्तकात क्वचित दिसली तरी विधिमंडळीय लोकशाही मूल्यांवर त्यांचा मूलभूत विश्वास आहे यांत कसलीही शंका नाही.

लोकशाही मूल्यांवरचा हा विश्वास अभंग ठेवणे हीच या परिवर्तनाच्या संधिकालातील मुख्य गरज आहे. लोकशाहीचे सहकारी मार्ग आणि सत्तेपासून दूर असणाऱ्या विधायक कार्याचे तळ विद्यार्थी आणि अन्य लोक–संघटनांकडून बांधून घेणे याच मार्गांनी, भारतीय जीवनातील शक्ती आर्थिक आणि सामाजिक बदलासाठी एकवटल्या गेल्या पाहिजेत; पण या मार्गात अनेक अडसर आहेत. निष्ठेने अंग झाडून काम करण्याची आपल्यापैकी फार थोड्यांना सवय आहे. येथील नोकरशाही आणि राजकीय पक्षांतील मोक्याच्या जागेवरची अधिकारी मंडळी केवळ भ्रष्ट आहेत, असे नाही. ती कणखरही नाहीत, कष्टाळूही नाहीत आणि हवी तेवढी कल्पकही नाहीत. आपली उभी सामाजिक आणि सांस्कृतिक रचना आणि नेतृत्वपरंपरा अखंडपणे लोकशाहीचीच आहे आणि त्यामुळे लोकशाहीवाचूनचे अन्य पर्याय या भूमीत रुजूच शकणार नाहीत अशा भोळ्या–भाबड्या सांस्कृतिक अटळवादातही ( Cultural Determinism ) मश्गूल राहून भागणार नाही. आपली भारतीय सहिष्णुता ही खरोखरच जागरूक अन् विधायक आहे का ?' जाऊ द्या हो ' या पेंगत्या औदासिन्यालाच आपण ' लोकशाही सहिष्णुता ' हे गोंडस नाव देतो का ? या प्रश्नाचा निर्णयही नजीकच्या काळात लागावयाचा आहे. आपल्या मध्यमवर्गातील काही जणांना केवळ अघोर निर्णयबुद्धीवर आधारलेल्या नीतिशून्य पण हिटलरी जातीच्या समर्थ नेतृत्वाचे फार आकर्षण आहे. सरकार हेच आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाचे एकमेव शस्त्र नाही, अन्य सामाजिक आणि सांस्कृतिक लोकशाही संस्था यांना सरकारइतकेच या समाजजीवनाच्या कार्यात स्थान आहे याचे भान मुळातच आपल्या बहुजन समाजाला नाही. म्हणूनच मागासलेल्या देशांचे आधुनिकीकरण आणि आर्थिक विकास यांचा अभ्यास करणारे लोकशाहीवादी समाजशास्त्रज्ञ नेहमी एक महत्त्वाचा अन् गंभीर इषारा देत असतात तो हा, की चीन आणि सोव्हिएट रशियातील एकपक्षीय राज्यसत्तांनी लोकशाही मार्गावाचूनही आर्थिक परिवर्तन करणे शक्य आहे हे एकदा दाखवून दिल्यापासून अविकसित देशातील बहुजनसमाजालाच नव्हे तर कित्येक सुजाण लोकांनाही सरकारी परिवर्तनाचा फार मोह पडलेला आहे; पण यासारखा दुसरा धोकेबाज मोह नाही. परिवर्तनाच्या जबरदस्त अन् प्रचंड शासकीय शक्तीबद्दलचा आणि त्यामागच्या निर्घृण नेतृत्वाचा हा मोह अन भय–आदरमिश्रित कुतूहल हे लहान मुलांना राक्षसाच्या शक्तीबद्दल वाटणाऱ्या मोह अन् कुतूहलासारखेच निरागस पण भयंकर आहे. ज्या परिवर्तनात स्वातंत्र्य आणि लोकशाही ही मूल्येच नाहीत, तें कोणत्याही अर्थाने परिवर्तन असूच शकत नाही. म्हणूनच मला आठवते, पंतप्रधान इंदिरा गांधींनी सुमारे वर्षापूर्वी सांगितले होते, की भारताच्या लोकशाही परिवर्तनाचा आर्थिक अन् सांस्कृतिक मार्ग हा चीनसारखा नाही. तो फार वेगळा अन् वैशिष्ट्यपूर्ण आहे. तो एक फार लांबचा प्रवास आहे आणि एक चिनी म्हणच सांगून गेली आहे–Even the longest journey begins with the first Step – फार लांबचा प्रवास करण्यासाठीसुद्धा पहिले पाऊल उचलावे लागते !

माजगावकरांच्या 'श्रीग्रामायन'ने अधोरेखित केलेला हा शेवटचा अतिशय महत्त्वाचा मुद्दा सांगून खूपच लांबलेले हे परीक्षण संपवतो !

□ □

---

'श्रीग्रामायन' या पुस्तकाच्या निमित्तानें सुरू झालेल्या विकासविषयक चर्चेतील हा दुसरा लेख. पहिला गेल्या अंकात प्रा. स. ह. देशपांडे यांनी लिहिलेला होता.

पुढील अंकी येणारा तिसरा लेख_दामखिड–कोंढाणा या पालघर तालुक्यातील आदिवासी भागात नवनिर्माणाचे कार्य करणारे थोर समाजकार्यकर्ते श्री. आबा करमरकर यांनी लिहिलेला आहे. 'माणूस' वाचकांना तरी आबांचा परिचय नव्याने करून द्यायची आवश्यकता नाही.

---

# सोलकढी

## □ श्रीलंकेच्या नकाशात भारत

शाळेत असताना, भूगोलाच्या अभ्यासात, हिंदुस्थानचा (जमेल तेवढा सुबक) नकाशा आम्हाला काढावा लागे. त्या वेळचा हिंदुस्थान आत्ताच्या भारतापेक्षा वेगळा होता. त्यामुळे हिंदुस्थानचा सलग भूभाग काढून झाला म्हणजे त्याच्या दक्षिणेकडच्या निमुळत्या झालेल्या टोकाच्या उजव्या बाजूला थोडा खाली पिअरच्या आकाराचा सिलोन आम्ही काढत असू. सिलोनशिवाय हिंदुस्थानचा नकाशा भुंडा वाटायचा. (माझ्या वेळचे सिलोनी विद्यार्थी, सिलोनचा नकाशा काढताना, त्याच्या उत्तरेकडच्या निमुळत्या झालेल्या टोकाच्या डाव्या बाजूला थोडा वर हिंदुस्थानचा विशाल भूभागसुद्धा काढत असत, असे म्हणतात. त्याशिवाय सिलोनचा नकाशा त्यांना (भुंडा वाटायचा.) शिवाय सिलोन म्हणजे रावणाची लंका हे ठाऊक असल्यामुळे हिंदुस्थानच्या नकाशात त्याला स्थान हवेच असे वाटायचे.

स्वातंत्र्य मिळाल्यावर नकाशा बदलला. सिलोनला 'श्रीलंका' असे विशेष जवळीक वाटणारे नाव मिळाले; पण भारताच्या नकाशातून तो निखळून गेला, याची हळहळ वाटली. अलीकडच्या काळात श्रीलंकेत मोठ्या नाट्यपूर्ण घडामोडी घडत होत्या. त्या कुतूहलाने वाचत होतो. शेजारी काय चालते याची मला नेहमी जिज्ञासा वाटते.

श्रीलंकेत सिरिमाओ बंदरनायके गेली पाच वर्षे राज्य करत आहेत. त्यांचे राज्य सुरळीत चालू आहे. राज्यात मधूनमधून दंगेधोपे, बंडबंडाळ्या, उठावउद्रेक झाले : त्यांचा सिरिमाओंनी कठोरपणे बंदोबस्त करून टाकला. त्यासाठी प्रसंगी त्यांना जादा एकतंत्री अधिकार वापरावे लागले;

विरोधी पक्ष असा खेकड्या-चालीचा की यात त्याला अनैतिकता दिसली. विरोधी पक्षाचे नेते जे. आर्. जयवर्धने यांनी तर सत्ताधारी संयुक्त सरकारला आव्हान दिले. त्यांनी कायदेमंडळाचा राजिनामा दिला आणि मुदतवाढीच्या एकमेव प्रश्नाचे उत्तर द्यायची जबाबदारी लोकमतावर सोपवून ते उपनिवडणुकीत उतरले. जयवर्धने यांचा डाव सरकारने बरोबर ओळखला. असल्या कोलांट्या खेळात पोरकट भाग घ्यायचा नाही असे सरकारने ठरवून टाकले. कारण नाटकात चिकटवलेल्या मिशीप्रमाणे निवडणुकीत भाग घेणाऱ्या मतदारांचा काही भरवसा देता येत नाही; पण निवडणुकीत अंग अगदी बिनओले ठेवणेसुद्धा शोभले नसते म्हणून सरकारने, जयवर्धने यांच्या युनायटेड नॅशनल पार्टीला सोडून गेलेल्या एका उत्साही उमेदवाराला पाठिंबा दिला. या उमेदवाराला जयवर्धन यांची युनायटेड नॅशनल पार्टी आणि एकूण विरोधी पक्षांचे नेतृत्व करायची लायकीच मान्य नव्हती.

कोलंबोच्या दक्षिण-उपनगरातल्या मतदारसंघात सदर उपनिवडणूक रीतसर पार पडली. जे. आर्. जयवर्धने सव्वीस हजार मते अधिक मिळवून विजयी झाले. अंगावर उडालेले चार शिंतोडे बदकाच्या शिताफीने झटकून टाकून सरकार तडकतत्परतेने राज्यकारभारात बुडून गेले. ¤

## □ वेगळ्या जातीचा शिकारी

'शिकाऱ्याने वाघास मारिले' या वाक्यात कोणता प्रयोग आहे ते सुबोध/सुलभ मराठी व्याकरणाचे पुस्तक पाहिल्याशिवाय मला सांगता येणार नाही. खरे म्हणजे पुस्तक पाहिल्यावरसुद्धा सांगता येईलच अशी खात्री मी देऊ शकत नाही. शाळेत असेच व्हायचे. 'शिकाऱ्याने वाघास मारिले' या वाक्यातला व्याकरणाचा संदर्भ निखळून पडायचा आणि डोळ्यांपुढे खरीखरी शिकार दिसायला लागायची. 'खरीखरी' असे म्हटले खरे; पण इथे कोणाच्या आजोबांनी शिकार केली होती? मात्र 'नवयुग' किंवा 'अरुण' वाचनमालेतल्या 'आरशाचा पराक्रम' आणि 'तपकिरीने वाचवले' या दोन शिकारकथा लहान शाळेत वाचल्या होत्या; कोणाकोणाकडून शिकारीच्या सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकलेल्या होत्या; शिवाय कल्पकतेची गरिबी माझ्यापाशी केव्हाही नव्हती; त्यामुळे माझी शिकार चांगली रंगायची.

पाठ्यपुस्तकाच्या बाहेरचे इंग्रजी वाचायला लागल्यावर सुरुवातीला जी पुस्तके लावून आणि मन लावून वाचली त्यात 'मॅन-ईटर्स ऑफ कुमाऊँ' हे पुस्तक भेटले होते. लेखक होता कोणी जिम कॉर्बेट. या पुस्तकाने मला अंकित करून सोडले. मग कॉर्बेटची इतर पुस्तके वाचली. कल्पकतेच्या गरिबीचा अनुभव घेतला. अर्थात तात्पुरता. कारण कॉर्बेटच्या पुस्तकातल्या गच्च तपशिलाच्या ऋणावर मी माझी कल्पकता, शिकार या विषयाच्या बाबतीत, एकदाची धनाढ्य करून टाकली. मनात आणले असते तर त्या वेळी मराठीतले शिकारकथांचे दालन मी समृद्ध करून ठेवले असते; पण माझे मन तसे शहाणे आणि संयमी आहे. शिकार करणाऱ्यांनीच शिकारकथा लिहायचा एक अवघड संकेत मराठीत रूढ होऊन बसला आहे. हा संकेत, वाचकांना फसवून का होईना, मोडणे मला अयोग्य, अनुचित व अस्वाभाविक वाटले. असो.

जिम कॉर्बेट वेगळ्याच जातीचा शिकारी होता. हवे तसे वाघ मारून आपले पौरुष शाबित करायची खवखव त्याला नव्हती. त्याने फक्त नरभक्षक मारले : मारगिरी करताना द्वंद्वयुद्धातले सगळे उमदे संकेत त्याने कसोशीने पाळले. (नाही तर वाघांच्या शिकारीच्या काही कहाण्यांत शिकारीच वाघापेक्षा हिंस्र, पाशवी आणि रक्ताला चटावलेले वाटतात.) त्यामुळे कॉर्बेटच्या शिकारकथांत नाट्य कसे श्वास रोधून उभे असते आणि त्यांची ती जेवढ्यास तेवढी निवेदनभाषा. मराठीत शिकारकथा लिहिणाऱ्यांनी त्या कथांची एक वेगळी भाषा सिद्ध केली आहे.

मी अजून खराखुरा, रानटी वाघ पाहिलेला नाही; पण जिम कॉर्बेटच्या कथा वाचल्यामुळे, मला तो दिसलेलाच नाही, असे म्हणता यायचे नाही. त्यामुळे, कोटीच्या मोहामुळे का होईना, पण 'वाघ' आडनावाच्या माणसाला कर्तबगारीचे वर्णन करण्यासाठी 'अजि म्या वाघ पाहिला!' अशी वात्रटिका मी लिहिणार नाही.

—अनंतराव

# तुमचे सहकार्य असेल तर मुदत पूर्ण झालेल्या पॉलिसीवरचे क्लेम्स आम्ही अधिक जलद देऊ शकू

**६४,८८९ क्लेम्स निकालात काढता आले नाहीत**
(कारण पॉलिसीधारकांनी आवश्यक तपशील दिला नाही.)
**पॉलिसीवरील रक्कम १,१९१ लाख रु.**

**३,२४,००० क्लेम्स निकालात निघाले**
(संपूर्ण तपशीलानिशी आलेले)
**रु. ८,१२४ लाखांची रक्कम दिली गेली.**

कालमर्यादा पूर्ण झालेल्या पॉलिसींवरील क्लेम्स निकालात निघण्यास विलंब लागण्याचे एक कारण असे आहे की पॉलिसीधारक आवश्यक तपशील संपूर्णपणे भरीत नाहीत.

पॉलिसीची कालमर्यादा पूर्ण होण्याआधी महिनाभर आयुर्विमा महामंडळ डिस्चार्ज व्हाउचर पाठवीत असते. हे व्हाउचर बरोबर भरून पॉलिसीसह महामंडळाकडे सत्वर पाठविले नाही तर विम्याचे पैसे मिळण्यास उशीर होतो.

तुमच्या पॉलिसीची कालमर्यादा पूर्ण झाली असेल आणि तरीही तुम्हांला डिस्चार्ज व्हाऊचर मिळाले नसेल (मानवी वा यांत्रिक चकीमुळे असे 1% बाबतीत घडू शकते) तर ताबडतोब, तुमच्या पॉलिसीसंबंधीचा अखेरचा व्यवहार महामंडळाच्या ज्या कचेरीशी झाला असेल त्या कचेरीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधा.


काही बाबतीत महामंडळाकडून पाठविण्यात आलेले डिस्चार्ज फॉर्म पॉलिसीधारकांना मिळत नाहीत, कारण त्यांच्या पत्त्यात घडून आलेला बदल त्यांनी महामंडळाला कळविलेला नसतो. अशा बाबतीत महामंडळ तरी काय करणार ?

**पॉलिसीधारकांचा पत्ता माहित नसल्यामुळे निकालात निघू न शकणाऱ्या क्लेम्सची १९७३-७४ मधील संख्या ४,०३४ आहे.**

**१९७२-७४ मध्ये डिस्चार्ज फॉर्म किंवा पॉलिसी डॉक्युमेंट महामंडळाकडे परत न केल्यामुळे पडून राहिलेल्या क्लेम्सची संख्या ५१,५५२ म्हणजेच एकूण बाकी क्लेम्सच्या ७९% इतकी मोठी आहे.**

आवश्यक ते दस्तऐवज व माहिती ज्यांच्याकडून आली ते सर्व क्लेम्स निकालात निघाले. डिस्चार्ज फॉर्म योग्य रीतीने भरून पॉलिसीसह तो परत केला तर पैसे मिळण्यास सहसा अडचण पडत नाही.

**१९७३-७४ मध्ये ३,२४,००० मॅच्युरिटी क्लेम्स निकालात निघाले. आणि महामंडळाने रु. ८,१२४ लाख रु. ची रक्कम पॉलिसीधारकांना दिली.**




आपल्या सेवेसाठी आपले सहकार्य हवे.

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

RADEUS/LIC/AS-9

# युरोप

## हेलसिंकीत काय साधले ?

वा. दा. रानडे

हेलसिंकी येथे भरलेल्या पस्तीस राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेत युरोपची सुरक्षितता व सहकार्य यासंबंधीच्या सर्वमान्य निवेदनावर सह्या झाल्या· हा शांततातह किंवा करार नव्हे. कायदेशीरदृष्टचा हे निवेदन सही करणाऱ्या कोणत्याही राष्ट्रावर बंधनकारक नाही. पश्चिम युरोप व पूर्व युरोपातील राष्ट्रे यांच्यातील तंग वातावरण दूर होऊन शांतता व सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत हा या निवेदनाचा मुख्य उद्देश आहे.

दोन्ही बाजूंना मान्य होईल असे घोषणापत्र किंवा निवेदन तयार करण्यासाठी दीर्घकाळ वाटाघाटी व विचारविनिमय चालू होता. तीन टप्प्यांनी हे काम पूर्ण झाले. दोन वर्षांपूर्वी हेलसिंकीस झालेली उपराष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांची परिषद हा पहिला टप्पा. घोषणापत्राचा सर्वसंमत मसुदा तयार करण्यासाठी जिनिव्हा येथे गेली दोन वर्षे चाललेल्या वाटाघाटी हा दुसरा टप्पा आणि घोषणापत्रावर सही करण्यासाठी हेलसिंकी येथे नुकतीच झालेली राष्ट्रप्रमुखांची परिषद हा तिसरा व अखेरचा टप्पा.

ही परिषद म्हणजे रशियाचा विजय आहे अशी टीका काही अमेरिकन पत्रांतून करण्यात आली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व-युरोपातील राष्ट्रांत कम्युनिस्ट राजवटी स्थापन झाल्या. त्यांच्यावर शिक्कामार्तब या या परिषदेत केले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. रशियाने बाल्कन राष्ट्रांचा घेतलेला ताबा आणि पूर्व युरोपच्या सध्याच्या सीमा कायमच्या मान्य करण्यात आलेल्या नाहीत असे हेलसिंकीला जाण्यापूर्वी वॉशिंग्टनमध्ये विमानतळावर केलेल्या निवेदनात अमेरिकेचे अध्यक्ष फोर्ड यांनी सांगितले होते. लिथुआनिया, लाटव्हिया व एस्थोनिया ही बाल्टिक राष्ट्रे रशियाने आपल्या प्रदेशास जोडली हे अमेरिकेने कधीच मान्य केलेले नाही व करणार नाही असे त्यांनी सांगितले. सध्याच्या सीमांमध्ये शांततेच्या व वाटाघाटींच्या मार्गाने फेरबदल करता येतील असे अभिवचन वॉर्सा-करार राष्ट्रांकडून आम्ही मिळविले असल्याचा उल्लेख फोर्ड यांनी केली. फोर्ड यांनी म्हटल्याप्रमाणे तरतूद हेलसिंकी परिषदेने संमत केलेल्या घोषणापत्रात आहे हे खरे; पण त्याला कराराचा कायदेशीर दर्जा नाही. त्याच्या अंमलबजावणीची सक्ती कोणी कोणावर करू शकत नाही. तेव्हा प्रत्यक्षात पूर्व युरोपच्या सध्याच्या सीमा बदलल्या जाण्याची शक्यता नाही. तसेच लिथुआनिया, लाटव्हिया आणि एस्थोनिया या छोट्या बाल्टिक राष्ट्रांवरील रशियाची सत्ता तिला सोडायला लावण्याच्या बाबतीत अमेरिका काही करू शकेल असे वाटत नाही. शांततेच्या मार्गाने सीमा बदलण्याचा उल्लेख आहे तो मुख्यतः दोन जर्मनींना अनुलक्षून आहे. त्यांना एक व्हावेसे वाटले तर होता येईल; पण हे सुद्धा प्रत्यक्षात कितपत साध्य होईल याची शंका आहे.

पूर्व आणि पश्चिम युरोपच्या दरम्यान अधिक खुला प्रवास, माहितीची अधिक मोकळेपणाने देवघेव व्हावी असे घोषणापत्रात म्हटले आहे. रशियाकडून ही मोठी सवलत आपण मिळविली असा पाश्चात्य राष्ट्रांचा दावा आहे; पण हेलसिंकी परिषदेतील ब्रेझनेव्ह यांच्या भाषणाचा सूर पाहता या सवलतींचा फायदा पाश्चात्य राष्ट्रांना फारसा मिळू शकेल असे वाटत नाही. ब्रेझनेव्ह म्हणाले, ' माहितीची अधिक खुली देवघेव यासारख्या बाबींबाबत पाश्चात्य राष्ट्रांनी जादा आशा बाळगू नयेत.' याबाबतीत रशिया आपले सावधगिरीचे धोरण यापुढेही चालू ठेवील हे त्यांनी सूचित केले. ' शांतता व एकमेकांवरील विश्वास वाढविण्यासाठी माहिती–माध्यमांचा (म्हणजेच वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन वगैरे साधनांचा) उपयोग होतो. तसेच राष्ट्राराष्ट्रांत वितुष्टाचे विष फैलावण्यासाठीही या साधनांचा उपयोग केला जातो असे त्यांनी सांगितले. आपल्या देशातील अंतर्गत प्रश्न कसे सोडवावयाचे, कारभार कोणत्या पद्धतीने करावयाचा हे ठरविण्याचा सार्वभौम हक्क त्या त्या देशातील लोकांना आहे. त्यात कोणी हस्तक्षेप करता कामा नये हे त्यांनी स्पष्ट केले. पूर्व युरोपातील सध्याच्या कम्युनिस्ट राजवटी बदलण्याचा प्रयत्न कोणी करू नये हेच त्यांना यातून सूचित करावयाचे होते. शस्त्रस्पर्धा थांबविण्यास आपणास कितपत यश येते यावर युरोपातील टिकाऊ शांतता अवलंबून आहे हेही त्यांनी स्पष्ट केले.

परिषदेच्या घोषणापत्रात दिलेली आश्वासने आपण अंमलात कितपत आणतो यावर परिषदेचे खरे यश मोजले जाणार आहे, यावर अध्यक्ष फोर्ड यांच्या भाषणात भर होता. खुला प्रवास, माहितीची खुली देवघेव याबाबत रशिया व कम्युनिस्ट राष्ट्रांनी दिलेल्या आश्वासनांचा या संदर्भात त्यांनी उल्लेख केला. टिकाऊ शांततेसाठी शस्त्रकपात, फौजा काढून घेणे हे प्रश्न महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले आणि संहारक अण्वस्त्रांच्या वापरास आणि निर्मितीस मर्यादा घालण्याबाबत रशियाशी होणाऱ्या करारास आपण अग्रस्थान देत आहोत असे ते म्हणाले.

हेलसिंकी परिषद हे टिकाऊ शांततेच्या मार्गावरील पहिले पाऊल आहे. पूर्व व पश्चिम युरोपांतून फौजा काढून घेण्याच्या प्रश्नावर करार करणे, तसेच संहारक अण्वास्त्रांच्या वापरावरील निर्बंधाबाबत रशिया-अमेरिकेने कराराचा पुढचा टप्पा गाठणे ही यापुढची पावले आहेत. त्यात कितपत प्रगती होते यावर जगाच्या शांततेचे भवितव्य खरोखर ठरणार आहे. हेलसिंकी परिषदेत दिलेल्या आश्वासनांची कितपत अंमलबजावणी झाली याचा आढावा घेण्यासाठी जून १९७७ मध्ये परिषद भरणार आहे. रशिया-अमेरिकेचे संबंध सध्या संघर्षाऐवजी मैत्री व सहकार्याचे असल्याने वरील दोन्ही टप्प्यांच्या बाबतीत प्रगती होण्याची शक्यता आहे.

□

# जैतुन

● अरुंधती शुक्ल ●

'जैतीऽऽ... ए छोरी, उठ तो।'

जैतुनच्या अम्मीनं रसोईघरात भांडी पालथी घालता घालता हाकारलं. जैतुन, – तिची माँ आळसटून आडव्या झाल्या होत्या मधल्या कमऱ्यात. जैतुनला त्या हाकेनं किंचित जाग आली. तिनं डोळे उघडून पाहिलं. बाहेरचा प्रकाश पाहून तिला आपण आता उठणार ते सकाळी की संध्याकाळी ते लक्षात येईना. तिने डोळे चोळलेन्. तिचा उस्मानभैया आईन्यापुढं उभं राहून भांगे पाडत होता. 'या अल्ला ! किती वाढलेत उस्मानभैयाचे बाल !' पण ती त्याच्याशी काहीच बोलली नाही. त्याच्याकडे बघता बघताच तोंडात जमलेली थुंकी तिनं गिळून टाकली. त्या घुटक्याला कांदा आणि ताज्या मसाल्याचा वास होता. तिला खाल्लेल्या मटणाच्या कालवणाची आठवण झाली. तिनं ओठावरून जीभ फिरवली. आता दर्ग्यात जायचंय् नाही का ? ती गडबडीनं उठली. शेजारी झोपलेल्या मामेवहिणीला हलवून ती न्हाणीघरात गेली.

न्हाणीघरात भांड्यांचा राखोडा पडला होता. 'अम्मी, वर्तन घासनेकु मुझे उठाया नहीं तो ?' तिने अम्मीला विचारले. अम्मी मोठ्या पातेल्यात चायचे पाणी ठेवत होती.

'चलो, जल्दी तैयारी करनेकी है। आता टैम होत आला. उस फाझलभाईके घर भेज देना उस्मानको. उसे बुलाना है–नहीं तो भलतीच देर होईल. एकदा भीड सुरू झाली की...! उस ताटमें बत्तासे रख दे हाँ !'

अम्मीनं तिला दुसरी कामं सांगितली. तिच्या अम्मीनं आपल्या भावाच्या हातून मिरासाहेबाला गालीफ चढवायचं ठरवलं होतंन्.

मीरासाहेबाच्या उरसाचा आज दुसरा दिवस. पहिल्या दिवशी इतकी गर्दी असते की दर्ग्यात जायला रास्ता पण मिळत नाही.

'अम्मी, मई जाता हूँ !' उस्मानने बाहेरूनच अम्मीला सांगितलं.

'अरे, अंदर आके चाय तो लेके जा !' ती त्याला आत बोलवू लागली; पण त्या आधीच तो गल्लीच्या वळणापर्यंत गेलासुद्धा.

'भाभी, आओ, चाय लो !' अम्मीनं तोंड धुऊन आलेल्या भाभीला आणि झरीनाला चहा दिला.

जैतुननं गलीफाच्या एका ताटात बत्तासे ओतले आणि ती आपले नवे सलवारखमीस शोधू लागली.

'डिंग डिंग डिंग डिंग
डिंग डिंग डिंग डिंग डिंगांऽऽग डिंग'

फाजलभाईची बोटं ढोलक्यावरून घसरून आवाज करू लागली आणि जैतुनच्या मामुनं गालीफाचं ताट हातात घेतलं. तो पुढं चालू लागला. मागनं जैतुनचे अब्बा आणि गल्लीतले सगे !

'जैतीऽ चलो तो !' झरीनानं पायरीवरून जैतीला हाक मारली.

'आयी, आयी' असे म्हणत जैतुन पुन्हा एकदा आयन्यात डोकावली. डोक्यातले चांदीचे चाप घट्ट करत आणि त्यावरून आदबशीर दुप्पट्टा घेत ती बाहेर आली. जैतुनची अम्मी 'पांढरं' अंगाभोवती गुंडाळून घेताघेताच भाभीला घेऊन निघाली.

'लई भीड होती है ! हां, मऱ्हाटयांची बी ! मीरासाहेबको 'मलीदा' देनेकु, अब तुला दिखाई देगाही.' तिच्या भाभीला हे सारंच नवीन होतं.

उरसाच्या प्रमुख रस्त्यावर हीऽ गर्दी होती. त्या गर्दीचा गोंगाट, तिथं लावलेल्या लाउडस्पीकरवरून किंचाळणाऱ्या रेकॉर्डस्. जैतुनला बोलावू लागल्या आणि त्या भराभर पुढे गेल्या. दहावीतली जैतुन आपल्या लहान मामेवहिणीला वर्गातल्या गमती सांगत होती.

'जैतुन, कौनसे ईस्कुलमें जाती है ?' मऱ्हाटी ?' तिच्या भाभीने मधेच विचारले. तशी मीरासाहेबाचे कौतुक करणारी अम्मी तिच्याकडे बघू लागली.

'आँ ? जैतुन व्हय ! दसवीमें है. मऱ्हाटी शालाच है. मगर जैतुन अभ्यासात लई चांगली हाय. लई अभ्यास करती बघ. बेटी हाय इसीलिये तो जी ना कहता है आगे सिखानेकु.' अम्मी.

'उस्मानकी शादीका क्या ? कोई इरादा हाय का ?'

'क्या बात निकालती गे ? वैसा वो बडा



हाय जैतुनसे–चार बरसोंका फरक हाय. मगर जैतुनका थोडा दिमाग लेता तो...! नवमीमेंसे शाला छोड दी और लगा बझारमें भटकने. उसके अब्बाका तो एक न मानता. मैंने भी कहा–इत्ता बडा दूकान जो है मार्कीटमें–वहाँ तो बैठ जरा–आखिर अपना क्या ? धंदा हायच ना ! मंग पढाईकी वैसी तैसीच ! उसका ध्यान किधर हय्–कुछ मालूम पडता नय !' अम्मी.

'हमारे यहाँ भेज दो थोडे दिन के लिये' भाभी.

'पिछले साल बंबईवाले मामूके यहाँ गया और आया ये बाल बढाके–मूँछे बढाके. मई मीरासाहबके मुजावरके पास बोली हूँ उसके वास्ते ऽ'

बात फिरून मीरासाहेबावर आलेली पाहून भावी गप्प झाली. गालीफाचा घोळका मंद गतीनं पुढं सरकत होता. त्यांची वाट पहात जैतुन आणि झरीना गल्लीच्या तोंडाशी उभ्या होत्या. रस्त्यावरची गर्दी न्याहाळता न्याहाळता त्या गप्पा मारू लागल्या.गल्लीच्या तोंडाशी एक मोठी पाटी होती. तिच्याकडे बोट करून जैतुन झरीनाला म्हणाली, 'वो देख पोस्टर ! कित्ता बडा बनाया है। कौनसे पिच्चरका है... 'जॉनी मेरा नाम'...तू बघतीस काय ग पिच्चर? तेरेकु कौन आवडतंय् ?'

पण झरीना काही बोलायच्या आत तिने त्या पिच्चरची 'इस्टोरी' सांगायला सुरुवातही केलीन

'इसमें जो हेमामालिनी होती है ना तो उसे देवानंद जो होता है वो प्यार करता है। और आखिरला तर बहूत ढिशॅव...लगता है, व्हिलनकु ! मुझे हेमामालिनी लय आवडतीय बघ.'

झरीना भारावून त्या पोस्टरकडे पहात होती. जैतीनं सांगितलेली 'इस्टोरी' ऐकून तर तिला खुळावल्यागत झालं. 'अपुन कब बघायचा हा पिच्चर ?' तिनं आशाळभूतपणे जैतुनला विचारले.

'ना री बाबा ! अम्मी मेरेकु रट्टा मारलं–मैंने ये पिच्चर दो बार देखा जो है। ये फिरसे उसके वास्ते...यहाँ आया है ! अपुन दुसरा पिच्चर देखेंगे.'

येवढ्यात गलीफाचा घोळका त्यांच्यापाशी आला. त्या त्या घोळक्यात मिसळल्या आणि चालू लागल्या; पण त्यांना पुन्हा थांबावंच लागलं. कारण गल्लीचा रस्ता जिथे चौकात मिळत होता तिथे रुंदावलेल्या जागेत गलीफाच्या सगळ्या घोळक्याने फाझलभाईला वेढून टाकलं. आता फाझलभाई स्वतःचे कसब दाखवू लागला. त्याची बोटं, अत्तारभाईची पिपाणीवरली बोटं, ताशेवाल्याची बोटं यांनी एकमेकांना चिडवायला सुरुवात केली आणि घोळक्यातल्या लोकांचे चेहरे उजळून निघाले. 'आत्ता मजा येणार' अशा अर्थाने त्यांनी एकमेकांना बतावणी केली आणि ते सगळे सैलपणाने तंबाखू चोळू लागले.

आता जैतुनला आणि झरीनाला दम धरवेना. 'अम्मी मैं आगे जाती हूँ–वो देख मेरी सहेलियाँ भी दिखाई दे रही है। झरीनाको मैं नहीं लेती' असे अम्मीला सांगून ती गलीफाच्या घोळक्यातून बाहेर पडली आणि मैत्रिणींकडे गेली.

'ए ती बघ जैतुन' 'ए विमल ठेर ना...' अशा हाकांचे प्रतिध्वनी उमटवीत जैतुन त्या घोळक्यात सामावली. तिच्या शाळेतल्या मैत्रिणी उरसात हिंडायला आलेल्या पाहून तिला आनंद झाला. तिने गलीफाची बातमी त्यांना दिली. त्या कुतूहलाने त्या घोळक्याकडे पाहू लागल्या; पण चट्टेरीपट्टेरी लुंग्या, कुडते आणि आवाजच फक्त त्यांना ऐकू आले. म्हणून त्या उरसात शिरल्या. उरसाच्या रस्त्यावर खूप गर्दी होती. दुकानांची–छोट्या मोठ्या दुकानांची. भांड्यांची, यंत्रांची, दुकानं; बांगड्यांच्या दुकानाला चिकटली होती. बांगड्यांची दुकानं कपबशांच्या दुकानाला खेटली होती. रस्ता जिथे रुंदावला होता तिथे 'पिघलनेवाली लडकी' तंबू ठोकून होती. त्या कनातीसमोरच होमगार्ड आणि पोलिसांची कनात होती. 'तुम्हाला मदत हवीय का ?' अशी पाटी बाहेर लटकावून ठेवलेली होती.

जैतुनला आणि तिच्या मैत्रिणींना काय पाहू आणि काय नको असं झालं. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दुकानं होती. 'ए, आपण असं करू या का ? जाताना डाव्या हातानं सगळी दुकानं बघू आणि येताना त्या बाजूची...' विमलनं आपलं डोकं चालवलं आणि ती योजना सगळ्यांनाच आवडली. 'अग, पण आपण कुठपर्यंत जायचं ?' एकीची शंका. 'जाऊ चांगलं दर्ग्याच्या त्या कोपऱ्यापर्यंत' तिला परस्पर दुसरीनेच उत्तर दिले.

'ई ऽ ... नको बाई, दर्ग्यापाशी फार गर्दी असेल. इथच इतकी आहे तर तिथे...किती धक्के बसतायत, वाट सुद्धा काढता येत नाही.'

'ए यडे, इतकी का भितीस ? पोलीस आणि होमगार्डस बघ किती आहेत ? काही होत नाही चल...'

'हाँ, आज भीड जरा कमीच हाय. कल याच्यापेक्षा लई होती !' जैतुनने दिलासा दिला. 'आज फकस्त गालीफवाल्यांचीच भीड असणार.'

हो–नाही करता करता त्या सगळ्याजणी पुढे चालू लागल्या. दुकानं पाहू, दुकानातल्या वस्तू पाहू–कि गर्दीनं अंगावर मिरवलेल्या वस्तू पाहू असा प्रश्न त्यांना पडला. बहुतेक गर्दी मुसलमान बायकांचीच होती. रेशमी सलवारी, चकाकती खमीसं आणि नॉयलानच्या गडद ओढण्या, अशा थाटात त्यांच्यासारख्याच अनेक जणी गर्दीत हिंडत होत्या, दुकानातून गर्दी करत होत्या. आइसफ्रूट खात होत्या.

जैतुन, ती बघ हेमामालिनी आलेली दिसतीय ग!' त्यांनी शाळेतल्या एका बाईंना 'हेमामालिनी' नाव ठेवलेले होते. थोड्याशा स्थूल, पण हसतमुख असणाऱ्या एका बाईंना त्यांनी 'दुर्गा खोटे' नाव ठेवलेलं होतं. नावं केव्हा आणि कशी, का आणि कोठे ? हे त्यांना आता आठवतही नव्हतं...शाळा झाडणाऱ्या पारूला 'जंक्शन' नाव कसं पडलं ? शाळेसमोर चिंचा विकणारी 'वैनी' कुणी नावं पाडली कोण जाणे–पण वरच्या वर्गातल्या मुलींनी या लहान वर्गातल्या मुलींना हा नावांचा वारसा देऊन मगच शाळा सोडलेली असायची. जैतुनला या मैत्रिणींमुळे आणि अशा गंमतीजमतींमुळे ही शाळा फार आवडत असे. शाळेतल्या शिक्षिकाही तिच्याशी चांगले वागत. त्यातल्या त्यात 'हेमामालिनी' तिच्या खास आवडीची. गेल्या वर्षी या शाळेत आल्यापासूनच तिला त्या आवडत होत्या. शाळेतील सर्व शिक्षिकांमध्ये त्या एकट्याच तरुण होत्या. रंगीबेरंगी पातळं नेसायचं आणि फुलांचं त्यांना वेड होतं. खरं म्हणजे त्या हेमामालिनीसारख्या फारच क्वचित दिसत–फक्त लाल साडीत–

लाल साडीचा एक ठिपका गर्दीत मागेपुढे होताना दिसत होता खरा–

'हट री–मेरेकु बंडल मारती काय ग ? एवढ्या गर्दीत बाई कशा येतील ?' जैतुन.

'अग खरच–चल, आपण त्यांना भेटून विचारू या काय काय घेतलं म्हणून ?'

'नको, आधी हिंडू या. मग विचारू या. म्हणे त्यांना–काय एवढं अगदी लगेच भाव द्यायला नकोय त्यांना...काय तरीच तुमचं दिसल्या बाई की चालल्या बै–बै–करत...!'

कुसुमने त्यांच्या बेताची चांगलीच फरफर केलीन.

मग किंचित काळ गप्प होऊन त्या एका दुकानात शिरल्या. 'या कानातल्याची काय किंमत आहे हो?' 'या गंगावनाची काय किंमत?' 'ए, जैतुन, हे बघ तुला हवे होते तसले फूल. घे तुला ओढणीला लावायला...' 'कैसा दिया रे?' जैतीनं मिशेवाल्या दुकानदाराला विचारलं. 'चार रुपिया...' तो खरवडलेल्या आवाजात बोलता. 'या अल्ला! बहुतही दाम बोलला रै? कमती कर दो ना—जरा!' जैतुनने त्याला गळ घातली.

एका वेळी अनेक जणींनी प्रश्न विचारल्यामुळे दुकानदार अगोदरच कावला होता. 'या पोरी काही घेणार नाहीत. नुसतंच हे बघू' 'ते जरा काढा' करणार असंही त्याला वाटत होतं. त्यात जैतुनचे हे शब्द.

'ए छोरे, लेना हो तो चार रुपियेको ले जाव्—खालीपिली ऽ...... कमती नाय अन् काय नाय.'

झालं. सगळ्या चिमण्यांनी आपले पंख मिटले आणि कलकलाट करत आणि त्याच्याकडे रागाने बघत त्या खाली उतरल्या. सगळंच गिऱ्हाईक गेल्यामुळं तो जास्तच चिरडीला आला. त्या मात्र त्याला अंगठा दाखवत दुसरीकडे गेल्या.

अंगठ्या, फुलांचे गजरे, गंगावनं अशी खूप खरेदी मग झाली. जैतुन त्यांच्यातच रमून गेली. गालीफाच मग तिच्या लक्षातही राहिलं नाही. मैत्रिणींबरोबर हिंडत हिंडत तिनं उरसाचे दुसरे टोक गाठलेन सुद्धा. त्या बाजूला हलवायांची मोठी मोठी दुकानं होती. भेळीच्या गाड्या, मिसळीसाठी कनाती, मीना आइसकांड्या सगळं होतं. ते पाहिल्यावर त्यांना आपले पाय दुखत असल्याची जाणीव झाली आणि ५।१० मिनिटं टेकण्यासाठी म्हणून त्या कनातीत शिरू लागल्या.

त्या कनातीत शिरताना त्याच वेळी समोरून एक तरुण येत होता. त्यांच्यापैकी कुणाचेच लक्ष आजूबाजूला फारसे नव्हते. चालताना गर्दीमुळे त्या पुढंमागं होत असत. मग पुढच्या मुली मागं वळून वळून बोलत. त्यामुळं त्यांचंही लक्ष नसे आणि मागच्या मुली जरी चालल्या तरी बोलण्यात गुंतल्यामुळे त्यांचे आजूबाजूला लक्ष नसे.

त्याच्या कनातीत शिरताना असेच झाले. समोरून येणारा मुलगा भिडायला आला तरी त्यांचे कुणाचेच लक्ष नव्हते. पण त्या मुलाला चुकवताना कडेने चालणाराची त्रेधा उडाली. तिनं अंग चोरलं आणि किंचित आत सरकत तिनं त्या मुलाला जाऊ दिले. त्यामुळे दुसरीच्या अंगावर रेलल्यासारखे झाले.

'कुणीकडं बघतीस...कुणीकडं चालतीस ........ऽऽ' असं तिला बोचकारत त्या बाकावर बसल्या.

'ए, सहा मिसळ आण रे......' एकीनं ऐटीत ऑर्डर सोडली. त्या बाकाकर बसून सगळ्याजणी बाहेरच्या उरसाच्या गर्दीकडे बघू लागल्या.

'ए, हेमामालिनी बरीच खरेदी करतीय् वाटतं!' कोणी तरी अंदाज व्यक्त केला.

'ए, तुझी ती माळ बघू ना मला ऽ'...... मग त्या सगळ्यांचे लक्ष बाहेरच्या गर्दीवरून उडाले. त्या आपापली खरेदी तपासू लागल्या. तेवढ्यात मिसळीच्या प्लेटी आल्या.

पण जैतुनचे या गोष्टींकडे लक्ष नव्हते. ती बाहेरच पहात राहिली. 'तो मुलगा कोण होता? उस्मानभाई? तिला संशय आला. चट्टेरीपट्टेरी शर्ट, लालरुमाल आणि मजमुँआचा कंटाळवाणा वास, उग्र-वस्सकन् नाकाला झोंबणारा......नक्कीच......ती. शरमली. आपल्या या मैत्रिणी विमल, पाटील उषा मिसळ.........काय म्हणतील-जरं त्यांना कळलं की उस्मानभाई ऽ.........

ती मुकाट्याने मिसळ खाऊ लागली.

पैसे देऊन त्या कनातीबाहेर पडल्या; पण आता पोट भरल्यामुळे त्या आळसावल्या होत्या मघाचा दंगा कमी झाला आणि पाय थोडे रेंगाळू लागले. हसणं मालवलं: परतीच्या ओढीनं पाखरं कशी निःशब्द झेप घेत परततात तशाच त्या!

ए ऽ लावेला ऽ ए ऽ लावेला ऽऽ

ए ऽ मीना मीना, ए ऽ मीना ऽऽ आइसफ्रूटवाल्यांनी एकमेकांच्या आवाजावर ताण करणारे आवाज काढले होते. जैतुन आणि तिच्या मैत्रिणींची तोंडं तिखट मिसळीनं हुळहुळल्यासारखी झाली होती. आइसफ्रूट पाहून त्यांनी हातगाडीभोवती गर्दी केली. लाबेलाच्या गारगार चवीने त्या पुन्हा चेकाळल्या. एकमेकींना लाडानं ढकलू लागल्या.

पण एकदम कसला तरी गलका झाला. रस्त्यात मध्येच गर्दी तुंबली. माणसांची एकामागं एक अशी पुष्कळ चक्रं तयार झाली आणि बाकीचे त्या गोलाकडेच पहात राहिले. 'पकडला' 'पकडला'चे आवाज, पोलिसांच्या लाठ्यांचे आवाज उंचावले होते.

त्या भेदरल्या. नकळत मागे सरकल्या. ही गर्दी आता आणखी मागे सरकली तर? ही चक्रं रुंदावत गेली तर? जैती व तिच्या मैत्रिणींना नेमकं काय झालं हेच कळेना. घाबरलेल्या त्या सर्व जणी गर्दीकडे पाहू लागल्या. 'पोलिसांनी पकडलं असेल एखाद्याला' एकजण पुटपुटली. 'गर्दीचा फायदा घेऊन धक्के मारतात; पण या वेळी पोलीस बंदोबस्त पुष्कळ आहे कि नै ग? बरं झालं, पकडलं ते!' 'मघाशी सुद्धा एक मुलगा किती जवळून गेला होता किनई, हात मुद्दाम असाऽ ठेवतात...!'

'अग एऽ आपल्या बाई आहेत की त्या गर्दीत. ते बघ लाल पातळ दिसतंय बघ. त्यांनाच धक्का मारला काय?'

'एऽ आपण पुढे जाऊन बघू या का?'

'एऽ मूर्खऽ आता त्या गर्दीत कशाला? म्हणजे धक्केच खायला नाऽ— आपण आता घरी जाऊ या बाईऽ—!'

गर्दीचं कोंडाळं फुटलं आणि त्यातून पोलिसांचा दंडुका प्रथम बाहेर आला. त्या मागून तो मुलगा.

'ईऽ तोऽच मुलगा बघ! बरं झालं!'

जैती ऽ मात्र भोवतालच्या मैत्रिणी, गर्दी सगळं विसरली. तिला फक्त दिसत होता उस्मानभाई, पोलिसांच्या मागून जातानासुद्धा मग्रुरीने जाणारा.

'असल्यांचे चमनगोटे करून लावून देतात म्हणे!' नको त्या विषयाचे दडपण त्यांच्यावर पडले. त्यांचाच उत्साह ओसरला. गर्दीतून सावधपणे वाट काढत त्या घराकडे चालू लागल्या. जैतुन तर अगदीच गप्प गप्प झाली होती; पण आता तिचा मुकेपणा कुणाच्याही लक्षात आला नाही. कुणी तिला 'का गप्प ग?' म्हणून हलवलं नाही.

सगळ्या मैत्रिणी मोठ्या रस्त्याला लागल्यावर जैतुन तिठ्यावरच्या पोलिसांच्या कनातीपाशी नकळत रेंगाळली. तिला अम्मीची आठवण झाली. तेवढ्यात उस्मानभाई बाहेर आला. त्याचे बाल गायब झालेले होते. ती पुढं झाली.

तिला समोर पाहिल्यावर त्याचा चेहरा चमत्कारिक झाला. डोक्यावर केस नसलेला उस्मानभाई कसा तरीच दिसत होता. त्याचे सरळ नाक फारच पुढे आल्यासारखे वाटत होते. गालावरचे कल्ले आणि डोक्याचा गोटा! किती विचित्र दिसत होता उस्मानभाई! इतक्यात जैतुन कळवळून ओरडली 'अम्मी गे!'

उस्मानभाईने का कुणास ठाऊक, जैतुनच्या गालावर चपराक दिली होतीन्!

□ □

**मूळ लेखक : पियर्स पॉल रीड**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**
**लेखांक : तीन**

: १ :

इकडे, सँटियागो विमानतळाच्या हवाई–नियंत्रणविभागाचा फेअरचाइल्डशी संपर्क तुटल्यावर त्यांनी लगेच ए. आर. एस. ला टेलिफोन केला. संकटात सापडलेल्या विमानाला संरक्षण आणि मदत देण्याचं काम ए. आर. एस. तर्फे ( एरियल रेस्क्यू सर्व्हिस ) केलं जातं. मुख्य कमांडर हजर नसल्यामुळं दोन साहाय्यक कमांडरना बोलावून घेण्यात आलं. नियंत्रणाखेरीज त्यांना प्रत्यक्ष विमान-उड्डाणाचंही शिक्षण मिळालं होतं. त्यांची नावं होती कार्लस अन् जॉर्ज. ते चिली एअरफोर्सचे अधिकारी होते.

ज्या ठिकाणाहून अखेरचा संदेश मिळाला होता, तिथे जाऊन दोघांनी शोध सुरू केला. डी सी–६ हे विमान त्यांच्या दिमतीला होतं. मुख्यतः पर्वतावरील परिसरात तपास चालू होता. तिथे काहीच दृष्टोत्पत्तीस न आपल्यामुळं क्युरिको आणि प्लँकनमधील नियोजित मार्गाकडे ते वळले. तेवढ्यात प्लँकनवर बर्फाचं वादळ सुरू झाल्यामुळं विमान सँटियागोला परतलं.

दुसऱ्या दिवशी कार्लस गेर्सिया आणि जॉर्ज मॅसा या दोघांनी, मिळालेल्या माहितीचा बारकाईनं अभ्यास केला. फेअरचाइल्डनं ' मेंडोझा ' सोडलं ती वेळ, मालार्गवरून जात असतानाची वेळ आणि अँडीजवरील वाऱ्याचा व विमानाचा वेग. त्यांनी असा निष्कर्ष काढला



विमानातली पहिली रात्र अत्यंत त्रासात गेली. पूर्ण तयारीनिशी तोंड देता न आल्यामुळं एकच गोंधळ उडाला होता. रात्रीतून तीन जण ठार झाले. कॅनेसा पुन्हा उपचार करू लागला. कडक थंडीमुळं जखमा पुन्हा चिघळण्याची धास्ती नव्हती एवढं तरी बरं! लिलियाला मिथॉल ही मध्यम वयाची स्त्री नर्स म्हणून काम बघू लागली. अननुभवी मुलांना तिचा खूपच आधार वाटायचा. वैमानिक 'लागूरारा' गतप्राण झालेला आढळला. तोच सर्वांचा अखेरचा आधार होता. संदेश देणे किंवा संकटकालीन दक्षता याबाबत सगळेच अनभिज्ञ होते. मार्सेलो पोरेझ तेवढा जबरदस्त आशावादी होता. मदत आल्याशिवाय राहणार नाही असा त्याला विश्वास होता. चॉकलेट, बिस्किटं आणि दारूचं 'रेशन' सुरू झालं. सुसानची परिस्थिती ढासळू लागली. दुसऱ्या रात्री थंडीपासून थोडा तरी बचाव व्हावा इतकी तयारी झाली होती. आठवडा तसाच गेला. आठव्या दिवशी सकाळी नॅन्दोनं बघितलं, तेव्हा सुसान मरण पावली होती.

की विमान क्युरिकोवरून जात असल्याचा वैमानिकाचा समज चुकीचा असावा. त्या वेळी ते प्लॅंकनवरच असावं. योग्य ठिकाणी न वळता पर्वताच्या मध्यावरच 'सॉसनीडो' किंवा 'पालोमो' पर्वतांच्या परिसरात ते कोसळलं असावं. नकाशावरील वीस चौरस इंचावर त्यांनी खूण केली. त्यानंतर सँटियागोहून दोन विमानांनी त्या जागी तपास करण्यासाठी कूच केलं.

त्यात अडचणी होत्याच. सरासरी १५००० फुटांपर्यंत पर्वत उभे होते. त्या भागात विमान नक्की कोसळलं असेल तर साधारण १२००० फूट उंचीवरच्या एखाद्या दरीत अडकलं असणार. दऱ्यांमध्येही वीस ते शंभर फूट उंचीचा बर्फाचा थर साठतो. शिखरांच्या उंचीवरून शोध घेताना, फेअरचाइल्डचा रंग पांढराच असल्यामुळं ते दिसून येणं अशक्य होतं. वादळाचा धोका पत्करून काम चालू ठेवणं याचा अर्थ आणखी काही विमानं आणि जीव गमावण्याची तयारी. तरीही शोध घेणं अत्यावश्यक होतं.

ए. एस. आर. च्या लोकांनी फेअरचाइल्डमधल्या लोकांची आशा सोडलीच होती. अँडीजवर शून्याखाली ३० ते ४० अंश तपमान जातं. दैवयोगानं अपघातामधून कोणी बचावलंच तर पहिल्या रात्री कडक थंडीच्या तडाख्यातून ते जिवंत राहण्याची शक्यता शून्य होती.

आंतरराष्ट्रीय संकेतानुसार, ज्या राष्ट्रात असा अपघात होतो, त्यानं दहा दिवस शोध घ्यायचा असतो. त्यामुळं ते काम चालू ठेवणं चिलीचं कर्तव्य होतं. त्यातून उतारूंचे नातलग सँटियागोमध्ये दाखल व्हायला सुरुवात झाली होती.

विमान बेपत्ता झाल्याची वार्ता प्रसृत झाल्यानंतर, सुरुवातीचे काही तास पालक अत्यंत काळजीत पडले. आधीच्या निवेदनात विमान आधी 'मेंडोझा'वर थांबलं होतं, असं सांगण्यात आलं, याचीही त्यांना कल्पना नव्हती. उलटसुलट वार्तांमुळं त्यांचा गोंधळ उडाला होता. सरकारतर्फे जास्त खुलासा होत नव्हता. अफवांना पीक येत होतं. शनिवारी डॅनियलच्या वडलांना विमान 'सापडल्या'चं वृत्त प्रथम समजलं; पण गंमत अशी की आदल्या रात्री रेडिओ न ऐकल्यामुळं विमान बेपत्ता झाल्याची त्यांना गंधवार्ताही नव्हती. काही जणांना समजलं की मुलं सुरक्षितपणे सँटियागोला पोचली. आणखी एक बातमी : सँटियागोऐवजी चिलीच्या दक्षिणेकडे कुठे तरी विमान उतरलं.

रॅफेल पॉन्स हा एक रेडिओप्रेमी मुलगा होता. तो सतत रेडिओला चिकटून असे. तो दुरुस्त बातम्या पुरवू लागला. 'ओल्ड ख्रिश्चन'चा खेळाडू असूनही, त्याची बायको सात महिन्यांची गरोदर असल्यामुळं तो संघात सामील झाला नव्हता. मार्सेलो पेरेझ त्याचा जानी दोस्त. त्याच्या घरी एक प्रखर शक्तीचा ट्रान्समीटरही बसवलेला होता. सँटियागोमध्ये हॉटेल 'बुक' करण्याचं काम त्यानं घरच्या रेडिओवरूनच केलं होतं. टेलिफोनपेक्षा ते स्वस्त जाई. असं करणं बेकायदेशीर असूनही त्याकडे दुर्लक्ष केलं जाई.

तेराव्या रात्री उशीरा त्याला विमान बेपत्ता झाल्याचं कळल्यावर त्यानं सँटियागोमधल्या हॉटेलशी संपर्क साधला. तेव्हा खेळाडू तिथे हजर झाल्याचं समजलं. मागून, त्याविषयी शंका निर्माण झाल्यावर पुन्हा तो हॉटेलमॅनेजरशी बोलला. त्या वेळी कळलं की फक्त दोनच खेळाडू—जे फेअरचाइल्ड गाठू शकले नाहीत असे—दुसऱ्या विमानानं तिथे पोचले होते. एक गिल्बर्टो रेग्यूल्स, दुसरा बॉबी जॉगस्ट.

विमानात असलेल्या एका खेळाडूच्या चिलीमधील वाग्दत्त वधूनं —मेरियानं— आपल्या 'सासरी' कळवलं की 'विमान एका छोट्या खेड्यात उतरलं आहे. सर्वजण सुखरूप.' याची शहानिशा करण्यासाठी रॅफेलनं सँटियागोमधील एका सरकारी अधिकाऱ्याशी बोलणं केलं. तेव्हा विमानाचा अजूनही शोध लागला नसल्याचं त्याला समजलं.

तोपर्यंत निम्म्याहून अधिक संबंधित कुटुंबांत विमान सापडल्याची वार्ता पोचली होती. त्यांची आशा खोटी असावी या भीतीनं रॅफेलनं त्या वार्तेच्या मुळाशी जाण्याचं ठरवलं. ज्या 'मेरिया'नं विमानाच्या सुरक्षिततेविषयी ग्वाही दिली होती, तिला त्यानं रेडिओवरून गाठलं. तिनं कबूल केलं की ती गोष्ट खरी नाही. विमान सापडेल याबद्दल तिला इतका जबरदस्त आत्मविश्वास वाटत होता की त्या भरात ती खोटं बोलून गेली होती.

रॅफेलनं तिचं बोलणं 'टेप' करून घेतलं आणि रेडिओकडे पुढच्या बातमीपत्रासाठी रवाना केलं. मध्यरात्रीनंतर त्यानं ट्रान्समीटर बंद केला. त्याचे श्रम वाया गेले नाहीत. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊपर्यंत सर्व अफवा नाहीशा झाल्या. विमान अद्याप सापडलं नव्हतं, हे सर्वांना कळून चुकलं.

'लॉस सेरिलॉस'मधील एस. ए. आर. च्या मुख्य कार्यालयात प्रथम हजर झालेली व्यक्ती म्हणजे कार्लस पेझ—कार्लिटसचे वडील. शुक्रवारी दुपारी केवळ योगायोगानं त्यांना अपघाताची वार्ता घट-

स्फोटित पत्नीकडून मिळाली होती. त्यांनी ओळखीच्या अधिकाऱ्यांकडून जास्तीत जास्त माहिती घेण्याचे प्रयत्न केले. शेवटी स्वतः जातीनं शोध घ्यावा या हेतूनं शनिवारी सकाळी ते सँटियागोकडे रवाना झ ले.

त्याच दिवशी दुपारी डीसी–६ मधून फेअरचाइल्डच्या अपेक्षित मार्गावरून त्यांनी निरीक्षण केलं. निराश होऊन ते परतेपर्यंत विमानतळावर आणखी काही पालक जमा झाले होते. दुसऱ्या दिवशीपर्यंत एकूण बावीस जण हजर झाले.

हा लोंढा पाहून कमांडर मॅसा यांनी जाहीर केलं की नातलगांना शोध घेणाऱ्या विमानांमधून जाता येणार नाही. तोपर्यंत अशीही एक बातमी कानांवर आली की 'कॅमिलो' नावाच्या एका खाणकामगाराला क्युरिकोपासून अंदाजे सत्तर मैलांवर, ईशान्येला, फेअरचाइल्ड पेटलेल्या स्थितीत कोसळताना दिसलं. त्यानं ती वार्ता लगेच पोलिसलाही दिली.

सोमवारी, १६ तारखेला, त्या भागात तपास चालू झाला. नेतृत्व अर्थातच मॅसा आणि गेसिया यांच्याकडे होतं. सकाळी काहीच पत्ता लागला नाही; परंतु दुपारी मात्र वैमानिकाला पर्वतावरून धूर येताना दिसला. जवळून तपासणी झाल्यावर त्याच्या ध्यानात आलं की तो एका झोपडीच्या धुराड्यातून बाहेर पडत होता.

त्याच वेळी दूरच्या प्रदेशातही चिलीच्या पोलिसांनी काही स्वयंसेवकांसह अनेक गटांमध्ये जारीनं तपास चालू केला. अँडीज पर्वतावर बेपत्ता होणाऱ्या लोकांचा शोध घेणं हे त्यांचं नित्याचं काम होतं. प्लँकन ते 'एल टिवरसिओ' या भागात खूप हिंडल्यावर हिमवर्षाव आणि जोरदार वाऱ्यामुळं ते मुक्कामावर परतले.

पुढचे दोन दिवस प्रतिकूल हवामानामुळं शोध घेण्याचं काम होऊच शकलं नाही. बरेच पालक निराश होऊन मॉन्टेव्हिडिओला परत गेले. राहिलेले लोक पर्वतावर स्वतंत्रपणे शोध घेण्याचे बेत रचू लागले. प्रयत्न कमी पडत होते असं त्यांना बिलकुल वाटत नव्हतं; पण दिवस भराभर उलटत होते, त्यामुळं मुलं जिवंत सापडण्याची शक्यता कमी होत चालली होती. कमांडर मॅसा म्हणाले, 'मला तरी आशा वाटत नाही. कोणी जिवंत राहिलेच असते तर ते बर्फात बुडून ठार होणार हे निश्चित !'

श्री. पेझ यांनी स्वतंत्र प्रयत्न केले. 'चिलीमधील पर्वत आणि बर्फ' हे पुस्तक त्यांनी विकत घेतलं. त्यात अशी माहिती मिळाली की 'टिंग्वीरिरिका' आणि 'पालोसो' पर्वतांमधील भूभाग 'जोकिन' नावाच्या जमीनदाराच्या मालकीचा आहे. त्याला स्वतःचे प्रदेशाची इत्थंभूत माहिती असणार, या खात्रीनं श्री. पेझ त्याच्याकडे गेले. तिथे समजलं की त्या जमिनीचे हक्क त्यांनी केव्हाच सोडले होते; परंतु तिथल्या परिसरात श्री. पेझ यांच्याबरोबर जाण्याचं श्री. जोकीन यांनी मान्य केलं.

दोन दिवसांचा मोटारमधील प्रवास आणि घोड्यावरून नंतर गेल्यावर ते पर्वताच्या पश्चिम उतारावर जाऊन पोचले. भारी हिमवर्षाव आता थांबला होता; परंतु आसमंतात कुठेच काहीही दिसत नव्हतं. जिवंत किंवा मृत. तरीही त्या बर्फाळ प्रदेशात पाय रोवून, समोर उत्तुंग पर्वतशिखरांकडे पाहत श्री. पेझ मोठमोठ्यानं शिट्टी वाजवू लागले. जादूनं तो आवाज आपल्या मुलापर्यंत पोचेल अशा समजुतीमध्ये ते असावेत. प्रतिध्वनींचे आवाज घुमण्याखेरीज दुसरं काहीच झालं नाही. मागं फिरणं एवढंच फक्त हातात होतं.

काही जुन्या मताच्या स्त्रियांनी ज्योतिषी आणि दैवी सामर्थ्य अंगी असणाऱ्या–त्यांच्या कल्पनेप्रमाणे–लोकांना गाठलं; परंतु त्यांनी विमान ज्या भागात असेल असं सांगितलं तिथे एस. ए. आर. तर्फे आधीच तपास झाला होता. विमान तिथे कोसळलं तर कोणीही वाचण्याची आशा नव्हती.

संतांनी किंवा देवानं काही तरी चमत्कार घडवावा आणि सर्वजण जिवंत असल्याचं वृत्त कानांवर यावं अशी प्रार्थना काही आया करू लागल्या.

परंतु आत्तापर्यंत त्यांनी कटू बातमीचा स्वीकार केला होता. ते प्रार्थना अशासाठी करत होते की त्यांच्यात दुःख सहन करण्याची शक्ती यावी आणि त्यांच्या मुलांना सद्गती मिळावी. अपघातानंतर बर्फात गाडल्या गेलेल्या व्हॅलेटाच्या आईनं मुलाची आशा केव्हाच सोडली होती. शुक्रवारी दुपारी तिला स्वप्न पडलं : विमान कोसळतंय, नंतर तिच्या मुलाचा जखमी चेहरा आणि साडेपाच वाजता व्हॅलेटा जग सोडून गेला. कोणीही वाचण्याची शक्यता नाही यावर लोकांना विश्वास ठेवावा लागला. कारण जरी त्यातून काहीजण बचावले तरी पर्वतांच्या रांगांमधून बाहेर पडणं अशक्य होतं. दिवसही खूप लोटले होते.

अर्थात, रोज संध्याकाळी रॅफेल पॉन्सचा दिवाणखाना भरून जाई. मुलांचे नातलग, मित्रमैत्रिणी तिथे जमा होत. आशा ही जबरदस्त शक्ती आहे.

एस. ए. आर. चा तपास १९ ऑक्टोबरला पुन्हा सुरू झाला. २१ च्या सकाळपर्यंत तो जारी होता. त्याच वेळी अर्जेंटिनाची विमानंही संभवनीय प्रदेशाच्या अनुरोधानं शोध घेतच होती. श्री.पेझ यांच्या नेतृत्वाखाली काहीजणांच्या स्वतंत्र मोहिमा चालू होत्या. असे सर्व प्रयत्न करूनही फेअरचाइल्डचा पत्ता लागला नाही.

आठ दिवस हा कार्यक्रम चालू होता. त्यातले दोन दिवस खराब हवेमुळे वाया गेले. विमानातून शोध घेणाऱ्या लोकांचे जीव धोक्यात होते. बहुमोल आणि महाग इंधन खलास झालं होतं. कितीही प्रयत्न केले तरी ते निष्फळ जाणार हे सगळ्यांनी ओळखलं होतं. म्हणून २१ ऑक्टोबरच्या दुपारी दोन्ही कमांडरांनी जाहीर केलं की 'युरुग्वे विमान क्र. ५७१ चा शोध स्थगित करण्यात येत आहे.' ◘

## : २ :

नवव्या दिवशी सकाळी, सुसानचा पार्थिव देह विमानाबाहेर बर्फामध्ये आणून ठेवण्यात आला. घोंघावणाऱ्या वाऱ्याखेरीज दुसरा कसलाही आवाज ऐकू येत नव्हता. मोठमोठे खडक आणि बर्फ याव्यतिरिक्त काही दिसणारंही नव्हतं.

प्रकाश जसजसा कमीजास्त होई, तसे पर्वत निरनिराळे रंगरूप धारण करीत. सकाळी लवकर ते चमकदार पण दूरवर दिसत.

दिवस जसजसा वर येई, तसतशा सावल्या लांब होत जात. करडे, लालसर आणि हिरवे खडक उंचावरून बचावलेल्या लोकांकडे अनोळखी भाव आणून बघत असल्याचा भास होई.

दिवसा विमानातल्या खुर्च्या बाहेर बर्फात आणून ठेवल्या जात. त्यावर बसून, समोर क्षितिज न्याहाळत, बर्फापासून पिण्यासाठी पाणी बनवण्याचा उद्योग सुरू होई. आपल्या सहकाऱ्यांची ताकद वेगानं कमी होत आहे हे प्रत्येकाला जाणवे. सर्वांच्या हालचाली मंदावल्या होत्या, त्यांना जडत्व आलं होतं. थोडयाशा कामानंही ते दमून जात. काहीजण निजण्याच्या जागेवर तसेच बसून राहत. निराशेनं खचून गेल्यामुळं बाहेर मोकळ्या हवेत जाण्याचीही त्यांना इच्छा होत नसे. त्यांच्या बोलण्यातून डोकावणारा त्रासिकपणा ही गंभीर बाब बनली होती.

मार्सेलो, डॅनियल आणि काही तशाच लोकांना भीती वाटत होती की त्यातल्या काही मुलांना हिस्टेरिया होण्याचा संभव आहे. सुटकेची वाट बघून त्यांचं त्राण संपत आलं होतं. त्यांच्यात बाचाबाची सुरू झाली होती.

मार्सेलो स्वतः चांगली उदाहरणं घालून द्यायचा प्रयत्न करी. तो शांत आणि संयमी होता. सुटकेविषयी तो आत्मविश्वासानं बोले. मुलांना गाणी म्हणावयास लावी. त्यात काही जोर नाही आणि कॅप्टन अवास्तव खात्री बाळगतो हे सर्वांना कळून चुकलं होतं. रात्री आडवं झाल्यावर मात्र तो खिन्न होई. आईला किती दुःख होत असेल; हनिमूनला गेलेला भाऊ आणि इतर कुटुंबीय मंडळी कशी काळजीत असतील याच विचारात तो गढून जाई. झोप लागलीच तर विचित्र स्वप्नांमुळे दचकून जागा होई. एडचुअर्डो त्याला खूप समजावी, पण त्याच्याच आग्रहामुळं चिलीचा दौरा आखला गेला असल्यामुळं, घडलेल्या प्रसंगाला तीच जबाबदार आहे ही कल्पना त्याच्या मनातून जाता जाईना.

' उगीच खुळचटपणा करू नकोस, ' एडचुअर्डो त्याला म्हणाला, ' गॅस्टन आणि डॅनियल यांना येण्यासाठी मी आग्रह केला; पण म्हणून काय त्यांच्या मृत्यूला मी जबाबदार होईन? मला नाही तसं वाटत ! '

' कोणी जबाबदार असेलच, ' फिटो उद्गारला, ' तर तो एक परमेश्वरच. गॅस्टनचा एक भाऊ आणि वडील आधीच मेलेले आहेत. त्याच्या आईला आता ही शिक्षा का म्हणून द्यावी ? देवानं आपल्याला इतकं दुःख का द्यावं ? आपण काय पाप केलं होतं ?'

' आपल्या हातात काहीच नाही. ' डॅनियल म्हणाला.

बचावलेल्या सत्तावीस जणांचं मनोधैर्य टिकवण्याचं काम दोघंतिघंच व्यवस्थितपणे पार पाडत होते. त्यांची वागणूक आदर्शभूत होती. स्वतःच्या मोडलेल्या पायाचं दुःख विसरून ' इचॅव्हेरन ' उत्साही-आनंदी राही. सतत विनोद करून तो वातावरण हलकं ठेवी. पोटात जखम होऊनही अॅन्रिक सर्वांना धीर देई आणि गुस्ताव्ह निकोलिच सकाळी सर्वांना उठवून त्याच्या गटासह जागा स्वच्छ करी. दिवसा शब्दकोडयांमध्ये आणि रात्री कार्लिटस पेन्नबरोबर प्रार्थना म्हणण्यात तो मुलांना गुंतवून ठेवी.

लिलियाना सतत दिलासा देत राही. त्यांच्यातील ती एकमेव स्त्री होती. तिच्याविषयी सर्वांच्या मनात आईसारखंच प्रेम निर्माण झालं होतं. तीही मुलांशी तशाच जिव्हाळ्यानं वागत असे. नवव्या दिवशी तिनं सर्वांना एकत्र जमवलं आणि गतायुष्यातील एखादी घटना प्रत्येकानं सांगावी असं सुचवलं. काहीजणच तसा विचार करण्यास समर्थ होते. पँकोनं आपल्या भावी सासऱ्याबद्दल तीन गोष्टी सांगितल्या. सर्वसाधारण प्रत्येकाला भावी जीवनाविषयी साशंकता असते तशीच त्यालाही वाटत होती.

त्याच्या गप्पागोष्टींमुळे विमानातलं गंभीर, गढूळ वातावरण थोडंसं निवळलं. मुलांना खूप बरं वाटलं; पण जेव्हा पुढच्याची पाळी आली तेव्हा कोणीच तोंड उघडीना. संध्याकाळ होऊन गेली होती. अंधार पडू लागला. शेवटी प्रत्येकजण स्वतःच्याच विचारात गढून गेला. ◻

## : ३ : –

रविवार, दिनांक २२ ऑक्टोबर. पर्वतावरील तो दहावा दिवस. आधी मार्सेलो आणि रॉय हार्ले बाहेर पडले. रॉयला दोन खुर्च्यांमधे एक ट्रान्झिस्टर रेडिओ सापडला होता. इलेक्ट्रॉनिक्सच्या थोडयाफार ज्ञानामुळं त्यानं तो सुरू केला. उंच शिखरांच्या मधे खोलवर रेडिओच्या लहरी पोचणं कठीण म्हणून विमानातल्या तारेचा वापर करून हार्लेनं अेरियल तयार केली. मार्सेलो अेरियल धरून बसला आणि रॉय बटन फिरवू लागला. चिलीतलं एक स्टेशन लागलं, पण त्यांच्या सुटकेविषयी कसलीच बातमी ऐकू आली नाही. एक राजकीय नेता संपाविषयी काही तरी बोलत होता.

तोपर्यंत इतरही काही मुलं बाहेर बर्फात उतरली. उपासमार आपला प्रभाव दाखवत होती. ते अधिकाधिक अशक्त बनत चालले होते. उभं राहिलं की त्यांना चक्कर येई, पावलं वेडीवाकडी पडत. कडक ऊन पडलं तरी अंगातली थंडी जात नसे. वयस्कर लोकांप्रमाणे त्यांच्या त्वचेला सुरकुत्या पडू लागल्या.

अन्नसाठा संपत आला होता. सध्याचा आहार म्हणजे फक्त चॉकलेटचा तुकडा आणि घोटभर दारू. त्या सुदृढ खेळाडूंना इतक्या अपुऱ्या आहारावर निभावणं कठीण जात होतं. तरीही सशक्त, अशक्त, जखमी सर्वजण समान वाटप स्वीकारत होते. जास्त दिवस जिवंत राहणं शक्य नाही हे सत्य ते जाणून होते. दिवसेंदिवस येणाऱ्या वाढत्या अशक्तपणामुळे अंतकाळ फार दूर नाही हे लक्षात येण्यासाठी वैद्यकीय ज्ञानाची काहीच गरज नव्हती.

खाण्याचा प्रश्न दुसऱ्या कोणत्या पद्धतीनं सोडवता येईल काय यावर विचारविनिमय सुरू झाला. अँडीजवर गवताची बारीकशी काडीदेखील उगवत नव्हती. विमानाच्या जवळपास तर बर्फच बर्फ होतं. शंभर फूट खालती जमीन दिसत होती. उघडयाबोडक्या खडकांना ऊन आणि हवा मिळत असे, पण त्यावर शेवाळ्यासारखं काही तरी उगवे. ते खरवडून आणि वाटून पाण्याबरोबर खाऊन पाहिलं सुद्धा; पण त्याची चव कडवट आणि शिसारी आणणारी होती. अन्न म्हणून त्याचा काहीच उपयोग नव्हता. त्याखेरीज मात्र अक्षरशः काहीही दिसेना. अगदी खुर्च्यांचाही विचार करण्यात आला; पण त्यात गवत भरलेलं नसल्यामुळं

खाण्याच्या दृष्टीनं उपयुक्त काहीच नव्हतं. नायलॉन आणि स्पंजचा त्यांना काय उपयोग ?

काहीही करून जिवंत राहायचं असेल, तर अपघातात ठार झालेल्या सहकाऱ्यांचं मांस ख ण्याखेरीज दुसरा मार्ग नाही, हे बऱ्याच जणांच्या पूर्वीच ध्यानात आलं होतं. विचार भयानक होता, पण तितकाच सत्य. विमानाभोवती ठेवण्यात आलेली मृत शरीरं आत्यंतिक थंडीमुळं जशीच्या तशी टिकून होती. आपल्याच मित्रांचं मांस कापून खाण्याची गोष्ट थरकाप उडवणारी होती; पण दुर्दैवी परिस्थितीमुळं त्याचाही विचार करणं आवश्यक होतं.

हळूहळू त्या विषयाला तोंड फुटलं. मुलं आपापसात बेतावेतानं चर्चा करू लागली. या कल्पनेला पाठिंबा मिळेल असा ज्यांच्याविषयी भरवसा होता त्यांच्याजवळ विषय काढण्यात आला. शेवटी कॅनेसानं बिनदिक्कतपणे सर्वांपुढे प्रस्ताव मांडला. तो म्हणाला, ' आपल्याला मदत मिळणं आता शक्य नाही. त्यामुळं सुटकेचे प्रयत्न आपल्यालाच केले पाहिजेत. अन्नाखेरीज ते असंभाव्य आहेत. त्यामुळं आता मनुष्याचं–तेही मेलेल्या–मांस खाणं एवढा एकच मार्ग आपल्यापुढे आहे. ' आपल्या धारदार, उंच आवाजात त्यानं सर्वांना शरीरविज्ञान शिकवायला सुरुवात केली. इतर अन्न मिळत नसल्यामुळं शरीरातलं मांसच कसं कमी होत जातं, हे सगळ्यांना समजलं. ' प्रत्येक बारीकसारीक हालचालीसाठी तुम्ही शरीराचा काही भागच खर्च करीत आहात. आणखी काही दिवसांनी आपण इतके अशक्त होऊ की, आपल्या समोर स्पष्ट दिसणारं मांस कापून घेण्याचं त्राणही उरणार नाही. '

तात्त्विक दृष्टिकोनातूनही त्यानं जिवंत राहण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. जमेल त्या मार्गानं आधी उदरभरण – गरजेपुरतं का होईना – आवश्यक आहे. अगदी धार्मिक प्रवृत्तीच्या मुलांनीही त्याचं समर्थन केलं.

' ते शेवटी मांस आहे, ' तो पुढे म्हणाला, ' दुसरं तिसरं काही नाही. आत्मा शरीर सोडून केव्हाच निघून गेलेला आहे. मृतात्म्यांना सद्गती मिळालेली आहे. इथं पडली आहेत फक्त प्रेतं. आपण घरी प्राण्यांचं मास खातोच की. त्यांच्यात आणि यांच्यात काय फरक आहे ? '

इतरांनीही चर्चेत भाग घ्यायला सुरुवात केली. ' तुमच्या लक्षात कसं येत नाही, ' फिटो म्हणाला, ' पर्वतावर थोडंसं चढायचं म्हटलं तरी किती शक्ती खर्च करावी लागते. मग शिखरापर्यंत जाऊन पलीकडे उतरायचं असेल तर आणखी किती तरी ताकद असायला पाहिजे. चॉकलेटच्या तुकड्यानं किंवा थेंबभर दारूनं ते थोडंच जमणार आहे ? '

त्याचं म्हणणं निरुत्तर करणारं होतं.

फेअरचाइल्डमधे सामुदायिक सभा भरली. प्रथमच त्यात सत्तावीसच्या सत्तावीस जणांनी भाग घेतला. जगण्यासाठी मृत शरीरांचा वापर करायचा का नाही हा यक्षप्रश्न समोर होता. कॅनेसा, झेर्बिनो, फर्नांडिस आणि फिटो पूर्वीचेच मुद्दे तावातावानं मांडत होते. मृत्यूखेरीज दुसरा पर्याय नव्हता. स्वतःसाठी आणि घरादारासाठी त्यांना जगणं भाग होतं. ईश्वराचीही तशीच इच्छा होती. भुकेचा प्रश्न सोडवण्याचा मार्ग समोर होता. ' आपण जगावं अशी त्याची इच्छा नसती, तर अपघातामध्येच सर्वजण ठार झाले नसते का ? हे जीवदान नाकारण्याचा आपल्याला अधिकार नाही. '

' पण आपल्याच मित्रांचं मांस खायला लागावं, असा आपण अपराध तरी काय केला होता ? ' मार्सेलोनं विचारलं.

क्षणभर स्तब्धता पसरली. झेर्बिनो कॅप्टनकडे वळला आणि म्हणाला, ' आपल्या स्वर्गवासी मित्रांनीही त्याला मरणापूर्वी हरकत घेतली नसती. '

मार्सेलो गप्प बसला.

' मला तरी वाटतं ' झेर्बिनो पुढे म्हणाला, ' की माझ्या शरीराचा तुम्हाला जिवंत राहण्यासाठी उपयोग होत असेल, तर तुम्ही अवश्य केला पाहिजे. मी जर खरोखर मेलो आणि तुम्ही मला खाल्लं नाही तर, जिथे असेन तिथून परत येऊन मी सगळ्यांच्या कंबरड्यात लाथा घालीन ! '

या विधानामुळं बऱ्याच जणांच्या मनातली रुखरुख कमी झाली- माणसाचं मांस खाण्याची कल्पना किळस आणणारी असली तरी सर्वजण झेर्बिनोशी तत्त्वतः सहमत झाले.

त्यांनी निर्णय घेतला की त्यांच्यापैकी कोणी मृत्युपंथाला लागला तर मृतशरीराचा वापर सुरू करायचा.

मार्सेलोचं अजूनही समाधान झालं नव्हतं. तो आणि बोटावर मोजता येतील अशा इतर काही जणांना अजूनही सुटकेची आशा वाटत होती. राहिलेल्यांना वस्तुस्थितीची जाणीव झाली होती. यापुढे मदत येईल ही आशा करणं व्यर्थ होतं.

विचार पटला तरी मांस खाण्याची प्रत्यक्ष कृती सगळ्यांना जमेलच अशी खात्री नव्हती. ' कोच ', ' न्यूमा ' आणि अर्थातच लिलियाना यांनी तसं धाडस नसल्याची कबुली दिली. इतरांनी खुशाल तसं वागावं. लिलियाना शांत राहिली; पण तिच्या भावना उफाळून येत होत्या. तिलाही जगायचं होतं, मुलांसाठी तरी जगायचं होतं; पण त्यासाठी हा मार्ग भयानक होता. पाप आणि शारीरिक गरज यातला फरक तिला चांगला कळत होता. जोपर्यंत सुटकेची आशा आहे आणि खाण्यासाठी चॉकलेटचा लहानसा का होईना, पण तुकडा मिळत राहील, तोपर्यंत नरमांस न खाण्याचं तिनं ठरवलं.

तिच्या नवऱ्यानं – जेव्हियरनं – त्याला मान्यता दिली. इतरांनाही हरकत घेतली नाही. मरणाला हसत सामोरं जावं असं एकालाही वाटत नव्हतं. उलट जिवंत राहणं हेच कर्तव्य आहे आणि मृत लोकांचं मांस खाण्यात कोणताच नैतिक अधःपात होणार नाही असं बहुमत पडलं; पण निर्णय घेणं आणि त्याप्रमाणं आचरण करणं ही अवघड गोष्ट होती.

दुपार उलटून जाईपर्यंत चर्चा चालू होती. ठरल्याप्रमाणे वागायचं असेल तर लगेच सुरुवात केली पाहिजे, नाही तर पुढे त्याचाही उपयोग होणार नाही, असा एकंदरीत मुख्य सूर होता. विमानात ते स्तब्ध बसून विचार करत होते. अखेर कॅनेसा, मास्पॉन्स, झेर्बिनो अन् फिटो–हा चार जणांचा गट बाहेर निघून गेला. पण ठोगाठ इतरही काही गेले. मांस कोण कापणार आहे किंवा कुणाच्या शरीराचं, हे जाणून घ्यायची आतल्या एकाचीही इच्छा नव्हती.

मृत शरीरांवर बर्फ साचलं होतं. काही यार्डांवर एकाचा पार्श्वभाग दिसत होता. एकही शब्द न बोलता कॅनेसा तिथे गेला. गुडघ्या-

वर बसून त्यावरची त्वचा उघडी केली आणि हातातल्या काचेचा तुकडा आत खुपसला. मांस गोठून कडक झालं होतं, कापायला जड जात होतं. तरीही त्या भागातून वीसएक लहान लहान तुकडे कापूनच तो उठला. सर्व तुकडे त्यानं विमानाच्या छतावर नेऊन ठेवले.

आत अजूनही शांतता होती. मुलं मनातून घाबरून गेली होती. कॅनेसा आत गेला. त्यांना म्हणाला, 'छतावर मांस ठेवलेलं आहे. उन्हात ते वाळतंय्. ज्यांची इच्छा असेल त्यांनी बाहेर जाऊन घ्यावं.' कोणीच उठलं नाही. याही वेळी कॅनेसानं ते धैर्य दाखवलं. त्यानं ईश्वराची प्रार्थना केली. आपण जे करतोय ते नाइलाज म्हणून, असं त्याला प्रामाणिकपणे वाटत होतं. पुढं होऊन त्यानं एक तुकडा हातात घेतला. क्षणभर तो घुटमळला. त्याचं मन खंबीर असूनही हातपाय गळून गेले. हात तोंडातही शिरेना आणि खालीसुद्धा जाईना. इच्छाशक्तीशी हळुवार भावनांचा झगडा चालू होता. इच्छेचा शेवटी विजय झाला. हात उंचावला आणि मांस तोंडात गेलं. त्यानं सावकाश ते घशाखाली ढकललं.

या विजयामुळं त्याचा चेहरा उजळून निघाला. जुनाट, श्रद्धाळू विचारांवर विवेकानं मात केली होती. तो आता जगणार होता.

संध्याकाळच्या सुमारास दोन-दोन, चार-चार करून मुलं बाहेर आली. त्यांनी कॅनेसाचं अनुकरण केलं. झेर्बिनोनं बळंच ते घशात ढकललं खरं, पण ते तिथे अडकून बसलं. म्हणून तोंडात बर्फ घालून त्याबरोबर मांस गिळून टाकलं. मागोमाग फिटो, मास्पॉन्स, व्हिजिंटिन अशा क्रमानं तो अभूतपूर्व कार्यक्रम सुरू झाला.

मध्यंतरीच्या काळात गुस्ताव्ह निकोलिश आपल्या मॉन्टेव्हिडिओ-मधील भावी पत्नीला पत्र लिहीत बसला होता. या उंच, कुरळे केस असलेल्या अवघ्या वीस वर्षांच्या मुलानं मित्रांचं मनोधैर्य टिकवण्यासाठी जिवाचं रान केलं होतं. आता तो लिहिण्यात गर्क झाला होता.

प्रियतम रोझिना,

विमानात बसून मी तुला हे पत्र लिहीत आहे. (सध्या हेच आमचं 'पेटिट हॉटेल!') सूर्यास्ताची वेळ आहे. रोजच्यासारखीच कडक थंडी पडू लागलीय्. वारे जोरदार सुरू झालेत. दुपार मात्र सुरेख होती. भरपूर सूर्यप्रकाश, त्यामुळं ऊबही. मला आपण किनाऱ्यावर एकत्र घालवलेले दिवस आठवताहेत. परिस्थितीत किती जबरदस्त फरक पडलाय. तुझ्या घरी झालेल्या मेजवान्या : आणि इथे आम्ही अन्नावाचून तडफडतोय.

आजचा येथील दहावा दिवस. सर्वजण आज विशेषकरून खचल्यासारखे दिसतात. निराशा त्यांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट दिसून येतेय्. माझी उमेद मात्र अद्याप टिकून आहे, कारण एक ना एक दिवस मी तुला भेटणार याबद्दल मला तिळमात्रही शंका नाही. माझ्यात प्रचंड शक्ती निर्माण करायचं सामर्थ्य या विचारात नक्कीच आहे. अन्नसाठा संपल्यातच जमा आहे. सर्वांच्या पुढे भुकेचा प्रश्न आ वासून उभा आहे.

तुला वाचून धक्का बसेल—मलाही जी गोष्ट आजपर्यंत अशक्य वाटत होती—पण पोट भरण्यासाठी आज आम्ही मृत शरीर कापायला सुरुवात केली आहे. दुसरा काही मार्गच उरलेला नाही. असा दिवस कधीही उगवू नये म्हणून मी अंतःकरणपूर्वक देवाची प्रार्थना केली होती; पण अखेर ती वेळ आलेली आहे. या प्रसंगाला धैर्यानं तोंड द्यावंच लागणार. ईश्वरानं तेवढा एकच मार्ग समोर ठेवला आहे. आत्मा एकदा शरीर सोडून गेला की राहतं ते एक प्राण्याचं शरीर. उद्या माझ्यामुळं जर काही जीवांचं रक्षण होणार असेल, तर त्यांनी खुशाल माझ्याही शरीराचा वापर करावा. याच तत्त्वानं आता मला पश्चात्ताप होत नाही.

ममा, पपा, मुलांना आणि तुला काय वाटेल कोण जाणे? तुला जे दुःख भोगावं लागतंय् त्यामुळं मी खूप अस्वस्थ आहे. आलेल्या प्रसंगातून पार पडण्याचं सामर्थ्य ईश्वर दोघांनाही देईल. तोच आता आपला त्राता. शेवट सुखात होईल अशी मला आशा आहे.

मला बघशील तेव्हा खरोखर हादरशील. दाढी खूप वाढलेली, गलिच्छ शरीर आणि उपासमारीमुळं वाळून गेलोय. डोक्यावर एक जखम झालीय्. छातीवरची आता भरत आलीय्. बाकी हातापायांवर किरकोळ खरचटलंय् ते काही विशेष नाही.

हे सगळं असूनही मी अगदी मजेत आहे. ◻

**: ४ :**

दुसऱ्या दिवशी सकाळी खिडक्यांमधून बाहेर डोकावून बघताना आकाश ढगाळ दिसत होतं; पण मधूनच सूर्याचं दर्शनही घडत होतं. काहींनी झेर्बिनो, कॅनेसा, व्हिजिंटिन प्रभृती मुलांकडे भीत भीत पाहिलं. मांस खाल्ल्यामुळं देवानं त्यांना अद्दल घडवावी असं बघणारांना मुळीच वाटत नव्हतं; परंतु ज्याप्रमाणे नैसर्गिकरीत्या मरण पावलेले बैल आदि प्राणी खाऊ नयेत असं शास्त्र होतं, तोच नियम मनुष्यप्राण्यालाही लागू नसेल का?

मांस खाणारे सगळे व्यवस्थित होते. त्यांनी खरं तर फार खाल्लं नव्हतंही आणि त्यांनाही इतरांइतकाच थकवा जाणवत होता. नित्याप्रमाणे मार्सेलो पेरेझ आधी बाहेर पडला.

'चल,' तो रॉय हार्लेला म्हणाला, 'आपण रेडिओ लावून बघू.'

'थंडी किती आहे!' रॉय म्हणाला. 'दुसऱ्या कोणाला तरी ने की!'

'नाही. ते काम तुझंच आहे. चल चल.'

नाखुषीनंच रॉय उठला. पायांतल्या मोजांवर बूट चढवून जवळच्या खिडकीतनं खाली उडी टाकली. मागोमाग एक-दोन मुलंही गेली.

मार्सेलोनं एरियल आधीच तयार ठेवली होती. रॉयनं रेडिओ सुरू केला आणि काटा फिरवायला सुरुवात केली. आदल्या दिवशी ज्या ठिकाणी चिलीतलं स्टेशन लागलं होतं, त्या ठिकाणी तो थांबला. कानाला रेडिओ लावताक्षणीच बातमीपत्र संपलं. अखेरचे काही शब्दच कानांवर पडू शकले. 'एस. ए. आर. ची व्यापारी आणि

मिलिटरी विमानांना अशी विनंती आहे की अँडीज पर्वतावरून जाताना फेअरचाइल्डचे काही अवशेष दृष्टोत्पत्तीस पडल्यास त्यांनी सूचना द्यावी. युरुग्वे विमानाचा, एस. ए. आर. नं कसून तपास करूनही काहीच निष्पन्न न झाल्यामुळं, शोध स्थगित केल्यानंतर त्यांनी सदर विनंती केलेली आहे.'

लगेच दुसरा कार्यक्रम सुरू झाला. रॉयनं कानापासून रेडिओ दूर केला. मार्सेलोकडे पाहून ऐकू आलेलं वृत्त त्याला सांगितलं. एरियल टाकून देऊन मार्सेलोनं तोंडावर हात ठेवले आणि तो स्फुंदून स्फुंदून रडू लागला. रॉयच्या सभोवती बसलेल्यांना बातमी समजताच त्यांनी देवाची करुणा भाकायला सुरुवात केली. फक्त पेरॅडो शांतपणे पर्वत-शिखरांकडे पाहत उभा राहिला.

विमानातून बाहेर आल्यावर निकोलिशला त्यांचे चेहरे बघूनच काय ते कळून चुकलं.

'बाकीच्यांना आपण काय सांगायचं ?' त्यानं विचारलं.

'आपण त्यांना हे सांगता कामा नये,' मार्सेलो बोलला, 'निदान त्यांना तरी आशेवर जगता येईल.'

'नको,' निकोलिश म्हणाला, 'त्यांनाही कळलं पाहिजे. कोणीही अंधारात राहता कामा नये.'

'मला तरी ते शक्य नाही,' अजूनही मार्सेलोचा अश्रुपात चालू होता.

'मी त्यांना सांगेन,' असं म्हणून निकोलिश विमानाच्या दर-वाज्याकडे गेला.

वर चढून आत गेल्यावर त्याच्याकडे वळलेल्या उदास चेहेऱ्यांकडे त्यानं दृष्टी टाकली.

'मुलांनो, आनंदाची बातमी आहे,' तो ओरडला, 'आत्ताच आम्ही ती रेडिओवर ऐकली. त्यांनी शोध थांबवलेला आहे.'

तिथे एकदम शांतता पसरली. जागच्या जागी सगळेजण गळून गेले. काही जणांनी हुंदके सुरू केले.

'मूर्खा, ही कसली आलीय् चांगली बातमी ?' पेझ रागानं निको-लिशला म्हणाला.

'चांगली अशा अर्थानं, की आता आपण आपल्या प्रयत्नांनी इथून बाहेर पडणार आहोत.'

या एका धाडसी विधानामुळे बरेच जण सावरले; पण मदतीच्या भरवशावर जे बसले होते त्यांना हा नवीन आघात सहन झाला नाही. मार्सेलो मात्र शतशः विदीर्ण झाला. नेता म्हणून त्याची भूमिका आता पोकळ आणि यांत्रिक झाली. जीवनात त्याला अर्थ वाटेना, पँकोचा उत्साहही आधीच्या विरळ हवेत पार विरून गेला. स्वतःच्या प्रयत्नांनी सुटका करून घेण्यावर त्याचा विश्वास नव्हता. आशावादी गटातल्या लिलियानानं मात्र पुन्हा सर्वांना दिलासा दिला. 'मुळीच काळजी करू नका,' ती म्हणाली, 'आपण इथून नक्की बाहेर पडू. बर्फ वितळल्यावर ते आपल्याला शोधून काढतील.' मृत शरीरां-व्यतिरिक्त अगदी थोडा साठा शिल्लक असल्याचं जणु आठवून ती पुढे म्हणाली, 'किंवा आपण पश्चिमेच्या दिशेला प्रयाण करू.'

सुटका करून घेणे ही नवी गोष्ट त्यांच्या डोक्यात घुसली होती. विमान ज्या दरीत घुसलं होतं, ती पूर्वेकडे पसरली होती. पश्चिमे-कडे उंचच उंच पहाड होते; पण आता अडचणींमधूनच मार्ग काढायचा होता. शोध थांबल्याची वार्ता ऐकून निदान पेरॅडोनं तरी मोहिमेचा निश्चय जाहीर केला. कोणी साथ दिली नाही तर एकट्यानं तो निघणार होता. अर्थात पश्चिमेला. इतरांनी महत्प्रयासानं त्याला रोखलं. दहा दिवसांपूर्वी तो मेल्यात जमा होता. पर्वत चढायचं ठर-लंच तर ताकतवान मुलं त्यांच्यात होती. 'आपण आधी याचा शांतपणे विचार करू या,' मार्सेलो म्हणाला, 'आणि काय करायचं ते एकत्र करू या. तरच आपला काही तरी निभाव लागेल.'

अजूनही मार्सेलोबद्दल सगळ्यांना आदर होता; आणि पेरॅडोमधेही शिस्त बाकी होती. कॅप्टनचा निर्णय तो संघाचा निर्णय. शिवाय अशक्त झालेला तो काही एकटाच नव्हता. लवकरच पर्वत चढण्याचा किंवा विमानाचं शेपूट शोधण्याचा निर्णय घ्यावाच लागणार होता.

शेवटी सर्वानुमते असं ठरलं की मोहिमेला लायक असलेल्या काही जणांनी तावडतोब निघावं. रेडिओ ऐकल्यानंतर तास-दीड तासानं झेरिनो, तुर्कॅटी, मास्पॉन्स हे तिघं पर्वताच्या दिशेनं निघाले. बाकीचे लोक त्यांच्याकडे टक लावून बघत राहिले.

•

कॅनेसा आणि फिटो आदल्या दिवसाच्या प्रेताकडे वळले. हाडा-जवळचं आणखी मांस त्यांनी कापून काढलं. छतावरचे सगळे तुकडे संपुष्टात आले होते. उन्हात सुकल्यामुळं ते खाणं सोपं तर जातच होतं, पण नव्या वार्तेमुळं बऱ्याच जणांचा विचारही बदलला. खाणाऱ्यांची संख्या वाढली. प्रथमच, पेरॅडोनं मागसाचं मांस खाल्लं. तसंच डॅनियलनंही इच्छेविरुद्ध पोटात ढकललं. एक एक करून, आपल्याच मित्रांचं मांस नाइलाजास्तव ते खाऊ लागले. काही जणांच्या मते ती दुर्दैवी गरज होती, तर इतरांना सदसद्विवेक बुद्धी आणि व्यवहार यातला तो संघर्ष वाटत होता.

लिलियानो आणि जेव्हियर मिथॉल, कोच, पँको, इन्शार्ते इत्यादि लोकांनी मात्र अजूनही त्याला स्पर्श केला नव्हता. मार्सेलोनं अद्याप शिल्लक असलेल्या त्याच्या अधिकाराचा वापर करून त्यांना खाण्या-विषयी गळ घातली, पण त्याचा काही एक उपयोग झाला नाही. पण पेद्रो अल्गोत्राच्या चार शब्दांनी ते काम केलं. अपघातानंतर हा प्राणी आपली शुद्ध आणि आठवण गमावून बसला होता. कॅनेसा मांस कापत असताना तो स्वस्थपणे बघत बसला होता. त्याच्यापाशी येऊन त्याला एक तुकडा देईपर्यंत तो चकार शब्द बोलला नाही. तुकडा हातात घेऊन त्यानं तोंडात घातला. चावून चावून घशाखाली लोटला. त्यानंतर तो म्हणाला, 'ही पुरणाची पवित्र पुनरावृत्ती आहे. आपल्या अध्यात्मिक उत्कर्षासाठी ख्रिस्तानं आपलं शरीर अर्पण केलं आणि इथे मित्रांच्या जीवनरक्षणासाठी काही जणांनी शरीरत्याग केला.'

हे ऐकल्यावर, पँको आणि कोच या दोघांनी त्यांचा वाटा सर्वात आधी गिळून टाकला. मार्सेलोनंही बळंबळं मांस घशात लोटलं—इतरांना धीर यावा म्हणून. एकामागून एक सर्वांनी जगण्याचा तो मार्ग स्वीकारला. फक्त लिलियाना अन् जेव्हियर तेवढे तयार झाले नाहीत.

आता मृत शरीरंच त्यांचा आधार होता. त्यातल्या त्यात सशक्त लोकांनी ती टिकवून ठेवण्याचं काम स्वीकारलं. नैसर्गिक बर्फागारा-

मुळं तो प्रश्न नव्हताच म्हणा; वाटपव्यवस्था ही त्यांची मुख्य कामगिरी, अशक्त लोक पाणी 'तयार' करण्यात गुंतले. मांसाचे पुरेसे तुकडे कापून झाल्यावर कॅनेसा जखमी मुलांच्या शुश्रूषेला लागला. बाह्य जखमा भरून येऊ लागल्या होत्या, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट. ज्यांची हाडं मोडली होती, त्या त्या ठिकाणी आलेली सूजही ओसरत येत होती. फक्त एकदोघांच्या जखमांनी गंभीर स्वरूप धारण केलं होतं.

ज्या एन्‌रिकच्या पोटातून स्टीलची नळी उपसून काढली, तो बिलकुल ठीक होता. फक्त त्या जागेतून कसला तरी आतला अवयवाचा एक तुकडा डोकावत होता. जखम केव्हाच सुकली होती. तो तुकडाही वाळून गेला होता. कॅनेसाला वाटलं की तो कापून टाकला तरी चालेल.

'पण हे आहे काय ?' एन्‌रिकनं विचारलं.

खांदे उडवून कॅनेसा म्हणाला, 'काही सांगता येत नाही. ते पोटावरचं कातडी आवरण असावं; पण जर का तो आतड्याचा भाग असेल तर कापावा का नाही हा प्रश्नच आहे.'

'तुला वाटेल तसं कर.' असं म्हणून एन्‌रिक दारात आडवा झाला.

कॅनेसा शस्त्रक्रियेच्या तयारीला लागला. काचेचा तुकडा किंवा दाढीचं ब्लेड त्याला चाकू म्हणून वापरावं लागणार होतं. शून्याखालच्या तपमानामुळं जागा आपोआपच निर्जंतुक झालेली. कोलन वॉटरनं जखमेची जागा त्यानं धुऊन काढली; अत्यंत काळजीपूर्वक, संवेदना गेलेला वरचा तुकडा कापला. एन्‌रिकला काहीच जाणवलं नाही. कॅनेसानं राहिलेला भाग आत पोटात ढकलण्याचा प्रयत्न केला, पण तो जाईना. म्हणून भीत भीत त्यानं थोडा पुढचाही भाग कापला. नंतर मात्र उरलेला भाग आत शिरला. 'इथे शिवून टाकू, का नुसती पट्टी बांधली तर चालेल ? दोरा तर नाहीच म्हणा.'

कोपरांवर जोर देऊन उठत एन्‌रिक म्हणाला, 'जाऊ दे. काम एकदम झकास झालं. फक्त इथे बांधून टाक म्हणजे मी मोकळा झालो.'

रग्बीचा शर्टच त्या जागी कॅनेसानं घट्ट बांधून टाकला. पाय झटकून एन्‌रिक उभा राहिला. 'आता मी मोहिमेवर जायला सुद्धा तयार आहे, बरं का?' तो म्हणाला, 'आणि जेव्हा मॉन्टेव्हिडिओला परतू तेव्हा आमचा फॅमिली-डॉक्टर तूच. तुझ्याहून चांगला डॉक्टर कोणी मिळेल असं मला नाही वाटत.'

विमानाबाहेर, निकोलिशप्रमाणे, कार्लिटस पेझनंही आई, वडील आणि बहिणींना पत्रं लिहिण्याचा कार्यक्रम चालवला होता. त्यानं आजीला लिहिलं :

> आजवर तुला आयुष्यात खूपच आघात सोसावे लागले आहेत. या नव्या संकटामुळं तुझ्या मनाची स्थिती काय झाली असेल याची मी कल्पनाच करू शकत नाही. तुझी मला किती तीव्रतेनं आठवण येते म्हणून सांगू ? माझ्यावर तू निरतिशय प्रेम केलंस. किती तरी चांगल्या गोष्टी शिकवल्यास. मुख्य म्हणजे ईश्वरावरील श्रद्धा. आता तर ती पराकोटीला पोचली आहे...अखिल जगात तुझ्याइतकी प्रेमळ आजी शोधून सापडणार नाही. मी जिवंत असेपर्यंत, क्षणाक्षणाला तुझी आठवण मला येत राहील. □

## : ५ :

विमान ज्या मार्गानं घसरत खाली आलं, तिथून झेर्बिनो, तुर्कोी आणि मास्पॉन्स हे पर्वत चढू लागले. दर वीस-पंचवीस पावलांवर त्यांना विसावा घ्यावा लागे. हृदयाचे जलद पडणारे ठोके मूळपदावर आल्यानंतरच पुढे पाऊल टाकता येई. चढ उभा होता, त्यामुळं उघड्या हातांनी बर्फ पकडून चालावं लागे. घाईघाईनं निघाल्यामुळं उंचावर चढताना आवश्यक ती पूर्ण तयारी झाली नव्हती. कपडे अगदीच अपुरे. साधे सदरे, पातळ विजार, स्वेटर आणि हलकं जाकिट; वस्स् दणकट असूनही गेल्या अकरा दिवसांत तिघांचीही त्यातून चांगलीच उपासमार झालेली.

हवेत फारसा गारठा नव्हता. त्यांच्या पाठीवर ऊन पडत असल्यामुळं ऊबही मिळत होती. पाय मात्र बर्फामधे सतत बुडलेले राहायचे. त्यांनाच सर्वांत जास्त त्रास पडत होता. दुपारनंतर एक मोठा खडक लागला. आजूबाजूला बर्फ वितळू लागला होता. झेर्बिनो खाली वाकला; गाल बर्फाला चिकटवून तो थेंब थेंब पाणी पिऊ लागला.

संध्याकाळचे सात वाजले तरी शिखरापर्यंतचं जेमतेम निम्मं अंतर संपलं होतं. सूर्य पर्वताआड गेल्यामुळं तुरळक प्रकाश बाकी राहिला. काय करावं हा प्रश्नच होता. तिघंही खाली बसले. तिथेच उघड्यावर रात्र काढली तर थंडीनं काकडून मृत्यू आल्याशिवाय राहणार नाही, यावर तिघांचंही एकमत झालं. मागं परतायचं तर इतके श्रम केले कशासाठी ? शिखरावर तरी पोचलं पाहिजे किंवा विमानाचं शेपूट तरी सापडलं पाहिजे. त्यात बॅटऱ्या होत्या. सत्तावीस जणांचं जीवन त्यावरच अवलंबून होतं. म्हणून रात्र त्या जागीच काढायचा त्यांनी निश्चय केला. आडोशासाठी खडकाची एखादी कपार मिळाली तर उत्तमच.

थोडं पुढं गेल्यावर त्यांना बर्फ न साठलेले खडक दिसले. तिथेच काही दगड पडले होते. ते एकमेकांवर रचून आडोसा निर्माण केला. वाऱ्यापासून तेवढंच संरक्षण. रात्र पडली. थंडी वाढली. तिघंही आडवे झाले. अंगातले कपडे असून-नसून सारखेच होते. झोप लागण्याचाही प्रश्नच नव्हता. एकमेकांचे हातपाय एकसारखे घासून ते कसंबसं रक्ताभिसरण चालू ठेवत होते. चेहऱ्यावर थपडा मारण्यासाठी एकजण दुसऱ्याला अजीजीनं विनंती करत होता. शेवटी तर तोंडातून शब्दही फुटेनासा झाला. 'दिवस बघायला आपण काही जिवंत राहत नाही' असं त्यांना वाटलं. जेव्हा पूर्वेकडून रविराज वर येताना दिसले तेव्हा त्यांचा विश्वासच बसेना. तो जसजसा वर आला, तसतसा तिघांच्या जिवात जीव आला. गोठलेल्या शरीरात ऊब निर्माण होऊ लागली. अंगातले थंड झालेले कपडे त्यांनी काढून टाकले. सूर्य ढगाआड गेल्यावर पुन्हा तसेच अंगात चढवले. शिखराकडे त्यांची वाटचाल सुरू झाली.

मधूनमधून विश्रांतीसाठी थांबावं लागतच होतं. तेव्हा मागे दृष्टी

टाकून फेअरचाइल्डचा सांगाडा ते बघत. बर्फात आता तो ठिपक्यासारखा दिसू लागला. नक्की कुठे बघायचं हे ठाऊक नसतं तर खडक आणि विमान यातला फरक लक्षात आलाच नसता. त्यांची सुटका होणं कसं शक्य नव्हतं हे आत्ता त्यांच्या लक्षात आलं. वरून, हवेतून विमान दिसणंच शक्य नव्हतं. शिखर केव्हा लागणार याचा पत्ताच नव्हता. समोर बघावं तर बर्फाच्छादित पर्वत आपले आहेतच. या गोष्टीमुळं खरं तर ते मनातून खचले. पूर्व आणि उत्तर दिशा फक्त दिसत होत्या. पश्चिम, दक्षिण पर्वतमय होत्या. शिखर जवळ आल्याचा भास एकसारखा होत होताच. तिथपर्यंत जावं तर पुढं मार्ग शिल्लक आहेच. विरळ हवेचा तो परिणाम.

अखेर थोडं पुढं-एका अपेक्षित शिखराजवळ-गेल्यानंतर मात्र त्यांच्या श्रमांना फळ आलं. इकडे तिकडे अर्धवट तुटलेले खडक पसरलेले आणि मुख्य म्हणजे विमानाच्या पंखांचे धातूचे असंख्य तुकडे इतस्ततः पडलेले दिसले. जवळच एक खुर्ची बर्फात उलटी घुसलेली आढळली. महत्प्रयासानं ती ओढून काढल्यावर खालून त्यांच्यातल्या एका मित्राचं मृत शरीर दिसलं. त्याचा चेहेरा काळाठिक्कर पडला होता. इंजिनच्या ज्वाळांमुळे तो भाजून निघाला असावा. झेर्बिनोनं त्याच्या खिशातून ओळखपत्र आणि गळ्यातला पवित्र क्रॉस काळजीपूर्वक काढून घेतला. आसपास त्यांना आणखी पाच प्रेतं सापडली. तीन ओल्ड ख्रिश्चन संघातली, दोन सेवकांची. त्यांचीही ओळखपत्रं तशीच काढून घेण्यात आली.

तिथे असलेल्या आणि खालच्या सगळ्यांची संख्या मोजायला त्यांनी सुरुवात केली. ती चव्वेचाळीस भरू लागली. एक जण कसा कमी पडतो ? मग एकदम बर्फात अदृश्य होणारा व्हेरेरा त्यांना आठवला. हिशेब बरोबर लागला : पर्वतशिखरावर सहा आणि खाली अकराजण ठार झाले; एक व्हेलेटा, फेअरचाइल्डमध्ये सध्या जिवंत असलेले चोवीस आणि ते तिघंजण.

शिखर अद्याप दूरच होतं. विमानाचं शेपूट किंवा इतर वस्तू कुठेच दिसत नव्हत्या. एका उतारावर त्यांना एक इंजिन आढळलं. ते उभे होते तिथून आजूबाजूला मोठं विलोभनीय दृश्य दिसत होतं. निसर्गाचं ते भव्य दर्शन विलक्षण होतं. सूर्याच्या परावर्तित तेजामुळं डोळे अक्षरशः फिरून जात होते. दोघांकडे गॉगल्स् होते, पण झेर्बिनोचा नेमका तुटला. पंखाच्या प्रत्येक तुकड्याशी ते थांबत. काही उपयोगी वस्तू सापडते का ते बघत. मागच्या भागातले–शेपटीपैकी–काही अवशेष दिसले, पण नेमकं शेपूट मात्र नाही. डोक्यावरचं ऊन आणि बर्फावरून परावर्तित होणाऱ्या किरणांमुळं झेर्बिनोला दिसेनासं झालं. दोघांच्या आधारानं त्याला चालवं लागत होतं. एव्हाना त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला होता. समोर विमानही दिसू लागलं.

' मला वाटतं, ' मास्पॉन्स म्हणाला, ' आपण त्यांना हे सांगता कामा नये की असली मोहीम निष्फळ आहे '

' नको, ' तुर्केटी म्हणाला. ' त्यांना आपण निराश करता कामा नये. तो पुढे म्हणाला, ' अरे, तुझ्या बुटाला काय झालंय् ?'

मास्पॉन्सनं खाली पाहिलं. त्याचा एक बूट चालताना निघून आला होता. गारठ्यामुळं पाय इतके बधिर झाले होते की त्याच्या लक्षातच ते आलं नव्हतं.

तिघांना परत येताना पाहून फेअरचाइल्डमधल्या चोवीस जणांना अत्यानंद झाला. मात्र ते जवळ आल्यावर, त्यांची शारीरिक स्थिती पाहून सगळ्यांना धक्काच बसला. विमानाच्या शेपटाचा तपास लागला नाही हे ऐकून ते पुन्हा निराश झाले. पावलं गोठून गेल्यामुळं परतलेले तिघं नीट उभंसुद्धा राहू शकत नव्हते. त्यांचा अवतार बघण्यासारखा झाला होता. पर्वतावरील त्या एका रात्रीमुळं त्यांची पार दशा झाली. झेर्बिनो तर आंधळ्यात जमा झाला.

लगेच तिघांना आत नेण्यात आलं. गाद्यांवर झोपवून त्यांना मांसाचे मोठे तुकडे देण्यात आले. ते त्यांनी आधाशासारखे फस्त केले. नंतर कॅनेसानं त्यांचे डोळे तपासून त्यात ' कॉलिरिओ ' नावाचे ड्रॉप्स् घातले. एकाच्या सूटकेसमध्ये ती बाटली सापडली होती. औषधामुळे डोळे चुरचुरले; पण काही तरी उपचार झाल्याच्या समाधानात ते राहिले. पुढचे दोन दिवस झेर्बिनोच्या डोळ्यांवर पट्टी बांधून ठेवली. त्यानंतरही उजेड आणि अंधार या दोनच गोष्टी त्याला कळत होत्या. म्हणून तो डोळे कायम झाकून ठेवू लागला. त्याच्यावर ओढवलेल्या या आपत्तीमुळं त्याचा स्वभाव चिडखोर आणि सर्वांना त्रासदायक असा बनला.

तिघांचे पायही बरेच दुखावले होते. लालबुंद होऊन ते चांगलेच सुजले. मित्रमंडळ तिथं नाजुकपणानं चोळत. प्रत्येकाच्या ध्यानात एक गोष्ट आल्यावाचून राहिली नाही : केवळ एका दिवसाच्या मोहिमेनं त्यांच्यातल्या सर्वांत बळकट अशा तिघांना जमीनदोस्त केलं; जवळजवळ ठारच केलं म्हणा ना !

पुन्हा एकदा सर्वांचं मनोधैर्य खचलं. ◻

## : ६ :

ज्या वेळी सूर्यावर ढग जमा होत, तेव्हा पाणी बनवण्याची प्रक्रिया बंद होई. मग बाटल्यांत बर्फ भरून, त्या जोरजोरात हलवण्याची जुनी पद्धत वापरावी लागे. त्यातूनच रॉय आणि पेझ यांना एक कल्पना सुचली. कोकाकोलाची लाकडी खोकी सामानाच्या जागेत पडून होती. त्याच्यापासून विस्तव पेटवून त्यावर ॲल्युमिनियमची भांडी बर्फ घालून ठेवण्यात आली. कडेच्या भोकातून बाटलीमध्ये पाणी साचू लागलं. थोड्याच वेळात पुरेसं पाणी साठलं.

अजूनही उष्णता कायम होती; त्यावर मांस भाजून काढावं असं त्यांना वाटलं. फार नाही; पण किंचित लालसर झाल्यावर मांसाच्या तुकड्यांना अवीट चव आली–साधारण बीफइतकीच म्हणा ना.

तो दरवळलेला वास सगळीकडे पसरल्यामुळं इतरही मुलं विस्तवाभोवती जमा झाली. ज्यांना नुसते तुकडे खाताना जड जात होतं किंवा शरम वाटत असे त्यांना ही सुधारणा पसंत पडली. चावायलाही सोपं अन् चवीला बरं !

त्यातही कॅनेसा, फिटो प्रभृतींनी विरोध सुरू केलाच. मांस भाजणं कसं अयोग्य आहे, हे माहितीवजा अधिकारवाणीनं–नेहमीच्या सवयीप्रमाणं–कॅनेसा सांगू लागला. ' तुमच्या लक्षात कसं येत नाही ? तपमान चाळीस डिग्रीच्या वर गेलं की पदार्थातली प्रोटीन्स नष्ट होतात. तुम्हाला जास्तीत जास्त फायदा हवा असेल तर मांस कच्चं खाणंच चांगलं. '

'आणि ते भाजलं की आकार लहान होतो. अन्न म्हणून जी काय त्याला किंमत आहे ती धुरावरोबर उडून जाते.' फर्नांडिस म्हणाला, 'किंवा वितळून नाहीशी होते.'

या युक्तिवादाचा रॉय, इन्शार्ते इत्यादि मुलांवर काहीचाही परिणाम झाला नाही. कच्च्या मांसापासून मिळणाऱ्या उष्णतेलाही मर्यादा होत्याच. मग निदान खाणं तरी सुसह्य व्हावं; पण हा प्रश्न लवकरच निकालात निघाला. लाकडी खोकी तीनच असल्यामुळं जळण संपुष्टात आलं. शिवाय बर्फावर, झंझावाती वाऱ्याला तोंड देत विस्तव पेटवताना फारच त्रास पडे.

पुढच्या काही दिवसांत एडयुअर्डो इतका अशक्त झाला की त्याच्या मित्रांनी त्याच्या तोंडात मांस बळंच घालायला सुरुवात केली. हार्ले, इन्शार्ते आणि तुर्कैटी जेमतेम जिवंत राहण्याइतकं खात असत. अजिबात न खाणारे फक्त दोघंच होते. लिलियाना आणि जेव्हियर मिथॉल. नवीन अन्नामुळं हे दोघं सोडून राहिलेल्या पंचवीसजणांच्या चेहऱ्यावर तजेला आला आणि चॉकलेटचा मामुली तुकडा, थोडीशी दारू यावरच निभावून नेल्यामुळं ते नवरा-बायको पार वाळून गेले. अंगात होती-नव्हती ती सारी शक्ती नष्ट झाली.

मुलं गुपचुप त्यांची स्थिती न्याहाळत होती. मार्सेलोनं पुनःपुन्हा हात जोडून केलेल्या विनंतीला दोघांनीही दाद दिली नाही. त्यानं सर्व प्रकारचे युक्तिवाद वापरून पाहिले; पण तो हरला.

लिलियाना त्याला म्हणायची, 'तुम्ही तसं करण्यात काहीएक चूक नाही, मार्सेलो; पण मला ते शक्य नाही रे. कधी जमणारच नाही तर.' जेव्हियरसुद्धा तिच्या मताशी सहमत होता. त्याला अजूनही अति उंचीचा (विरळ हवामानाचा) त्रास होतच होता. लिलियाना त्याची लहान मुलासारखी काळजी घेई.

दिवस अत्यंत सावकाशीनं पुढे जात होते. खूप वेळा त्या दोघांना एकाकीपण खायला उठे. मग ते आपल्या घराविषयी बोलत बसत. मुलं आता काय करत असतील? तीन वर्षांची 'मारी' आईसाठी रडत असेल का? किंवा मोठी– दहा वर्षांची– 'मेरिया' गृहपाठ करण्यात गुंतली असेल. इ. इ. मुलांचे आजी-आजोबा त्यांची काळजी नक्की घेतील या विचारानं लिलियाना स्वस्थ राही. आईवडलांना आता कॅरास्कोमधल्या आपल्या घरीच कायम ठेवून घ्यावं असं तिनं मनोमन ठरवलं. जावयांना सासु-सासरे घरी आलेले बहुधा आवडत नाहीत म्हणून तिनं जेव्हियरजवळ भीत भीत तो विषय काढला. पण त्यानं उलट मंद स्मित करून म्हटलं, 'जरूर. ही गोष्ट आपल्याला पूर्वीच कशी वरं सुचली नाही?'

त्या विषयावर दोघं भान विसरून बोलत राहिले.

नंतर मात्र जेव्हियरचा मांस न खाण्याचा निश्चिय ढासळला. पुढच्या खेपेला जेव्हा मार्सेलोनं एक तुकडा समोर केला, तेव्हा त्यानं न बोलता तो गिळून टाकला.

लिलियानाचा निग्रह तसाच कायम होता. प्राण कंठाशी येऊनही चेहेरा प्रसन्न ठेवण्यात ती यशस्वी झाली. तिनं मुलांना एक चिठ्ठी लिहिली. त्यांच्यावरील प्रेम त्यात ओसंडत होतं. साक्षात मृत्यूशी गाठ असल्यामुळं तिनं नवऱ्याची सोबत कधीही सोडली नाही. परिस्थितीमुळं दोघं पूर्वीपेक्षाही जवळ आले– एकजीव झाले. चारी मुलांची आठवण झाली की दोघांच्याही डोळ्यांत अश्रू तरळून जात. पुन्हा ती दृष्टीस पडणार का? मुलांचं सुख निसर्गानं हिरावून घेतल्यामुळं त्यांच्यावरील प्रेमाचं महत्त्व या वेळी विशेषकरून जाणवत होतं.

अशीच एक संध्याकाळ. सूर्यास्त झाला. सत्तावीस जण निवाऱ्यासाठी तयारी करू लागले. लिलियाना जेव्हियरकडे वळली आणि म्हणाली, 'आपण परत गेलो ना की मला आणखी एक मूल हवंय बरं का?' ते दोघं जिवंत राहू शकले, तर परमेश्वराचीच तशी इच्छा असणार या कल्पनेनं तिला मुलाची मागणी करावीशी वाटली.

जेव्हियरला अत्यानंद झाला. त्याचंही मुलांवर खूप प्रेम होतं, आणखी मुलांची हौसही. त्यानं तिच्याकडे टक लावून पाहिलं. त्याच्या लक्षात आलं की गेल्या दहा दिवसांत तिनं काहीही न खाल्ल्यामुळं केवळ तिचं शरीर अस्थिपंजर झालं होतं. आवाजही खोल गेला होता. गालफडं वर आलेली आणि डोळे खोल. फक्त तिचं पूर्वीचं मधुर हास्य तेवढं बाकी होतं. तो म्हणाला, 'लिलियाना, आपण परिस्थितीला तोंड द्यायलाच हवं. नीट विचार कर. आपण जिवंतच नाही राहिलो तर तुझी इच्छा कशी वरं पुरी होईल?'

तिनं मान हलवली. 'बरोबर आहे.'

'आपण जगावं अशी ईश्वराचीच इच्छा दिसते.'

'होय. त्याची तशीच इच्छा आहे.'

'आणि त्यासाठी फक्त एकच मार्ग आहे.'

'होय. मार्ग एकच आहे.'

अशक्तपणामुळं अत्यंत सावकाश चालत दोघंही मुलांच्या घोळक्यापाशी आले. फेअरचाइल्डमध्ये शिरायच्या तयारीत ते सगळे होते.

'माझा विचार बदललाय,' लिलियाना मार्सेलोजवळ जाऊन म्हणाली. 'मी ते मांस खाईन.'

मार्सेलो विमानाच्या छतावर चढला. नरमांसाचा एक लहानसर तुकडा त्यानं खाली आणला. उन्हात तो सुकला होता. लिलियानानं तो थरथरत घेतला आणि निमूटपणे पोटात ढकलला.

[क्रमशः]


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)

पंचावन्न रुपये

पुस्तके

# साने गुरुजी जीवनगाथा

सुमती देवस्थळे

साने गुरुजी जीवनगाथा हे पुस्तक कालच वाचून संपविले. एखाद्या सुंदर गोष्टीचा आस्वाद घेतल्यावर त्याबद्दलचा आनंद कोणाला तरी सांगून टाकल्याशिवाय चैन पडत नाही, म्हणून माझी प्रतिक्रिया आपणास कळवीत आहे.

या जीवनगाथेचे पहिले वैशिष्ट्य असे, की ती हाती घेतल्यावर संपूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवताच येत नाही. वाचकाला असे बांधून टाकायचे, ओढ लावण्याचे सामर्थ्य गाथेत जरूर आहे. गुरुजींचा सबंध जीवनपट हळव्या हाताने व सहृदयतेने येथे उलगडून दाखविलेला आहे. श्री. राजा मंगळवेढेकर यांना गुरुजींचा सहवास लाभलेला असल्याने गुरुजींविषयीच्या विलक्षण आत्मीयतेचा सुगंध वाचकांना सर्वत्र जाणवतो– किंबहुना ती आत्मीयता हीच पुस्तकाची खरी प्रेरणा आहे.

गुरुजींना जाऊन पंचवीस वर्षे झाली. तरीही त्यांचे संपूर्ण, तपशीलवार अभ्यासपूर्ण असे चरित्र आजवर उपलब्ध नव्हते. गुरुजींच्या आठवणी लिहिणारी छोटी छोटी पुस्तके होती; परंतु विस्तृत चरित्राची उणीव होती. त्यासाठी पुरेसे साधनग्रंथ उपलब्ध नव्हते. श्री. मंगळवेढेकर यांनी खानदेशच्या खेडोपाडी हिंडून गुरुजींच्या सहवासातील मंडळींच्या तोंडून हे साधनग्रंथ जणू ऐकले, अनुभविले आणि गुरुजींच्या समग्र चरित्राची उणीव उत्तम रीतीने भरून काढली म्हणून त्यांचे अभिनंदन !

या जीवनगाथेतील एकंदर चार खण्डांपैकी पहिल्या खण्डातील पुष्कळसा भाग सर्वसामान्य मराठी वाचकाच्या परिचयाचा आहे. खुद्द गुरुजींनीच शामची आई, जीवनकलह, शामखण्ड यामध्ये आत्मचरित्रात्मक असा किती तरी मजकूर लिहून ठेवलेला आहे. त्याचे संकलन श्री. मंगळवेढेकर यांनी कसबी कारागिराप्रमाणे केले आहे. कारण आशय माहीत असूनही वाचक पाने उलटून पुढे जात नाही– संकलनात्मक भागही नीट मन लावून वाचावा इतका सरस उतरला आहे. मातेने केलेले उदात्त संस्कार, विद्येसाठी जिवाचे रान करून एम्. ए. पर्यंत शिक्षण घेणारा जिज्ञासू विद्यार्थी आणि अखंड दारिद्र्याच्या सहवासातही जपलेले स्वत्व, स्वाभिमान– हे सारे फार श्रेष्ठ आदर्श नेमके टिपून दाखविले आहेत. आजच्या पिढीतील विद्यार्थी हा सारा भाग वाचतील, तर जुन्या पिढीतील एका होतकरू विद्यार्थ्याचे उत्तम प्रातिनिधिक चित्र त्यांच्या नजरेसमोर उभे राहील आणि ते निश्चितच स्फूर्तिदायक ठरेल.

दुसऱ्या खण्डात गुरुजींनी शिक्षणक्षेत्रात केलेली कामगिरी दिसते. शिक्षक म्हणून गुरुजींनी केलेले काम केवळ आदर्शच नव्हे तर वंदनीय ठरावे इतक्या मोलाचे आहे. त्यांच्यासारखा जीवनस्पर्शी शिक्षक विरळा ! ते केवळ शिक्षकच नव्हते, तर मुलांची आई होऊन राहिले होते आणि म्हणूनच त्यांच्या पावनस्पर्शाने स्फूर्ती घेतलेले विद्यार्थी आज विविध सामाजिक क्षेत्रात उत्साहाने काम करताना दिसतात. इतकी जबरदस्त प्रेरणा देण्याचे सामर्थ्य गुरुजींच्या आचारविचारात व शिकविण्यात होते. आजच्या शिक्षणक्षेत्राला जे सामान्यतः बाजारी स्वरूप आलेले आहे, ते लक्षात घेतले तर सानेगुरुजींचे कार्य मूल्यमापन करण्याच्याही पलीकडचे आहे. नुसता विषय शिकवून बाजूला न होता विद्यार्थ्यांच्या आयुष्यात जीवनस्पर्शी शिक्षक म्हणून त्यांनी जे स्थान मिळविले ते अनन्यसाधारण ! सतत नवे नवे उपक्रम हाती घेणे, विद्यार्थ्यांना कार्यप्रवण करणे, सुप्त गुणांचा कंद फुलविणे, देशभक्तीची ज्योत पेटविणे, विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्या भागविणे, वेळेनुसार स्वतः उपाशी राहून मुलांची फी भरणे, पहाटे ४ ते ६ मुलांसाठी दैनिक लिहिणे, उपेक्षितांबद्दल कळकळ, विद्यार्थी योग्य रीतीने वागले नाहीत तर 'मुकी कळी– योग्य वेळ आल्याशिवाय फुलत नाही' असे म्हणून स्वतःची समजूत घालणे, आणि सतत विद्यार्थ्यांच्यात राहूनही अखण्ड ज्ञानसाधना करणे, पुस्तके लिहिणे– हे सारे वाचून मन गलबलून जाते. वाटतं, कसा जगला असेल हा माणूस ? केवढे खडतर व्रत सांभाळले गुरुजींनी !

तिसऱ्या खंडात गुरुजींनी शाळेच्या चार भिंतींपलीकडे सेवेचे क्षेत्र विस्तृत केले होते, त्यासंबंधीची हकीकत वाचायला मिळते. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' अशासारखी मानवतेवरील प्रेमाची गाणी, आणि 'काँग्रेस मायबाप। जाळील सर्व ताप' अशी काँग्रेसशक्तीने रसरसलेली गाणी लिहिणारे, खानदेशभर सतत दौरे करणारे, लोकांना देशभक्ती शिकविणारे, कताईची दीक्षा देणारे, किसानांवरील अन्याय वेशीवर टांगणारे गुरुजी दिसतात. त्यांनी महाराष्ट्रभर केलेली भ्रमंती, खानदेशातले जागृतिकार्य... यासंबंधीचा सर्व तपशील सुसंगतपणे मराठीत आला हे फार चांगले झाले. Public memory ts very short ! म्हणून गुरुजींच्या त्या कार्याची जाण लोक कदाचित विसरले असतील. विशेषतः ३६–३७ साली गुरुजींना वाटलेले कम्युनिस्ट विचारसरणीचे आकर्षण, त्यांनी लढविलेले कामगारांचे लढे कम्युनिस्टांनी त्यांचा केलेला 'वापर', नंतर कम्युनिस्टांचे राष्ट्रघातकी वर्तन पाहून आलेली विमनस्कता, कम्युनिस्टांनी गुरुजींच्या निंदेचा केलेला प्रचार (गुरुजींना राजकारणातले काहीही कळत नाही. ते केवळ आंधळे भावनाप्रधान गृहस्थ आहेत.) ...हा सारा भाग म्हणजे महाराष्ट्राचा अर्वाचीन इतिहास आहे. गुरुजी राजकारणाशी एकरूप झालेले असल्याने गाथेत असा राजकीय व सामाजिक इतिहास अपरिहार्यपणे आलेला आहे आणि तो ठिगळवजा किंवा बोजड न ठरता गाथेच्या पोताशी एकरूप झालेला आहे– ते

श्रेय लेखकाचे. त्रिपुरी काँग्रेस, काँग्रेसने मंत्रिमंडळात शिरून सत्ता ग्रहण केल्यावर नेत्यांची वदललेली दृष्टी; काँग्रेसमधीलच एका गटाने गुरुजींविरुद्ध हाकाटी उठवून त्यांचे ‘ काँग्रेस ’ नामक साप्ताहिक बंद पाडण्याचा केलेला विघातक उपक्रम हा सारा तपशील उद्वेगजनक आहे– आणि काँग्रेसचे टिळेमाळा लावून हिंडणाऱ्या तत्कालीन मंडळींना तर केवळ लज्जास्पद आहे. या साऱ्या घटनांचा परिणाम म्हणजे गुरुजींना झालेला तीव्र मनस्ताप, गर्दीत असूनही झालेली स्वतःच्या एकाकीपणाची जाणीव, आपले कष्ट वांझोटे ठरण्याची आशंका, समाजाला खऱ्या अर्थाने आपण काही देऊ शकलो नाही असा विपर्यस्त ग्रह, माणसातल्या सत्प्रवृत्तीला केलेले आव्हान केवळ क्षणजीवी ठरले असल्याच्या वस्तुस्थितीची जाणीव, सत्तेच्या आमिषाने स्वत्व सोडून कोणतीही तडजोड स्वीकारण्याचा वोटचेपेपणा लोक करतात याची जाणीव– हे सारे सामाजिक दोष गुरुजींना स्पष्टपणे दिसत गेले. त्याचा आलेख श्री. मंगळवेढेकरांनी सुसंगत टिपलेला आहे– शंकरराव देवांनी गुरुजींच्या विस्तृत वाङ्मयसेवेला दिलेली ‘ डुकरिणीच्या पिलाची ’ उपमा याच जातीची ! अर्थात असल्या कटुस्मृतींना छेद देऊन गुरुजींच्या गुणवैशिष्टयांचे यथार्थ वर्णन करणाऱ्या सुवर्णस्मृतीही जागोजाग आढळतात. त्यांचे मानकरी आहेत एस्.एम्., आचार्य जावडेकर, विनोबा, शिरुभाऊ लिमये, ग. प्र. प्रधान, वगाराम तुळपुळे, इ. खेरीज घरगुती पत्रव्यवहार– भावाला लिहिलेली पत्रे, इतर थोर पुढाऱ्यांशी केलेला पत्रव्यवहार– त्यांचीही थोडीफार झलक पहायला सापडते. या साऱ्या खास आठवणींचा सुगंध वाचकाला पुस्तकाशी अक्षरशः खिळवून टाकणारा आहे.

या जीवनगाथेत गुरुजींच्या अनेक पुस्तकांच्या जन्मकथा आलेल्या आहेत. एका रात्रीत १५० पाने लिहून हातावेगळी करणे, दोन दोन वा तीन-चार दिवसांत, झपाटल्यासारखे लिहीत बसून पुस्तक पुरे करणे वगैरे हकिकती विस्मयकारक वाटतात. गुरुजींचे हृदय भरलेले असे–पुस्तक लिहायचे म्हणजे अनावर झालेला भावनोद्रेक ओतून टाकायचा. ‘भारतीय संस्कृती’ या त्यांच्या पुस्तकाची जन्मकथा अशीच विलक्षण आहे. खानदेशातून पुण्याला विद्येसाठी आलेल्या तरुणांना स्वैपाक करून जेवू घालायचे, त्यांची आई घेते तशी सारी काळजी घ्यायची–अन् मुले कॉलेजला गेली की रिकाम्या वेळात भारतीय संस्कृतीचे एकेक वैशिष्टय समर्पक रीतीने व्यक्त करणारा सुंदर ग्रंथ लिहायचा. विशेषतः खास संदर्भग्रंथ जवळ नसूनही केवळ मुखोद्गत असलेल्या संदर्भावर विसंबून लिखाण करायचे ! अशा किती तरी पुस्तकांच्या जन्मकथा या गाथेत वाचायला मिळतात आणि गुरुजींच्या उत्कट प्रतिभेची साक्ष मिळते.

या जीवनगाथेत गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक जीवनपैलू दिसतात. स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला निःशंकपणे झोकून देणारे गुरुजी, गांधीजी व विनोबा यांच्याविषयी अपरंपार श्रद्धा बाळगणारे गुरुजी, स्वातंत्र्यलढ्यातल्या सहकाऱ्यांबद्दल कमालीचा स्नेहादर बाळगणारे, दलितांच्या दुःखाने विमनस्क झालेले, मुलांच्या निरागस सहवासात आईच्या मायेने वावरणारे, मुलांच्या उमलत्या मनावर देशभक्तीचा संस्कार व्हावा म्हणून दररोज पहाटे ४ ते ६ पर्यंत दैनिक लिहिणारे, स्त्रीगीतातील आरस्पानी काव्यात रमणारे, त्या गीतांचा संग्रह करणारे, वहिनीच्या अखेरच्या दुखण्यातही ‘ओवी आठवते का बघ ’ अशी विनवणी करणारे, शेतकरी व कामगार यांच्या सुखदुःखांशी तन्मय झालेले, पंढरपूरचे देऊळ सर्वांना खुले व्हावे म्हणून प्राणान्तिक उपोषण करणारे, स्वातंत्र्यानंतर भ्रमनिरास झाला असूनही ‘साधने’चा संसार मांडणारे...अशा नानाविध प्रसंगांत गुरुजींचे दर्शन श्री. मंगळवेढेकरांनी घडविले आहे आणि त्यामुळेच ही जीवनगाथा संपन्न व चैतन्यमय झाली आहे.

चौथ्या खण्डातील उत्तरार्ध या गाथेतील सर्वात उत्कट आणि काव्यात्म असा भाग. एखाद्या काव्याच्या सर्गाइतके ते लिखाण रसपूर्ण झाले आहे. इथे लेखक गुरुजींशी एकरूप झाल्याचा प्रत्यय येतो. गुरुजींच्या जीवनाचा व वाङ्मयाचा अत्यंत तन्मयतेने अभ्यास केल्यामुळे मंगळवेढेकरांच्या शैलीवरही गुरुजींच्या शैलीचा प्रभाव पडला आहे. समारोप हे प्रकरण त्यातल्या त्यात जास्त वेधक उतरले आहे. गुरुजींनी प्राणार्पण का केले याची कारणमीमांसा अत्यंत सहृदयपणे दिली आहे. गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल थोरामोठ्यांनी काढलेले समर्पक उद्गारही



वाचायला मिळतात. त्यांची कोणतेही कार्य करताना निर्माण होणारी All Consuming passion, अत्यंत उत्कट भाववृत्ती त्यापायी येणारा एक प्रकारचा अधिरेपणा, सपर्पणाची वृत्ती. When I give, I give all ' अशा निःसंग समर्पणाचा स्थायीभाव, मनातले करुणार्द्र उदास उमाळे, वात्सल्यात परिणत होणारी करुणा. निसर्गाशी तन्मय होणारे सौन्दर्यप्रेमी कविमन...हे सारे जीवनगाथेत शब्दांकित झाले आहे. कधी आपल्याला 'करी मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे ' या निष्ठेतून मुलायम आवाजात मुलांना गोष्टी सांगणारे गुरुजी दिसतात, मुलांच्या मनावर उत्तमोत्तम संस्कार करण्याची तळमळ स्पष्ट होते, तर कधी त्यांचे संतत्व व राजकारण या दोन भूमिका एकमेकांशी स्पर्धा करताना दिसतात. अखेरीस महामानवाचे उदास एकाकीपण वाटचाला आल्याची जाणीव होते. 'माझीये जातीचा मज भेटो कोणी ' असा टाहो फोडणारा तुकाराम गुरुजींच्याही ठिकाणी दिसतो. आपल्यासारख्या मनोवृत्तीचा – आपल्या जातीचा–'एक 'ही त्यांना अखेर भेटला नाही. अस्वस्थ एकलेपणा अखेर असह्य झाला. ती मनोभावना व्यक्त करणारी अखेरची परिशिष्टे, शेवटची इच्छा, अखेरची पत्रे, निरवानिरव, सर्वांचे केलेले स्मरण–हे सारे काही पिळवटून टाकणारे आहे. वस्तुतः हे सारे पूर्वी वेगवेगळ्या संदर्भात वाचलेले. तरीही गाथेत ते यायलाच हवे होते–कारण त्याविना गुरुजींचे जीवनशिल्प पुरे होऊ शकले नसते.

एक गोष्ट खटकली. Discovery of India या नेहरूंच्या पुस्तकाचे गुरुजींनी केलेले भाषांतर अद्याप प्रकाशित होऊ शकले नाही. खेरीज इस्लाम संस्कृतीवरील व चिनी संस्कृतीवरील लिखाणही अद्याप अप्रसिद्ध कसे काय राहू शकते ? त्यांचे ते ग्रंथ आज २५ वर्षे झाली तरी अप्रसिद्ध रहावेत ? त्यांच्या प्रसिद्धीसाठी कोणतीही योजना कार्यवाही होऊ नये ?

हे पुस्तक लिहिताना श्री. मंगळवेढेकर यांनी निरलस बुद्धीने मेहनत व अभ्यास केल्याची साक्ष पटते. सबंध ग्रंथ ४०० पानांचा. त्यातील निरनिराळी उद्धृते नुसती वेगळी काढली तर २०० पानांवर मजकूर होईल. कुठे कुठे असे वाटते की एवढे प्रचंड भाषण किंवा प्रदीर्घ लेख उद्धृत केला नसता, आणि फक्त मुद्द्याचा भागच फक्त संकलित करून दिला असता तरीही तो पुरेसा ठरला असता. प्रदीर्घ उद्धृते वाचताना लेखक बराच वेळ पडद्यामागे गेल्यासारखे वाटते आणि प्रवाही निवेदनात अडथळा येतो–तथापि अशी प्रदीर्घ उद्धृते एकंदर संख्येने कमी भरतील

जीवनगाथेचे स्वरूप अत्यंत लोभसवाणे आहे. प्रशस्त आकार–मोकळी सुंदर छपाई, अनुरूप छायाचित्रे, सुंदर अर्थगर्भ रेखाटने हा सारा साज पुस्तकाच्या अंतरंगातल्या गोडीत भर टाकणारा आहे. पुस्तक हाती घेता क्षणी आपण एक सौंदर्यपूर्ण वस्तू हातात घेतल्याची जाणीव होते.

साने गुरुजींची जीवनगाथा हा श्री. मंगळवेढेकर यांना गुरुजींविषयी वाटणाऱ्या कृतज्ञतेचा अप्रतिम आविष्कार आहे. ही गाथा महाराष्ट्राच्या केवळ साहित्यिक क्षेत्रातच नव्हे, तर सांस्कृतिक क्षेत्रातही मोलाची भर ठरावी. ◻

**साने गुरुजी जीवनगाथा**
राजा मंगळवेढेकर
साधना प्रकाशन, पुणे
(गुरुजींची २५ वी पुण्यतिथी)
पृष्ठसंख्या ४००, किंमत रु. ४०


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे

आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार

स्वस्त दरात

बेल बॉटम पिसेस

कुडता पिसेस



# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

**९-८-७५ ते १५-८-७५**

---

## आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे स्थान उंचावेल

आर्थिक, भौतिक व विज्ञानक्षेत्रात भारत प्रगतीचा टप्पा गाठील हा मी व्यक्त केलेला ज्योतिषी अंदाज आता खरा ठरला आहे. व्यक्तीच्या कर्तबगारीला अंतरिक्षातील ग्रहांची जेव्हा मदत मिळते तेव्हा ती व्यक्ती राष्ट्राच्या जीवनातही महत्त्वाचा बदल घडवू शकते. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या भारताच्या राशीचंद्राशीच निगडित असल्यामुळे व रवी-शनी-मंगळ या ग्रहांचे जबरदस्त सामर्थ्य त्याच्या पाठीशी उभे असल्यामुळे या आठवड्यात त्यांच्याकडून एखादे महत्त्वाचे धोरणविषयक पाऊल उचलले जाण्याची शक्यता आहे. हे पाऊल आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे स्थान अकल्पितपणे उंचावण्यास उपकारक ठरेल. पाऊस आणि भूकंप, अपघात यांसारख्या नैसर्गिक बाबींचे उपद्रव या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. दक्षिण भारत, मध्य महाराष्ट्र आणि पूर्वभारत या ठिकाणी असा उपद्रव संभवतो. स्वयंशिस्त, प्रशासन, कार्यक्षमता यांचा अधिक चांगला अनुभव लोकांना येईल. महाराष्ट्रात सरकार आणि राजकीय पक्ष यांच्यात सुसंवाद सुरू होणार आहे.

---

### मेष : जमिनीचा वाद

मित्रहो, सारे ग्रह सध्या तुमच्यावर फार खूष आहेत. तुम्ही बोलावे तसे घडावे, तुम्ही करावे तसे यश मिळावे, असेच घडणार आहे. तुमचे व्यक्तिमत्त्व भारी आकर्षक व तडफदार असते. त्याचाच प्रत्यय या वेळी अनेकांना येईल. विरोधक व मित्र तुमच्या कर्तृत्वाने दिपून जावेत असेच या वेळी घडणार आहे. साहेब, तुम्हाला एखादी जमीन घ्यायची असेल किंवा वारसाहक्काने एखादी स्थावर मिळकत मिळावयाची असेल तर त्याला अनुकूल असे काम होणार आहे. तुमच्यापैकी कुणी नोकरीच्या शोधात असाल तर शक्यतो सरकारी नोकरीत प्रयत्न करा. महसूल, पोलिस, मिलिटरी अशा खात्यात नोकरी बघा, स्वतंत्र व्यवसायात इंजिनियरिंग उद्योग, रासायनिक खते, नायलॉन कापड, फळबाग, शेती व लोखंडी फर्निचर यांच्याशी संबंधित असा धंदा करा.यश तुमच्या हाती येईल. आर्थिक परिस्थितीत आता चांगलीच सुधारणा होईल. जुने येणें वसूल होईल. महिलांनी सार्वजनिक कार्यात भाग घ्यावा. त्यांना प्रतिष्ठा व मोठेपणा लाभेल. माहेरहून मदत मिळेल.

### वृषभ : नातेवाइकांचा सहवास

तुमच्यापैकी कुणी कलावंत असेल तर त्याने स्वतःच्या तारणशक्तीवर विश्वासून राहू नये. लेखक, पत्रकार असेल तर त्याने लेखणी फार जपून चालवावी. लिखाणातून कोणत्याही प्रकारची कटकट निर्माण होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्या. एरवी हा आठवडा फार छान आहे. सोमवार, मंगळवार व शुक्रवार तुमच्यासाठी शुभकारक दिवस आहेत. त्या दिवशी महत्त्वाची कामे करा. मोठे यश पदरात पडेल. तुमचे नातेवाईक व तुमचे मित्र सध्या तुमच्यावर नाराज आहेत. पण या वेळी त्यांच्या वागण्यात इतका फरक पडेल की तुम्ही आश्चर्याने थक्क होऊन जाल. हे कसे घडले हा प्रश्न तुमच्यापुढे उभा राहील. समाजकार्यात भाग घ्यायला हरकत नाही. कार्याचे चीज होईल. मोठेपणा पदरात पडेल. तुमचा पिंड राजकारणाचा नाही. त्यामुळे तुम्ही या आठवड्यात तरी स्वतः राजकारणात भाग घेऊ नका व राजकारणी व्यक्तीपासून दूर राहा. नोकरीत कामाचा ताण वाढणार आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या फायदा होईल. चार पैसे हाती खुळखुळतील. नोकरी कायम होईल.

### मिथुन : आर्थिक स्वास्थ्य

तुमच्या राशीला साडेसातीचा शेवटचा टप्पा आता सुरू झाला आहे; पण ही साडेसाती तुमच्या फायद्याचीच ठरणार आहे. आर्थिक स्थित्यंतराची सुरुवात याच आठवड्यापासून होऊ लागेल. बँकेत अजून काही दिवस तरी शिल्लक पडणार नाही. पण जमा कमी व खर्च जास्त अशी परिस्थिती आता निश्चितपणे पालटेल. नव्या कल्पना व नव्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेकांचे सहकार्य मिळेल. तांत्रिक सहकार्य देखील मिळू शकेल. तुमच्यापैकी जे लेखक व वकील असतील ते लोकप्रिय होतील. त्यांच्या बुद्धीचा प्रभाव पडेल. वक्तृत्व प्रभावी ठरेल. शहाणपणाचे व कल्पकतेचे बोलून श्रोत्यांना स्वतःकडे खेचून घ्याल. राजकारणात तुमच्या विधायक कार्याने तुम्ही स्वतःबद्दल अपेक्षा निर्माण करू शकाल. व्यापारी क्षेत्रात तुम्ही सर्व प्रकारच्या अडचणींवर मात कराल. नोकरीत कष्टाचे चीज होईल. खास कामगिरीची तुमच्यावर जबाबदारी टाकून पगारवाढ मिळेल. अनेक जण नोकरीत कायम होतील. स्वास्थ्य व समाधान मिळवून देणारा असा हा आठवडा आहे. महिलांना लेखनात व कलाक्षेत्रात प्रतिष्ठा मिळेल. नव्या वस्तू मिळण्याचा उत्तम योग आहे.

### कर्क : समस्यांवर मात

साडेसातीचा बाऊ वाटावा असे आता खरे म्हणजे तुमच्या बाबतीत काही प्रतिकूल नाही. साडेसाती आहे पण शनि पहिला आला आहे व त्याने तुमचे सारे तंत्रच बदलून टाकले आहे. तुमची प्रतिष्ठा वाढवली आहे. तुमच्या व्यक्तिमत्त्वाला आकर्षक वळण लावले आहे व अनेक क्षेत्रांत तुमचा दरारा वाढवला आहे. या वेळी त्याचे प्रगतिपर स्वरूप तुमच्या वाट्याला येणार आहे. तुमचे मनोरथ पूर्ण होणार असून तुमच्या आशाआकांक्षा पल्लवित व्हाव्यात अशाच घटना घडणार आहेत. सरकारी असोत की खाजगी अनेक दिवस रेंगाळलेली तुमची कामे या वेळी वेग घेऊ लागतील. तुम्ही बागायतदार किंवा ग्रामीण विभागातील महत्त्वाची व्यक्ती असाल तर तुमच्या गळ्यात स्तुतीचे हार पडणार आहेत. नोकरीची परिस्थिती सुधारणार आहे. उद्योग व व्यापार यातील अनेक समस्यांवर तुम्ही मात करू शकाल. राहावयास जागा मिळवण्यासाठी तुम्ही आजवर फार वणवण केली; परंतु आता हा प्रश्न सहजपणे सुटेल. महिलांना नोकरीत बढती मिळेल. मागणीप्रमाणे बदली होऊ शकेल.

### सिंह : मंगळाचे कृपाछत्र

सध्या एकटा मंगळ सोडला तर इतर कोणत्याच महत्त्वाच्या ग्रहाचे तुम्हाला सहाय्य होण्याची शक्यता नाही. मंगळ मात्र तुमच्या अनेक इच्छाआकांक्षा बहरून टाकील. राजकारणात तुम्ही केवढेही पक्के आणि हुशार


असलात तरी माघारीचा पवित्रा घेण्यातच अंतिम हित आहे हे विसरून चालणार नाही. वकिलीचा व्यवसाय ठीक चालला तरी तुमची 'केस' यशस्वी होईल याची खात्री बाळगू नका. बुद्धीचे कौशल्य दाखवूनदेखील तुम्हाला अपयशाचे भागीदारच व्हावे लागेल. या वेळी तुम्ही मुत्सद्देगिरीने वागण्यातच खरे हित आहे. नोकरीत वरिष्ठांच्या कलाने वागल्यास अनेक बाबतीत काम करणे सुसह्य होईल. बदलीची शक्यता असून अशी बदली झाली तर ती अवश्य स्वीकारा. व्यापारी बंधूंनी प्रामाणिकपणाने सर्व व्यवहार करावे. भलत्या मोहाला बळी पडू नये. महिलांनी सोमवारचा उपवास करावा. लहान प्रमाणात व्यापार केल्यास हरकत नाही.

## कन्या : अनेक प्रश्नांना चालना

कन्या ही रास संकटाची असे अनेक भविष्यकारांनी लिहून ठेवले आहे व आजही अनेक भविष्यकार त्याचा अनुवाद करतात पण कन्या राशीच्या व्यक्तींना जरी जीवनाचा मार्ग कष्टातून, संकटातून काढावा लागत असला तरी याच व्यक्ती इतिहास घडवतात. बुध हा या राशीचा स्वामी असल्यामुळे बौद्धिक क्षेत्रात या राशीची माणसे विलक्षण सामर्थ्याने चमकतात. याच सूत्राचा प्रत्यय या आठवड्यात येईल. धंद्याच्या वा पैसा मिळवण्याच्या अनेक महत्त्वपूर्ण योजना तुमच्या डोक्यात आहेत. आजवर तुम्ही फक्त त्यांच्यावर नुसताच विचार करीत होता आता त्यांना चालना मिळणार आहे. अनेक प्रश्न वेगाने पुढे सरकणार आहेत. स्थावराचा किंवा धंद्यासाठी पैसा मिळवण्याचा तुमचा प्रश्न आता मूळ धरू लागेल. नोकरीविषयक अनेक कामे पुरी होतील. बढती–बदलीचा विचार होईल. आर्थिक स्थिती सुधारेल. लॉटरीचे तिकिट घ्या. महिलांनी तब्येतीला जपावे. पाऊस अंगावर घेऊ नये. तसेच विस्तवापासून जपावे.

## तूळ : समाधान मिळेल

मंगळाच्या वागणुकीवर तुम्ही मुळीच विश्वासून राहू नका. सातवा मंगळ तुमच्या संसारात, तुमच्या कौटुंबिक जीवनात काही चमत्कार घडवून आणणार आहे. पती-पत्नीत भांडणे, मतभेद, भावाभावात तंटे असे काही तरी घडण्याची शक्यता दृष्टिआड करू नका. या आठवड्यात तुम्ही आपल्या कामात अधिक लक्ष घाला. नसत्या उठाठेवी करीत बसू नका. भावनाविवशता व मोह टाळणे आवश्यक आहे. बाकी सर्व सामान्यदृष्ट्या आठवडा तसा वाईट नाही. नोकरीच्या दृष्टीने समाधान देणाऱ्या घटना घडतील. चालू नोकरीतील अनियमितपणा संपूर्ण कायम व्हाल. एखाद्या विषयाची खास जबाबदारी तुमच्या अंगावर टाकण्यात येऊन तुम्हाला प्रमोशन देण्यात येईल. कला, व्यापार, संशोधन, कायदा या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना गुणांची जोपासना करण्याची संधी मिळेल. सोमवार, बुधवार व शुक्रवार पैशाची कामे होतील. चार पैसे शिल्लक ठेवू शकाल. उद्योगधंद्यात चलती होईल. महिलांनो, कोणतेही काम शांत चित्ताने करा. नोकरीत गुण दाखवण्याची उत्तम संधी मिळेल.




## वृश्चिक : व्यावसायिक यश

गुरूची असावी तेवढी या आठवड्यात तुमच्यावर दया नाही. त्याचा प्रामुख्याने लेखनवाचनावर व भावनेवर परिणाम होईल. कोणत्याच प्रकारच्या टीकेच्या फंदात पडू नका. त्याचप्रमाणे निंदानालस्ती करणाऱ्या लोकांच्या सहवासातदेखील राहू नका. उगीच आळ येईल व त्यातून विनाकारण विरोधक निर्माण होतील. इतर बाबतीत आठवडा बराच अनुकूल ठरणार आहे. तुम्ही शेतकरी किंवा खतकारखानदार असाल किंवा तुमचा औषधाचा व्यवसाय असेल तर या व्यवसायात बरकत येईल. आजवर झालेला तोटा कमी होऊन प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. नोकरीची परिस्थिती तशी प्रतिकूल नाही. परंतु उगाचच भीती वाटत राहील. वरिष्ठ बोलतील काय, हातून काही चूक होईल काय, काही नुकसान होईल का असे सारखे वाटत राहील; पण प्रत्यक्षात मात्र तसे काही घडणार नाही. सोमवार ते गुरुवार एखाद्या नव्या उद्योगांच्या वाटाघाटी होऊ शकतील. प्रवासाचा बेत मात्र लांबणीवर टाका. स्वतः वाहन चालवत असाल तर या आठवड्यात रजा घेतलेली उत्तम. विवाहाला किंवा विवाहाच्या ठरावालादेखील आठवडा फारसा अनुकूल नाही. महिलांनी वरिष्ठ दर्जाच्या नोकरीसाठी प्रयत्न करावेत. काही आशादायक असे हाती लागेल.

## धनू : आजारासाठी खर्च

पाचव्या गुरूच्या हाती या आठवड्यात तुमच्या दैनंदिन जीवनाची सूत्रे आहेत. मंगळ जरी विरोधकांना शांत करणार असला तरी तो व शनी तब्येतीच्या बाबतीत तुमच्याशी सहकार्य करायला तयार नाहीत हे विसरून चालणार नाही. लिव्हरचा कमकुवतपणा, पचनशक्तीची तक्रार, डोळ्यांना त्रास, जागरणामुळे उद्भवणारे तात्कालिक आजार, पित्त, रक्तदाब यांसारखे प्रकार घडल्यास तो दैवी चमत्कार समजून डॉक्टरांचे सहकार्य घ्या. हतबल होऊ नका किंवा निराशेने स्वस्थ बसू नका. एरवी सर्वसामान्य असाच हा आठवडा आहे. चालू नोकरीत वरिष्ठ अगर मालक यांना कर्तबगारी दाखवण्याची संधी तुम्हाला मिळणार आहे. मात्र तुम्ही अत्यंत प्रामाणिक राहाणे आवश्यक आहे.

आत एक व बाहेर एक असा प्रकार होऊ देऊ नका. अचानक अर्थलाभाच्या योजना या वेळी आखू शकाल. लॉटरी व रेस यात काही अर्थलाभ होईल. प्रेमविवाहाच्या भानगडीत फारसा लाभ नाही. महिलांनी छोट्या उद्योगात रस घ्यावा. चालू नोकरीत सुधारणा होईल. नोकरी कायम होईल.

**मकर : चुकीचे वागणे नको**

तुम्हाला सध्या तरी मानसिक स्वास्थ्य मिळण्याची मुळीच शक्यता नाही. तुमचे सामर्थ्य वाढले आहे हे खरे असले तरी मनात अविचार येण्याची शक्यता नाकारू नका. 'मी म्हणजे परमेश्वर' 'माझ्याशिवाय सारे जण मूर्ख आहे' इतका एकांतिक विचार तुमच्या मनात येऊ शकेल. अशा वेळी मन जास्त नियंत्रित ठेवण्याची आवश्यकता आहे. तुम्ही खाजगी नोकरीत असा किंवा सरकारी नोकरीत असा तुमच्या हाती खूप मोठे अधिकार येतील; पण अत्यंत संयमाने वागा असेच शनिमहाराजांचे तुम्हाला सांगणे आहे. शनीला प्रामाणिकपणा आवडतो, अप्रामाणिकपणाचे माणसांना तो दारुण प्रायश्चित्त देतो. म्हणूनच तुम्ही अत्यंत संयमाने वागा. नोकरी नसणाऱ्यांना या आठवड्यात नोकरी मिळू शकेल. विज्ञान, संशोधन, कायदा यांचा अभ्यास असणाऱ्यांना चांगले दिवस आहेत. शनिवारी इंजिनिअरिंग उद्योग, तेलउद्योग व लोखंडी फर्निचर यात प्रगतिकारक घटना घडतील. मोठेपणाच्या नादी लागू नका. अपमान सहन करावा लागेल. महिलांनी स्वतःच्या संततीकडे आरोग्याच्या दृष्टीने जास्त लक्ष द्यावे. नोकरी व उद्योग यात 'जैसे थे' परिस्थिती राहील.

**कुंभ : प्रगतीकडे पावले पडतील**

तत्त्वज्ञान, शास्त्र व धर्मकारण यांचे आकर्षण असलेले तुम्ही लेखक असाल तर आगामी प्रगतीच्या अनेक उत्तमोत्तम घटना तुमच्या जीवनात हा आठवडा घडवणार आहे. प्रसिद्धी, कीर्ति, सन्मान, यश यांचे नवे विक्रम तुमच्या बाबतीत घडणार आहेत. अनेक प्रयत्नांनी देखील आजवर न घडलेली अनेक कामे या वेळी घडतील. विरोधकांची आव्हाने धैर्याने तुम्ही स्वीकारू शकाल. राजकारणात शत्रू मित्र बनतील. औद्योगिक क्षेत्रात तुम्ही आजवर उराशी बाळगलेल्या महत्त्वाकांक्षा सफल होण्याचा उत्तम योग आहे. रविवार ते बुधवार व्यापार व शेती यात नव्या कल्पना उपयोगात आणू शकाल. धनिक श्रीमंत व सामाजिक प्रतिष्ठा असलेल्या एखाद्या व्यक्तीचा परिचय होईल. राहत्या जागेचा प्रश्न विकट झाला नाही तरी काही ना काही अडचणी येणार आहेत. भाडेकरू-मालकाची भांडणे, तक्रारी असे काही होऊ लागेल. पदवीधरांना नोकरीच्या बाबतीत काही आश्वासने मिळू शकतील. जे लोक उपासनामार्गी असतील त्यांना आत्मसाक्षात्कार होऊ शकेल. विद्यार्थ्यांना नवी क्षितिजे दिसू लागतील. मन उत्साही राहील. महिलांना घरगुती क्षेत्रात नेतृत्व मिळेल. उद्योगात प्रगती होईल. लहान धंदा सुरू करता येईल.

**मीन : पैशाचा उत्तम योग**

या आठवड्यातील तुमच्या राशीचे ग्रहमान सर्वसामान्यतः अनुकूल आहे. पाचवा शनि सर्वच क्षेत्रामध्ये तुमच्या यशाच्या पताका फडकवणार आहे, तर राशिस्वामी गुरु पैशाची बाजू बळकट करणार आहे. तुमच्या आर्थिक परिस्थितीत लक्षणीय स्थित्यंतर घडवण्याचे सामर्थ्य या ग्रहात आहे. शनिवार, सोमवार व गुरुवार या दिवसांची मुद्दाम नोंद घ्या. आता लॉटरी रोजच्या रोज झाली आहे. मित्रांनो, तुम्ही त्याचा लाभ अवश्य घ्या. एखादे बक्षीस मिळून जन्माची ददात फिटून जाईल. कौटुंबिकदृष्ट्या हा आठवडा खूपच समाधानाचा जाईल. पतिपत्नी व मुले यांच्यात प्रसन्न वातावरण निर्माण होईल. समज-गैरसमज दूर होतील. स्थावराच्या वादात तडजोड स्वीकारावी. व्यापारी क्षेत्रात समाधानकारक प्रगती होणाऱ्या घटना घडतील. अडचणीवर मात करण्यात तुम्हाला यशही लाभेल. नोकरीधंद्याची स्थिती त्रासाची नसली तरी नोकरदारांनी कामात दुर्लक्ष करू नये. महिलांनी शिक्षिकेच्या व्यवसायात अधिक लक्ष घालावे. त्यांच्या गुणांना अधिक वाव मिळेल. □




**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
व. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मुक्काम : पुणे

# आंतरबँक एकांकिका स्पर्धा

अनिल किणीकर

## दोन्ही बाजूंनी किमान ' जाण ' येणे आवश्यक आहे.

पी. डी. ए.चे हे रौप्यमहोत्सवी वर्ष. नाटच-क्षेत्रात– त्यातल्या त्यात हौशी व प्रायोगिक रंगमंचावर– काही नवीन आणि निराळं करणे हे पी. डी. ए.चे वैशिष्टच (वादग्रस्त ' घाशीराम ' ही जुन्या पी. डी. ए.चीच निर्मिती. ) पुण्यात आणि महाराष्ट्रात एस्टॅब्लिश झालंय्.

पी. डी. ए.ने आयोजित केलेल्या आंतर बँक एकांकिका स्पर्धाचे हे तिसरे वर्ष. चालू वर्षी सहा बँकांनी दहा एकांकिकांद्वारे भाग घेतला होता. (शेवटच्या दिवशी युनायटेड वेस्टर्न बँकेची ' आम्ही सौजन्यात आहोत ' ही एकांकिका अपरिहार्य कारणाने रद्द झाल्याची घोषणा ऐकली. ) तर नऊ एकांकिकांपैकी ' विनमाणसाचा हात ' (पुना को ऑप. रुपी बँक) व ' वाभुळगावचा जहागिरदार ' (इंडियन बँक) ह्या बालिश विनोदी व शालेय संमेलनात करावयाच्या एकांकिकांचा विचार कोणत्याच दृष्टिकोणातून करण्याची जरुरी नाही. त्या वगळल्या तर उरलेल्या सात एकांकिकांपैकी तीन एकांकिकांचे नव्यानेच प्रथम प्रयोग करण्यात आले. नवीन एकांकिका निवडून त्याचा प्रयोग ' प्रयोग ' ह्या अर्थी करणं जितकं प्रशंसनीय तितकंच आव्हानात्मक असतं. आव्हानात्मक असतं ते दिग्दर्शकाच्या दृष्टिकोणातून. कारण संहितेचा अर्थ, पात्रांची निवड व अभिनव, नेपथ्य व प्रकाशयोजना इ. बाजूंनी साकल्याने विचार करून दिग्दर्शकाला ' प्रयोग ' Visualize करावा लागतो आणि ह्या विचाराचा प्रत्यय स्पर्धेतून क्वचितच येतो. ह्या वर्षी मात्र ' हे असंच चालायचं ' (सेंट्रल बँक), ' अस्तित्व ' (स्टेट बँक), ' पाचर ' व ' शोध ' (महाराष्ट्र बँक) ह्या चार नवीन एकांकिकांचे प्रथमच प्रयोग सादर करण्यात आले.

' हे असंच चालायचं ' ही विनोद भट यांची एकांकिका विश्वास गद्रे यांनी दिग्दर्शित केली होती. मृत्यु हा प्रत्येकाला अटळ आहे, धनाच्या लोभापायी मैत्रीचा विश्वासघात होऊन विनाश ओढवतो आणि तात्कालीक लौकिक सुखांच्या आहारी जाणं हे अयोग्यच; आणि तरीसुद्धा ' हे असंच चालायचं ' असा ' इसापनीती ' टाइप अर्थ सांगणारी ही एकांकिका. तीन दारुडे मित्र विनोदी आणि तत्त्वज्ञान बोलता बोलता एकमेकांच्या मृत्यूला कारणीभूत ठरतात; परंतु संयमी विनोदातून विशिष्ट अनुभवाचा अर्थ प्रतीत व्हावा असे घडत नव्हते. चंद्रकांत देशपांडेंचा म्हातारा दिसत होता, परंतु आवाजातून जाणवत नव्हता. प्रकाशयोजनेतून प्रेतयात्रा दाखविणे अभिनव वाटले. गद्रेंचे दिग्दर्शन व भूमिका सफाईदार वाटली.

' अस्तित्व ' ही चंद्रकांत प्रभाकर देशपांडे यांची एकांकिका स्टेट बँकेने सादर केली. एका Absurd एकांकिकेचा अवघड प्रयोग अतिशय नवख्या पात्रांकडून करवून घेणे एक आव्हानच होते. ह्या कामगिरीत प्रा. विजय कारेकर बरेचसे यशस्वी झाले. मुळात ही एकांकिका अत्यंत सैल रचनेची आणि विस्कळित असायची. त्यामुळे विसंगतीतूनच एक जबरदस्त total impact होणे जे आवश्यक होते ते इथे घडत नव्हते. माणसाच्या आयुष्यातून त्याचे नाव, आडनाव, पदवी, व्यवसाय, स्थळ, काळ हे जर वगळले तर काय ' अस्तित्व ' राहते ? ह्या ' अस्तित्वाची ' ओळख आणि शोध घेण्याचा प्रयत्न होतो काय ? असा जर प्रयत्न यशस्वी झाला तर एका युगाचा अंत होईल आणि पुन्हा एक प्रणयिनी (Godess of creativity) अवतीर्ण होऊन नव्या युगाची सुरुवात होईल असा साधारण आशय सांगणारी एकांकिका कारेकरांनी प्रयत्नपूर्वक बसवलेली वाटली. कारण अशा तर्कहीन संहितेला अर्थ देण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न सतत जाणवत होता. वडील, तरुण, वादक, शास्त्रज्ञ, मास्तर अशा पात्रांच्या एकांकिकेत तरुण (सुभाष लाड) व वादक (एस्. आर. कुलकर्णी) यांच्या भूमिका समाधानकारक वाटल्या. सुरुवातीचे रटाळ निवेदन आणि प्रणयिनीला दिलेल्या विचित्र लयीमुळे प्रयोगावर विपरीत परिणाम घडून आला.

' पाचर ' ही चंद्रकांत काळेलिखित आणि दिग्दर्शित एकांकिका महाराष्ट्र बँकेने अत्यंत प्रभावीपणे सादर केली. त्यातील ' तो 'ची भूमिकाही चंद्रकांत काळेंचीच होती, त्यामुळे पडदा उघडण्यापूर्वीच्या अपेक्षा अर्थातच समाधानकारक पूर्ण झाल्या. आता थिएटर अॅकेडमच्या ' महानिर्वाण 'मधील चंद्रकांत काळेंची भूमिका बहुतेकांच्या स्मरणात असेलच. स्वतःच्या भूमिकेबरोबरच एकूण सर्व नाटकाची पकड स्वतःच्याच ताब्यात ठेवूनही एका अलिप्त सूत्रधाराची भूमिका जगणे ही एक अवघड कसरत काळेंनी ' महानिर्वाण 'मध्ये केली आहे, तसाच काहीसा प्रयत्न त्यांनी स्वलिखित, स्वदिग्दर्शित ' पाचर 'मध्येही केला आहे. ' काहीसा ' असं मुद्दाम म्हटलंय्, कारण ' पाचर 'च्या अखेरीस नायक भूमिकेच्या आहारी (involve) जातो आणि एक ढोबळ असा मेलोड्रामा उभा राहतो, त्यामुळे एकूण एकांकिकेवरील त्यांची पकड काहीशी सैल होते.

एकांकिकेची सुरुवात एकदम वेगळी होती : पात्रपरिचय होतो तो - ' पपेट शो 'सारखा. जणू सुरुवातीपासूनच लेखक सुचवतोय की आपण सर्व एका अर्थी ' पपेटस् ' आहोत. नशिबाची साथ नसली की साऱ्या आयुष्या-

लाच 'पाचर' बसते. एक प्रकारची गोची होते. विशेषतः मध्यमवर्गीयांचा हा प्रॉब्लेम आहे. नायकाची आई आजारी आहे. डॉक्टरांचे साचेबंद उपचार, बोलणे नायकच करून दाखवतो. तशातच त्याला प्रिन्सिपॉलकडून फॉर्म मिळत नाही. अनेक कारणांमुळे. त्यातील एक : न केलेली तरुणीची चेष्टा. त्या तरुणीबद्दल द्वेष उत्पन्न होतो. नंतर नोकरी. नोकरीवरील साहेब रजेच्या बाबतीत कचकच करतोय्. औषधासाठी पैसे नाहीत. त्याला दिवास्वप्न दिसते : तो एक राजा आहे. प्रिन्सिपॉल व साहेब लाचार झाले आहेत. त्या तरुणीशी त्याने संभोग घेतला आहे. स्वप्न संपते तेव्हा जाणवते की पैशांची सोय झालेली नाही. तेव्हा रमीच्या डावात पैसे मिळतात आणि औषधं घेऊन घरी जातो तर आईचा मृत्यु झालेला असतो.

एकांकिका हा फॉर्म स्पॅनच्या दृष्टीने अत्यंत मर्यादित असूनही काळेंचे लेखन व्यवस्थित व परिणामकारक झाले आहे. तसेच दिग्दर्शन व प्रयोगही प्रभावी झाला. काळेंकडे दृश्यसंकल्पन करण्याची दृष्टी आहे. डावीकडील लेव्हलवर तरुणी झोपलेली आहे आणि उजवीकडील लेव्हलवर तो पालथा पडला आहे आणि त्याच्या हालचालींतून संभोगदृश्य दाखविण्याची कल्पना एकदम निराळी जाणवली. अभिनयाच्या जोडीनेच दिग्दर्शन व लेखन हे काळेंचे पैलू ह्या एकांकिकेतून विशेषत्वाने जाणवले.

जाता जाता मडके आणि तिरडी ही स्टेजवर आणणे ॲकॅडमीच्या प्रभावाचेच लक्षण की अनुषंगिक लक्षण? (मागे 'रंगायन'च्या बहुतेक नाट्यकृतीतून 'कोर्ट' हे असायचेच!) नेपथ्यातील अन्य तपशील (फोन करणे, संभोग, रमी खेळणे इ.) मूक अभिनयाद्वारे (माइम्सद्वारे) दर्शविल्यानंतर फक्त मडके व तिरडी प्रत्यक्षात आणण्याने काय निराळे साधले?

टीम वर्कचा अप्रतिम प्रयोग म्हणजे दिलीप खांडेकरलिखित 'टाइम इज अप' ह्या बँक ऑफ बडोदाने सादर केलेल्या एकांकिकेचा. ओलीस ठेवलेल्या काही माणसांची सुटका करण्यासाठी शत्रुराष्ट्रांकडून विशिष्ट मुदत देण्यात येते. त्यासाठी विमानांच्या घिरट्या चालू असतात. निरनिराळ्या सवलती देण्यात येतात. लीडर आणि त्याच्या तीन सहकाऱ्यांच्या अटी मात्र विरोधी पक्षाला मान्य होत नाहीत. त्यातील एकाची मैत्रिण ल्यूसीचा मृत्यूही कळविला जातो. दरम्यान ओलीस ठेवलेल्यांपैकी एकाच्या छोट्या मुलीचा 'अंकल' म्हणून लीडरशी संवाद होतो. इथे लीडरचे मन पालटते. कशासाठी म्हणून निरपराध्यांचा नाहक बळी घ्यायचा असा प्रश्न उभा राहतो आणि तो सरेंडर होण्याचा निर्णय घेतो व त्याप्रमाणे जाहीर करतो; परंतु अन्य चार सहकाऱ्यांना तो मान्य नसल्यामुळे ते लीडरला ठार करतात. काही तासांनंतर विरोधी पक्षाने दिलेली वेळ संपते आणि निर्णयात बदल न केल्यामुळे अन्य चार जणांनाही विमानातून मशीनगनने ठार करण्यात येते.

प्रस्तुत एकांकिकेचा विषय, आशय आणि आविष्कार यामुळे ती एकदम उजवी ठरली. विषयाची एक ठराविक कोंडी फोडून ती फार जोमदारपणे फुलली. एकांकिकेतील घटनांना, विशेषतः मानसिक व शारीरिक क्लेशांना एक वेगळा अर्थ आहे, एक वेगळा संदर्भ आहे. देशप्रेम, नेतृत्व, विजय आणि त्यांची धुंदी यांसारख्या मृगजळामागे धावून त्यापासून आभासात्मक सुखकल्पनांमध्ये रमून जावे की त्याच्या नादात मानवीमूल्यांना पारखे व्हावे हा विलक्षण संघर्ष इथे दृष्टीस पडतो. ह्या विशिष्ट प्रसंगातील भीषणता, क्रूरता, सूडभावना दिग्दर्शकाने नेमकेपणाने प्रस्थापित केली आणि त्यामुळे प्रयोगाचा एकसंध परिणाम जोरकसपणे उभा केला.

फारसा अभिनय न करताही सरमुकादम, गुप्ते, फडके व देशपांडे ह्या पात्रांनी रंगेलपणा चांगलाच दाखविला. निरनिराळ्या राष्ट्रांच्या ओलीस प्रकरणातील साचेबंद प्रतिक्रिया सर्वांनी गॉगल्स लावून, आलटून-पालटून उभे राहून वेगळ्या पद्धतीने सादर केल्या. मात्र फक्त लीडरलाच केलेला उग्र मेक-अप् खटकला.

बँक ऑफ बरोडाच्या ह्या नटसंचाला एक निश्चित आशादायी भवितव्य आहे.

'शोध' ही श्रीनिवास भणगेलिखित, दिग्दर्शित आणखी एक एकांकिका महाराष्ट्र बँकेने सादर केली. त्यातील प्रमुख तरुणाची भूमिका ही श्रीनिवास भणगेंनीच केली होती. माणूस स्वत्वाचा आयुष्याच्या अर्थाचा पाठलाग करीत असतो, जीवघेणा 'शोध' घेत असतो. ह्या प्रवासातच त्याला पिढ्या-पिढ्यांचे अंतर सतत त्रास देत असते, अडथळा निर्माण करीत असते. त्यामुळे त्या निराकार, निर्गुण 'स्व'त्वाला निखळपणे कधीच सामोरा जाऊ शकत नाही. त्याची धडपड, त्याचे ध्येय आणि तो काळपुरुष कदाचित् आभासात्मकही असू शकतो. शरीरापासून अलिप्त होऊन मानसिक क्लेश सहन करून 'शोध' घेणे अखेरीस निष्फळच असते, कारण त्यासाठी आवश्यक असणारी मनाची बैठक उणी पडत असते; सामाजिक परिस्थिती प्रबळ ठरत असते. अशा आशयाची ही एकांकिका नभोवाणीवरील श्रुतिकाच भासली. कारण तिला दृश्य असे स्वरूपच नव्हते. तात्त्विक भाषणबाजी, ढोबळ अभिनय, घटनांचा अभाव आणि विस्कळित लेखन ह्यामुळे प्रयोग निरस


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**

वाटला. ह्या लेखनाला एकांकिका म्हणावयाचे काय असं काहीजण प्रयोगाअंती म्हणत होते.

उरलेल्या दोन एकांकिका म्हणजे 'सुलतान' (महेश एलकुंचवार) आणि लाल गुलाबाची भेट (रत्नाकर मतकरी) ह्या बँक ऑफ इंडियाने सादर केलेल्या एकांकिका. त्यातील 'सुलतान' ही इंटिमेट थिएटर' च्या स्वरूपात प्रभावी होणारी एकांकिका. त्यामुळे एकांकिकेची निवडच अयोग्य वाटली तर 'लाल गुलाबाची भेट' ही अत्यंत सांकेतिक, सरळ एकांकिका. ती आता कालबाह्य वाटू लागते. दोन्ही एकांकिकेतील पात्रांनी प्रयोग, अभिनय अगदीच सामान्यपणे केला. मुरेश भावे यांचे 'लाल गुलाबाची भेट'ला असलेले नेपथ्य मात्र निराळे होते.

तर अशा ह्या एकांकिका-स्पर्धा. 'प्रयोग' म्हणाव्यात अशा फक्त दोनच एकांकिका : पाचर आणि टाइम इज् अप्. ह्या निमित्ताने काही नवीन कलाकारांना स्वतःला अजमावता आले. वास्तविक महाविद्यालयीन स्पर्धा, कामगारस्पर्धा, राज्यस्पर्धा व प्रायोगिक संस्थांचे प्रयोग ह्यामुळे 'प्रयोगाबाबत'ची सर्व बाजूंनी किमान जाण येणे–पुण्यासारख्या ठिकाणी येणे–आवश्यक आहे. दोन्ही बाजूंनी–एक : कलाकारांच्या बाजूने, दोन : प्रेक्षकांच्या बाजूने. परंतु दोन्ही बाजूंनी ह्या अपेक्षा फोल ठरल्या. केवळ बक्षीस मिळविण्याच्या उद्देशाने स्पर्धेत प्रयोग करणे हे कलाकारांनी ध्येय मानू नये तर होणारा प्रत्येक प्रयोग अपेक्षापूर्तीचे समाधान देईल अशी खात्री प्रेक्षकांनी बाळगू नये. शेवटी, स्पर्धेतून लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य इ. विविध बाजूंनी कलाकारांना वाव मिळत असतो आणि त्यातूनच दोन–चार सर्जनशील कलावंत रंगभूमीला मिळत असतात, हेच कोणत्याही स्पर्धांचे प्रमुख यश मानावे लागेल.

आंतर बँक एकांकिकांच्या स्पर्धेचा निर्णय जाहीर झाला आहे. त्याचे पारितोषिक–वितरण, मानचिन्हं, फिरता कप, प्रशस्तिपत्रक इ. नेहमीच्याच स्वरूपात झाला. ह्या पारितोषिकांचा शोकेसमध्ये ठेवण्याशिवाय अन्य उपयोग नसतो. म्हणूनच त्याबाबत स्पर्धा-आयोजकांना एक सूचना–पारितोषिके अशा स्वरूपात देण्याऐवजी ग्रंथस्वरूपात द्यावीत. फ्रेंच, जर्मन एकांकिका । नाटके इंग्लिशमध्ये अनुवादित तसेच मूळ इंग्लिशमधूनही प्रकाशित होत असतात. इतकेच नव्हे तर अभिनय, दिग्दर्शन, प्रकाशयोजना, नेपथ्य आणि समीक्षा इ. रंगभूमीविषयक अन्य बाजूंनी विचार करणारे ग्रंथही इंग्लिशमधून सतत प्रकाशित होत असतात. रंगभूमिविषयक काही एक विशेष दृष्टि येण्यासाठी, जाण (Maturity) येण्यासाठी अशा ग्रंथांचे वाचन, चिंतन निश्चितच उपयोगी ठरते. त्यामुळे अनुभूतीतही भर पडते. शिवाय असे ग्रंथ सतत जवळ असले म्हणजे त्यांचा उपयोग कधीही होऊ शकतो. अशा प्रकारच्या पारितोषिकांचा निर्मितिक्षम कलावंत तयार करण्यालाही हातभार लागेल असे वाटते.

□

## एकांकिकांचा निर्णय

१. टाइम इज् अप् : बँक ऑफ बडोदा : सांघिक प्रथम क्रमांक, पी. डी. ए. मानचिन्ह, बापट मानचिन्ह.
( अभिनय : दुसरा क्रमांक – बाळाजी देशपांडे )
प्रशस्तिपत्रके–श्रीराम गुप्ते, पुष्पहास फडके, अशोक सरमुकादम.

२. पाचर : महाराष्ट्र बँक : सांघिक द्वितीय क्रमांक, पी. डी. ए. मानचिन्ह, घुले मानचिन्ह.
( अभिनय : प्रथम क्रमांक – चंद्रकांत काळे, लेखन–पारितोषिक. )

३. शोध : अभिनय उत्तेजनार्थ–श्रीनिवास भणगे.
प्रशस्तिपत्रक–गजानन खळदकर.

४. लाल गुलाबाची भेट : गुणानुक्रमे प्रथम पारितोषक.
स्त्री कलाकार–सौ. प्रियवंदा जोगळेकर
परीक्षक : पुरुषोत्तम जोशी,
एल. जी. भागवत.

□ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**